
भारतीय विद्यामंदिर,अमरावती

द्वारा संचालित

# भारतीय महाविद्यालय,मोर्शी

जि.अमरावती




# सातपुडा

## वार्षिकांक : सत्र २०१९-२०


* मुख्य संपादक *

**डॉ. सुरेश भ. बिजवे**

प्राचार्य

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

* सह संपादक *

डॉ. भगवान जे.साबळे,

डॉ. एल. आर. टेंभुर्णे, डॉ.सावन एम.देशमुख


---


प्रस्तुत वार्षिकांकात प्रकाशित झालेल्या साहित्यातील मते, विचार व कल्पना संबंधित लेखकांची आहेत. त्या मताशी संस्था, प्राचार्य, महाविद्यालय व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. - संपादक मंडळ

# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्र व मैत्रिणींनो,

सन् २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा 'सातपुडा' वार्षिकांक प्रकाशित करताना मनस्वी आनंद आणि अभिमान वाटतो. महाविद्यालयाच्या विविधांगी प्रगतीचा आलेख तसेच युवा पिढीची धडपड, यश व युवा स्पंदन यांचे प्रतिबिंब म्हणजे 'सातपुडा' वार्षिकांक.

नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या सातपुडा पर्वताच्या नयनरम्य सानिध्यात वसलेल्या मोर्शी येथे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज लक्षात घेता, शिक्षण प्रेमी व्यक्तींनी आपल्या उपक्रमातून भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालयाची स्थापना १९७० मध्ये केली. छोट्याशा या शैक्षणिक रोपट्याचे आता वटवृक्षामध्ये रूपांतर झालेले आहे. संस्था चालकांच्या प्रेरणा, संस्थापक अध्यक्ष यांच्या आशावीर्दाने आज महाविद्यालयाने आपले ५० वर्ष पूर्ण केले आहे. महाविद्यालयाचे हे 'सुवर्ण महोत्सवी वर्ष' आहे व आजही महाविद्यालय आपली शैक्षणिक सावली मोर्शीसह आजुबाजूच्या ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांना देत आहे. आपल्या या महाविद्यालयाची सतत यशाकडे वाटचाल सुरू असून शिक्षणासह क्रीडा, सामाजिक क्षेत्र आणि सांस्कृतिक क्षेत्रातही प्रगतीपथावर आहे.

महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ वी ते पदवी व पदव्युत्तर पर्यंतच्या कला व वाणिज्य शाखेचे वर्ग सुरू आहेत. महाविद्यालयातील कला शाखेतील पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना मोर्शी शहराबाहेर जाऊन पदव्युत्तर शिक्षण घेणे शक्य नव्हते. ही अडचण लक्षात घेता मागील सहा वर्षांपासून कला शाखेतील राज्यशास्त्र व इतिहास या विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय महाविद्यालयाने करून दिली आहे. तसेच महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींसाठी त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेला गृहअर्थशास्त्र हा विषय महाविद्यालयाने सुरू केलेला असून त्याला विद्यार्थिनींकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय इंग्रजी वाङ्मय व मराठी वाङ्मय हे विषयही महाविद्यालयाने सुरू केलेले आहे तर कार्यात्मक इंग्रजी हा विषय विद्यार्थ्यांना उपयोगी ठरत आहे. महत्त्वाचे म्हणजे महाविद्यालयात २०१३-१४ या शैक्षणिक सत्रापासून ११ वी विज्ञान व २०१४-१५ पासून १२ वी विज्ञान हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला असून रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र या विषयाची अद्यावत व सुसज्ज अशी प्रयोगशाळा विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे २०१४-१५ या शैक्षणिक सत्रापासून एम.कॉम. (मराठी) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. याशिवाय २०१६-१७ च्या शैक्षणिक सत्रापासून बी.एस्सी. भाग-१, २०१७-१८ पासून बी.एस्सी. भाग-२ व २०१८-१९ पासून बी.एस्सी. भाग-३ या अभ्यासक्रमास प्रारंभ करण्यात आलेला आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत महाविद्यालयामध्ये दि.०५ फेब्रुवारी २०२० रोजी पदवी प्रदान समारंभ संपन्न झाला. महाविद्यालयामधून विविध अभ्यासक्रमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच पदवी प्रदान करण्याचा प्रसंग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच २०१९-२० या शैक्षणिक सत्रात महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग आयोजित 'विदर्भ अर्थशास्त्र परिषदे'चे ४४ वे अधिवेशन संपन्न झाले. या परिषदेत मान्यवर अतिथी, तज्ज्ञ मार्गदर्शक व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. सदर परिषदेचे महाविद्यालयात आयोजन करणे ही महाविद्यालयाकरिता अभिमानाची बाब आहे.

आजच्या काळात व्यावसायाभिमुख शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता वर्ग ११ आणि १२ या उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षण किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिल्या जात आहे. याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रम राबविल्या जातात. त्यात पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असतानाच रोजगाराभिमुख शिक्षण प्राप्त करून स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने करिअर ओरीएन्टेड अभ्यासक्रम, करिअर कौन्सलींग सेल व समान संधी केंद्राची सुरुवात महाविद्यालयाने केलेली आहे. याशिवाय महाविद्यालयात विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार, व्यवसाय मार्गदर्शन केन्द्र असून या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थी घेत आहेत. विशेष हे की संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत 'विद्यार्थी विकास विभाग' महाविद्यालयात स्थापन करण्यात आले. त्याअंतर्गत फेब्रुवारी २०२० मध्ये 'सॉफ्ट स्कील डेव्हलपमेंट' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शैक्षणिक अभ्यासक्रमांसोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्या जाते. त्यात बहुसंख्येने विद्यार्थी सहभागी होतात. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आयोजित सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने दरवर्षी सहभागी होतात. सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून डॉ.भगवान साबळे, डॉ.संदीप राऊत, प्रा.व्ही.व्ही. खांडेकर व डॉ.एल.आर.टेंभुर्णे आदी प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सातत्याने प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रम संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची जोपासना वृद्धिंगत करण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयाच्या रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. सावन देशमुख व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.एल.आर.टेंभुर्णे तर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. भगवान जे. साबळे कार्यरत आहेत.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना सर्व क्षेत्रात यश मिळावे या उद्देशाने व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते. तसेच आरोग्यविषयक, आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा याशिवाय

शैक्षणिक, सामाजिक, कायदेविषयक व सांस्कृतिक या सर्व दृष्टींनी जागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात. शिक्षक, पालक व विद्यार्थी या घटकांमध्ये सुसंवाद साधता यावा म्हणून पालक-शिक्षक संघ व माजी विद्यार्थी संघही कार्यरत आहे.

जोपर्यंत विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ राहात नाही तोपर्यंत शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांना चालना मिळणार नाही हे निर्विवाद सत्य असल्यामुळे महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.एस.व्ही.टोपरे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्रीडा स्पर्धेत सातत्याने सहभागी होतात. महाविद्यालयामध्ये मैदानी खेळ, व्यायाम शाळा व इनडोअर खेळांची व्यवस्था करण्यात आली. विद्यापीठाच्या युवा महोत्सवात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय सहभाग असतो.

२०११-१२ या वर्षांपासून मराठी विभागाचे डॉ.बी.जे.साबळे यांनी 'पालवी' हस्तलिखित काव्यसंग्रह प्रकाशित करून विद्यार्थ्यांना लेखनास प्रवृत्त केले व त्यांना हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून दिले. डॉ.एस.बी.बिजवे, डॉ.आर.जी.बांबोळे, डॉ.एल.आर.टेंभुर्णे, डॉ.एस.व्ही.टोपरे, डॉ.संदीप राऊत, डॉ.सावन देशमुख व डॉ. भगवान साबळे यांनी त्यांच्या विषयात संशोधन कार्य पूर्ण केले असून याचा लाभ आपल्या अभ्यासक्रमात करीत आहे. अशा या सर्व तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या मार्गदर्शनाद्वारा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. महाविद्यालयातील डॉ.संदीप राऊत यांनी स्व.बबनदादा मेटकर स्मृती विचार प्रबोधनमालेअंतर्गत संत गाडगे बाबा यांच्या जीवनकार्यावर ५१ विचारपुष्प गुंफले. विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक सहकार्याने महाविद्यालयातील मुलींकरिता वस्तीगृहाचे काम पूर्ण झाले आहे.

२०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा महाविद्यालयाचा वार्षिकांक आपल्या सर्वांच्या सहकार्याने वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. हा अंक तयार करण्यासाठी आमच्या संपादक मंडळाने जी मेहनत घेतली त्याचे फलस्वरूप म्हणून हा 'सातपुडा' वार्षिकांक होय. या वार्षिकांकामध्ये विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख, साहित्य वाचावयास मिळेल त्याचप्रमाणे महाविद्यालयातर्फे राबविले जाणारे विविध उपक्रमांची माहिती मिळेल. या दृष्टिकोनातून हा वार्षिकांक वार्षिक घडामोडीचा लेखाजोखा असून प्रत्येक कृतीचे प्रतिबिंब आपल्याला यात दिसून येईल. महाविद्यालयाच्या या शैक्षणिक प्रगतीच्या वाटचालीमध्ये संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान आयोग, शासनाच्या शैक्षणिक विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी व हितचिंतक यांचे सहकार्य लाभत आहे आणि भविष्यातही आपला या महाविद्यालयावरील स्नेह असाच कायम राहील, नव्हे तो वृद्धिंगत होईल अशी अपेक्षा व खात्री बाळगतो.

**डॉ. सुरेश भ. बिजवे**
प्राचार्य
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# संपादकीय...

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील सुप्त साहित्यिक गुणांना, त्यांच्यातील हळव्या कवी मनाला कोठेतरी आपले हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या भावना आणि सुप्त गुणांची जाणीव सहकारी मित्रांसोबतच इतरांना व्हावी या हेतूने गेल्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयातर्फे 'सातपुडा' हा वार्षिकांक प्रकाशित केल्या जातो. विशेषतः महाविद्यालयाने ५० वर्षे पूर्ण केल्यामुळे महाविद्यालयाचे हे 'सुवर्ण महोत्सवी वर्ष' आहे.

संगीतातील सप्त स्वर, इंद्रधनुचे सात रंग त्याचप्रमाणे सात पर्वतांच्या रांगामुळे निर्माण झालेले सातपुडा पर्वत. सातपुडा म्हणजे सात उत्तुंग पर्वत रांगाचा घडून आलेला मेळ, यात असलेली जैवविविधता, नैसर्गिक सौंदर्य, प्रेक्षणीय स्थळे यामुळे 'सातपुडा' ने संपूर्ण जगात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. सातपुडा पर्वताच्या शेजारी असलेल्या या महाविद्यालयाच्या वार्षिकांकाचे म्हणूनच आम्ही 'सातपुडा' असे नामाभिदान केले आहे. विद्यार्थ्यांमधील कवी आणि लेखक मनाला सातपुडा वार्षिकांकाच्या माध्यमातून आम्ही हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून दिले आहे. अशा या कलाप्रेमी विद्यार्थ्यांच्या बाबतीत कवी कुसुमाग्रजांच्या खालील ओळी ओठावरती येतात,

''अनंत अमुची ध्येय शक्ती, अनंत अमुची आशा, किनारा तुला पामराला''

या वृत्तीचा वसा आणि वारसा आमचे विद्यार्थी जोपासत आहेत. विद्यार्थ्यांनी असेच लेखन करीत राहावे आणि यशाची शिखरे गाठावित ही सदिच्छा !

या अंकासाठी ज्या विद्यार्थ्यांनी आपले साहित्य उपलब्ध करून दिले, त्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच भारतीय विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, हितचिंतक व स्नेही यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे संपादक मंडळ आभारी आहे.

दर्जेदार टाईप सेटींग व डिझाईनिंग आणि दर्जेदार छपाई वेळेच्या आत करून हा देखणा अंक ज्यांनी तयार केला ते सरस्वती प्रिन्टर्सचे श्री.सुधाकर वडुरकर हे धन्यवादास पात्र आहेत. मोठ्या कल्पकतेने व श्रमपूर्वक तयार केलेला हा 'सातपुडा वार्षिकांक' आपल्या मनी रुजावा ही अपेक्षा.

संपादक मंडळ
सातपुडा वार्षिकांक
२०१९-२०२०

# अंतरंग


प्राचार्याचे मनोगत ३
संपादकीय ६


## अहवाल


सांस्कृतिक विभाग ११
राष्ट्रीय सेवा योजना १३
इंग्रजी विभाग १५
मराठी विभाग १६
इतिहास विभाग १८
राज्यशास्त्र विभाग १९
भूगोल विभाग २०
वाणिज्य व अर्थशास्त्र विभाग २१
गृहअर्थशास्त्र विभाग २२
विज्ञान विभाग २३
ग्रंथालय व ज्ञानस्त्रोत केंद्र विभाग २४
क्रीडा विभाग २७


## मराठी विभाग


कोरोनोत्तर सद्यस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भ : एक दृष्टिक्षेप–प्रा.डॉ. भगवान जालमसिंग साबळे २९
शिक्षण आणि स्वामी विवेकानंद–कु.जेबा अंजुम शेख अकिल ३३
वेळ–अमरदीप प्रल्हादराव अमझरे ३४
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज–कु. समीक्षा मधुकरराव बालसराफ ३५
सोबत–कु. निलीमा अ. भुजाडे ३६
ध्येय शिखर–कु. दिक्षिका दिलीपराव काकडे ३६
खंत–रूपेश राजकुमार उईके ३६
पाण्याची बचत काळाची गरज–कु. धनश्री देविदास बाभुळकर ३७
बापाला किती आंतरवेदना होत असतील–कु. प्रतीक्षा दि. चिखले ३८
स्त्री : व्यथा आणि वेदना–कु. वैष्णवी मोहनराव भड ३९
मैत्री–कु. प्रणिता राजेंद्र मंगळे ४०
जीवनातील नाती–कु. स्नेहल धनराजराव वैराळे ४०
आजची तरुणाई–कु. दिव्या कैलासराव वगारे ४१
सुखाचे सोबती–संकेत गजाननराव चौधरी ४२
बाप–कु. गौरी शरदराव इखे ४२
आई–कु. प्रगती देविदासराव वंडे ४२
वैज्ञानिक दृष्टिकोन–कु. दिपाली किसनराव बोडखे ४३
प्रदूषण–कु. अंकिता संतोषराव लेंडे ४४
जीवन आणि शिक्षण–कु. समीक्षा मधुकरराव बालसराफ ४५
ती–कु. श्वेता दिलीपराव ढोमणे ४६
ती म्हणजे–अजय सुधाकरराव धुर्वे ४६
एकदा तरी...–कु. ऋतिका च. निंघोट ४६
युवकांमध्ये कौशल्य विकासाची गरज–कु. दिव्या बळीराम भलावी ४७
जीवनपुष्प–कु. सेजल नं. सातंगे ४८
मी शेतकरी बोलतोय–अमन दिपकराव वानखडे ४९
मित्र–कु. शुभांगी राजेंद्र कापडे ५०
आयुष्याला द्यावे उत्तर...–आयुष्याला द्यावे उत्तर... ५०
मैत्री–कु. शुभांगी राजेंद्र कापडे ५०
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज–कु.  दिपा ज. कुकडे ५१
साद आईची...–कु.पूजा अशोकराव चौधरी ५२
स्त्री स्वतंत्र झाली का?–भाग्यश्री गजानन निकम ५२
नोकरी–कु. नेहा अवधूतराव माहुरे ५२

तयांचे व्यर्थ न हो बलिदान–कु. धनश्री रोडे ५३
शिवजी महाराज तुम्ही पुन्हा हवेय...!–कु. प्रिया राजेंद्रराव झोडगे ५४
पर्यावरण व्यवस्थापन–कु. सृष्टी रूपराव म्हाला ५५
जीवन–कु. वैष्णवी सुरेशराव दोडके ५६
स्त्री मागे राहणार नाही–कु. दिक्षा प्रभाकर गंजीवाले ५६
समिधा–योगेश गोपाळराव माहोरे ५६
डेबूचा गाडगे बाबा होताना–अनिकेत पाडुरंग बंड ५७
चारोळी–अमरदीप प्रल्हादराव अमझरे ५८
आयुष्य–कु. ऋतिका च. निंघोट ५८
राजमाता जिजाऊ यांची प्रेरणादायी व्यक्तिमत्व–कु. अश्विनी अरुणराव राऊत ५९
पर्यावरण व्यवस्थापन–कु. साक्षी राजेंद्रराव दुर्गे ६०
मैत्रीचा वृक्ष–कु. रेणुका श्रीकृष्ण कोहळे ६२
नाही उमगत 'ती'–कु. दिव्या राजेशपंत इखे/निर्णय–कु. वैष्णवी प्रवीण तायडे ६३
मैत्री–रोशन महादेव ठाकरे /माझी ओळख–कु. दिशा दीपक गाडे ६३
मानवी लोकसंख्या आणि पर्यावरण–कु. मंजुषा झामसा कुमरे ६४
स्त्री व्यथा–कु. प्रणाली प्रवीणराव कावल/आई–आदित्य वि. जाधव ६४
मुलगी झाली हो!–मुलगी झाली हो! ६५
स्त्री व्यथा–कु. प्रणाली प्रविणराव कावल ६५
डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य–कु. अश्विनी अरुणराव राऊत ६६
शिक्षक–प्रतिक विनायकराव वैराळे ६६
प्रेम–कु. मेघा शिशुपाल बोरकर ६७
आदर्श शिक्षक–कु. ऋतुजा प्रदिपराव राऊत ६७
बाप माझा शेतकरी–कु. शुभांगी राजेंद्र कापडे ६७
आजचा युवक–कु. पल्लवी सुभाषराव मोकासे ६८
चारोळी–कु. भावना दि. धुळधर ६८
कृषिप्रधान देशात कृषीची बिकट अवस्था–कु. दिव्या कैलासराव गोंडाणे ६९
माझा शेतकरी बाप–कु. आचल अशोकराव चोपकर ६९
आधुनिक शिक्षण पद्धती–विजय राजेंद्र भोकरे/जीवनपुष्प–कु. आचल अंबुलकर ७०
युवा–कु. रिया धर्माळे/सुविचार–कु. शुभांगी राजेंद्र कापडे ७१
जीवन हे कसं असतं–कु. गायत्री बा. बोरवार/खेळ जीवनाचा–हरीश जगदीशराव तळोकर ७१
व्यथा आणि वेदनामय स्त्रीजीवन–कु. पूजा प्रेमराज आजनकर ७२
२१ व्या शतकातील तरुणी–कु. स्वामिनी ज्ञा. वरघट ७३
खरा श्रोता–कु.मयुरी सुभाषराव तायडे ७४
आयुष्य–कु. पूनम विलास पाटील


## हिन्दी विभाग


संत तुकाराम–कु. कल्याणी संजयराव भोजने ७७
किताबी किडा–कु. प्रणिता राजेंद्र मंगळे ७८
दोस्त हो तो ऐसा–कु. माधवी किशोरराव नेरकर ७८
श्रीकृष्ण और अर्जुन–कु. सेजल नंदकुमार सातंगे ७९
सुविचार–कु. पूनम ज्ञानेश्वरराव मसराम ८०
कॉलेज लाईफ–कु. दीपाली बाळू तायडे ८०
श्लोक–अमरदीप प्रल्हादराव अमझरे ८०


## इंग्रजी विभाग


NAREN AT SCHOOL-Ku. Ujwala Vinodrao Wange 83
You start dying slowly-Ku. Sakshi L. Rayjade 83
UPAGUPTA-Shubham K. Darmale 84
The World is Too Much with us-Ku. Manisha D. Munde 84
ener l r ul es n suggest i onsr eg r i ng. . . . . . . - Ku. [illegible] 85
A Friends Promise-Jayprakash G. Nehare 85
Success-Ku. Vaishnavi S. Dodke 86
Balance Sheet of Life-Ku. Rutuja A. Rawale 86
Oh! Examination!-Nishad Majid Pathan 86

# विभागीय अहवाल

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# सांस्कृतिक विभाग

## वार्षिक अहवाल : २०१९-२०

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाअंतर्गत २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये थोर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ जून २०१९ रोजी 'आंतरराष्ट्रीय योगदिना'निमित्य योगाभ्यासाचे आयोजन करण्यात आले होते. दि.५ सप्टेंबर २०१९ रोजी 'शिक्षक दिना'निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत शासकीय ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती येथे सप्टेंबर २०१९ मध्ये संपन्न झालेल्या 'युथ फेस्टीवल-२०१९' मध्ये महाविद्यालयातील एकुण ३२ विद्यार्थी सांस्कृतिक विभागाअंतर्गत स्किट, लोकनृत्य, मूकनाट्य, एकांकिका व वादविवाद आदि स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

नेहरू युवा केंद्र, अमरावती व महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.९ नोव्हेंबर २०१९ रोजी 'राष्ट्रभक्ती एवं राष्ट्रनिर्माण' या विषयावर 'तालुकास्तरीय वक्तृत्व सपर्धे'चे आयोजन करण्यात आले होते. सदर समारंभास अध्यक्ष म्हणून मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे तर प्रमुख अतिथी म्हणून नेहरू युवा केंद्र जिल्हा समन्वयिका स्नेहल वसुतकर, तालुका प्रतिनिधी कु. प्रतिभा पुनसे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आदि मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.प्राची कडू, आर.आर.लाहोटी महाविद्यालय, मोर्शी तर द्वितीय क्रमांक कु. शीतल हजारे व तृतीय क्रमांक कु. रिया धर्माळे, भारतीय महाविद्यालय, मोर्शी यांनी प्राप्त केला. सदर विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदविला.

ज्ञानसागर शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, वरूड द्वारा संचालित इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज महाविद्यालय, वरूड द्वारा दि.१५-१०-२०१९ ते दि.१६-१०-२०१९ या कालावधीत आयोजित 'लोकशाहीचे मूल्ये जोपसण्यात युवकांची भूमिका' या विषयावरील 'जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धे'मध्ये महाविद्यालयातील राजेंद्र अरुण पवार या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक प्राप्त केला तर कु.शीतल झनक हजारे या विद्यार्थिनीने सहभाग नोंदविला. तसेच सेवारत फाऊंडेशन तिवसा, छत्रपती संघटना तिवसा व ॲड. यशोमतीताई मित्र परिवार, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वच्छतेचे नायक आम्ही-स्वच्छतेचे पाईक आम्ही' या विषयावरील ऑक्टोबर २०२० मध्ये संपन्न झालेल्या 'भव्य विदर्भस्तरीय वक्तृत्व स्पर्धा-२०२०' या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील राजेंद्र अरुण पवार, कु.शीतल झनक हजारे व कु.रिया धर्माळे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व रासेयो विभाग आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१२ जानेवारी २०२० रोजी 'स्वामी विवेकानंद जयंती'निमित्त व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर समारंभास अध्यक्ष म्हणून मा.डॉ.रमेश भ.बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) तर प्रमुख अतिथी व वक्ते मा.श्री.तन्मयनंद महाराज, स्वामी विवेकनंद ट्रस्ट यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा उलगडा केला. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.दीपक ढोले, मोर्शी व मा.जी.टी.वाकळे आदि मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.डॉ.संदीप राऊत यांनी केले. सदर उपक्रमास महाविद्यालयातील वरिष्ठ, कनिष्ठ, एच.एस.सी. व्होकेशनल शाखेचे प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.१९–०२–२०२० रोजी छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा आयोजित आंतरमहाविद्यालयीन 'शिवचषक वक्तृत्व स्पर्धे'करिता महाविद्यालयातील राजेंद्र अरुण पवार व कु. शीतल झनक हजारे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तर दि.२ मार्च २०२० रोजी पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती आयोजित 'आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धे'त महाविद्यालयातील राजेंद्र अरुण पवार या विद्यार्थ्याने सहभाग नोंदविला.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाअंतर्गत दि.२ ते ४ फेब्रुवारी २०२० या कालावधीत 'वार्षिक स्नेहसंमेलन सुवर्णभारती–२०२०' चे आयोजन करण्यात आले होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटकिय समारंभाचे अध्यक्षस्थानी मा.श्री.अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर,अमरावती) तर प्रमुख अतिथी म्हणून मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.श्री.देवेंद्रजी भुयार, मा.डॉ.रामसिंह येवतीकर, सहा.कुलसचिव (महाविद्यालयीन विभाग), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तसेच मा.श्री.सुनीलभाऊ साहू (अभियंता, अमरावती), मा.श्री.बी.के.संजयभाई व मा.जया दीदी आदि मान्यवर उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या आयोजनाची भूमिका महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ.बिजवे यांनी विषद केली. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.भगवान साबळे यांनी तर आभार डॉ.एल.आर.टेंभुर्णे यांनी मानले. सदर कार्यक्रमास श्री.हितेश साबळे, श्री. रोशन दारोकार, श्री.नरेंद्र उमक, श्री.रूपेश वाळके, श्री.हितेश उंद्रे, श्री.रोहितप्रसाद तिवारी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्यने उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलन दरम्यान रांगोळी व पुष्परचना स्पर्धा, आनंद मेळावा, लोकनृत्य, सुरसंगम, एकांकिका, वादविवाद व काव्यवाचन स्पर्धा तसेच क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्ततेने सहभाग नोंदविला.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत बुधवार दि.५–२–२०२० रोजी 'पदवी प्रदान समारंभ–२०२०' थाटात संपन्न झाले. सदर समारंभाचे अध्यक्ष मा.श्री.सलील चिंचमलातपुरे (उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) तर प्रमुख अतिथी मा.श्री.अनिलभाऊ रेड्डीवार, उपजिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अमरावती, माजी प्राचार्य मा.डॉ.जी.एस.मेश्राम, मा.डॉ.हनुमंत लुंगे, प्राचार्य, छत्रपती महाविद्यालय, आसेगावपूर्णा व माजी प्राचार्य मा.डॉ.बी.एस.चंदनकर आदि मान्यवर उपस्थित होते. पदवी प्रदान समारंभ आयोजनाची भूमिका महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ.बिजवे यांनी विषद केली. सूत्रसंचालन प्रा.डॉ.संदीप राऊत यांनी तर आभार डॉ.शिरीष टोपरे यांनी मानले. महाविद्यालयातील इतिहास विभागाचा विद्यार्थी श्री आशीष लोहे, एम.ए.(इतिहास) हा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून दुसरा मेरीट म्हणून तर महाविद्यालयातील प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे सत्कार अतिथी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास श्री.रोहितप्रसाद तिवारी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाअंतर्गत २०१९–२०२० शैक्षणिक वर्षामध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमाच्या आयोजनाकरिता प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ.बिजवे यांचे उपयुक्त मार्गदर्शन लाभले तर सांस्कृतिक विभाग समितीतील प्रा.डॉ.संदीप राऊत, प्रा.व्ही.व्ही.खांडेकर व डॉ.एल.आर.टेंभुर्णे यांचे मौलिक सहकार्य लाभले.

**प्रा.डॉ.भगवान जे.साबळे**

सांस्कृतिक विभाग,

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल : २०१९-२०

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योग दिन वृक्षरोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने मोर्शी येथील खुल्या कारागृहामध्ये बंदीजनांना रासेयो स्वयंसेवकांनी राख्या बांधून समाजहिताची जोपासना केली. याशिवाय महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात रासेयोच्या वतीने पर्यावरण जनजागृती, स्वच्छता अभियान, आरोग्य जनजागृती, वृक्षारोपण आणि संवर्धन, जलसंवर्धन तसेच विविध विषयांना घेऊन समाजामध्ये जनजागृती होण्याकरिता विविध रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विद्यापीठ तसेच राज्यस्तरावर आणि राष्ट्रीय स्तरावर आयोजित शिबिरांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारे आयोजित अमरावती जिल्हास्तरीय युवा प्रशिक्षण शिबिरामध्ये चार मुली व दोन मुले असे एकुण सहा स्वयंसेवक सहभागी झाले होते. गणतंत्र पथसंचलन निवड चाचणी करिता कु. दिव्या कुमरे आणि आवेश शेख हे दोघे अमरावती येथे गेले होते. कु. दिव्या कुमरे हिची निवड राज्यस्तरीय गणतंत्र पथसंचलन औरंगाबाद येथे पुढील निवड चाचणी करिता निवड झाली होती. तसेच नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प आसाम करिता रासेयो पथकातील कु. ममता युवनाते हिने महाविद्यालयाचे नेतृत्व केले होते. राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्यावतीने आयोजित विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण द्विदिवसीय कार्यशाळेकरिता तेरा मुलींनी सहभाग नोंदविला होता. राष्ट्रीय सेवा योजनेच्या अमरावती जिल्हास्तरीय कॅम्प हरिसाल करिता अकरा मुली व सोळा मुले असे एकुण २७ मुलांनी सहभाग घेतला होता.

प्रजासत्ताक दिनानिमित्त मोर्शी तहसील कार्यालयाद्वारे आयोजित नृत्य स्पर्धेत रासेयोच्या पथकाने प्रथम क्रमांक पटकाविला. महाविद्यालयात एड्स जनजागृतीबाबत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पर्यावरण जनजागृतीकरिता आणि वृक्षारोपण व संवर्धनाकरिता राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.बिजवे यांच्या हस्ते झाले. या दिंडीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या १७२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. नेहरू युवा केंद्र, अमरावती द्वारे जिल्हास्तरीय भाषण स्पर्धा 'राष्ट्रभक्ती व राष्ट्रनिर्माण' या विषयावर आयोजित स्पर्धेमध्ये रासेयोच्या शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सिंभोरा डॅममध्ये न शिरविले गेलेले गणपतीच्या मूर्त्या आणि निर्माल्य जमा करून एका आठ बाय आठ फूट रुंद आणि पाच फूट खोल गड्ड्यामध्ये पुरविण्यात आले जेणेकरून पर्यावरणाची बांधिलकी जोपासली.

राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), जिल्हा आपत्ती व्यवस्थापना प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती कार्स अमरावती आणि राष्ट्रीय सेवा योजना, भारतीय महाविद्यालय मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन व प्रथमोपचार कार्यशाळा दि.२७ डिसेंबर २०१९ रोजी भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाविद्यालयाचे एकुण साडेचारशे विद्यार्थी तसेच तालुक्यातील ३०० विद्यार्थी असे एकुण ७५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनमी सत्र २०१९-२०२० मध्ये एकुण ३६० झाडे लावली आणि त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी घेतली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने युवा दिनाचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात ४० मुले आणि ६० मुलींनी सहभाग नोंदविला. मुलांमध्ये प्रफुल चिखले प्रथम क्रमांक, सौरभ उघडे द्वितीय

क्रमांक, तर सुरज सिरसाम याचा तिसरा क्रमांक आला. तर मुलींमध्ये साक्षी लुंगे प्रथम क्रमांक, दुर्गा कुमरे द्वितीय क्रमांक आणि दिव्या दिव्या कुमरे तृतीय क्रमांक पटकाविला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयस्तरीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये २६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ज्यामध्ये सेजल इंगळे या विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला तसेच प्रतीक्षा चिखले द्वितीय क्रमांक, सोनल ठाकरे तृतीय क्रमांक तर पल्लवी ठाकरे, गौरी देशपांडे आणि इरफान शेख यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. दि.२२ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद जयंती निमित्त महाविद्यालयात स्वामी विवेकानंदांचे विचार या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये अध्यक्ष म्हणून मा.डॉ.रमेश बिजवे, अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.श्री.तन्मयानंद महाराज, सचिव, स्वामी विवेकानंद ट्रस्ट, औरंगाबाद आणि प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.जी.टी.वाकळे, मा. डॉ. दीपक ढोले, मा.प्रा.शरदराव बांड आणि महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ. बिजवे आणि इतर प्राध्यापक वर्ग व राष्ट्रीय सेवा योजनेचे दोनशे विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वयंसेवकांमध्ये सामाजिक दायित्वाची जाणीव व्हावी म्हणून कोल्हापूर पूर ग्रस्तांसाठी मदत निधी म्हणून दहा हजार रुपये जमा करण्यात आले. तसेच ३७० किलो गहू, तांदूळ आणि डाळ इत्यादि धान्य रासेयोच्या वतीने कोल्हापूरला पाठविण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत प्रत्येक रविवारी महाविद्यालय, बस स्थानक, तहसील कार्यालय, स्मशानभूमी, मस्जिद, विविध सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियानाचे आयोजन करून स्वच्छ करण्यात आले.

दि.७ फेब्रुवारी २०२० ते १३ फेब्रुवारी २०२० दरम्यान दत्तक ग्राम पार्डी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीर उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश बिजवे हे होते तर उद्घाटक म्हणून मा.ॲड. श्री.यदुराजजी मेटकर, सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अमरावती तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा.प्रा.माणिकराव तुळशीरामजी देशमुख, माजी गाडगेबाबा अध्यासन प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, मा.श्री. तात्यासाहेब संगेकर, ज्येष्ठ रंगकर्मी, अमरावती, मा.श्रीमती निधी अमरकुमार पेठे, प्रसिद्ध उद्योजक, मोर्शी, श्री.नथुजी संपतराव घोंगडे, सरपंच, ग्रामपंचायत पार्डी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत शिबीराचे उद्घाटन पार पडले. शिबिरात ११० स्वयंसेवक सहभागी झाले होते. या शिबीराअंतर्गत दोन शोष खड्डे, दोन वनराई बंधारे, ग्रामसफाई, बौद्धिक व्याख्याने, मनोरंजनातून समाज प्रबोधन व रॅली यांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्यात आले. शिबीराचा समारोप दि.१३ फेब्रुवारी २०२० रोजी मा. डॉ.सुरेश बिजवे, प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. मा.डॉ.गोपीचंदजी मेश्राम, माजी प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, मा.प्रा.डॉ.भीमराव चंदनकर, सदस्य, महाविद्यालय विकास समिती, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, मा.श्री.नवीनकुमारजी पेठे,सदस्य, महाविद्यालय विकास समिती, भारतीय महाविद्यालय, मोर्शी यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.डॉ.सावन देशमुख, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.लाजवंती टेंभुर्णे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ.भगवान साबळे यांनी कार्य बघितले.

**प्रा.डॉ. सावन देशमुख**

कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# इंग्रजी विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

महाविद्यालयातील इंग्रजी विभागाअंतर्गत २०१९-२० शैक्षणिक वर्षात दि.११ सप्टेंबर २०१९ रोजी 'इंग्रजी अभ्यास मंडळा'च्या उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सदर समारंभास अध्यक्ष म्हणून मा. प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे तर उद्घाटक व वक्ते म्हणून मा. गुरुवर्य श्री. कनेरकरजी महाराज, मोर्शी आदि मान्यवर उपस्थित होते. त्यांनी 'संत साहित्य' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय मनोगतात मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुप्त गुणांना वाव देत सर्वांगीण करावा असे प्रतिपादन केले. 'इंग्रजी अभ्यास मंडळ' स्थापन करून वर्षभर त्या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना बौद्धिक व सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतूनेच 'इंग्रजी अभ्यास मंडळ' स्थापन करण्यात आले. सदर समारंभामध्ये 'इंग्रजी अभ्यास मंडळा'च्या विद्यार्थी सभासद प्रतिनिधींचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

इंग्रजी विभागाअंतर्गत बी.ए. व बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांकरिता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. इंग्रजी विभाग प्रमुख प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोधनिबंध प्रकाशित झाले असून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

**प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे**
इंग्रजी विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# मराठी विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

महाविद्यालयातील मराठी विभागाअंतर्गत २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात दि.११ सप्टेंबर २०१९ रोजी 'मराठी अभ्यास मंडळा'च्या उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सदर समारंभास अध्यक्ष म्हणून मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे तर उद्घाटक व वक्ते म्हणून मा.गुरुवर्य श्री.कनेरकरजी महाराज, मोर्शी आदि मान्यवर उपस्थित होते. त्यांनी 'संत साहित्य' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शक केले. तर अध्यक्षीय मनोगतात मा.प्राचार्य भ. बिजवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुप्त गुणांना वाव देत सर्वांगीण विकास करावा असे प्रतिपादन केले. डॉ.भगवान साबळे यांनी 'मराठी अभ्यास मंडळ' स्थापन करुन वर्षभर त्याअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना बौद्धिक व सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतूनेच सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले अशी भूमिका विषद केली. तर आभार प्रा.अश्विनी काळमेघ यांनी मानले. सदर समारंभामध्ये 'मराठी अभ्यास मंडळा'च्या विद्यार्थी सभासद प्रतिनिधींचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

महाविद्यालयातील मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत शासकीय ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती येथे सप्टेंबर २०१९ मध्ये संपन्न झालेल्या 'युथ फेस्टिवल-२०१९' मध्ये 'स्किट' सादर करून सहभाग नोंदविला. तसेच आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दि. १ ते १५ जानेवारी २०२० या कालावधीत शासनाच्या निर्देशानुसार मराठी विभागांतर्गत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'चे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने आयोजित उपक्रम :

* दि.५ जानेवारी २०२० रोजी सकाळी १०.२० वा. 'मराठी भाषेचा विकास' या विषयावर 'निबंध स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले होते.

* दि.९ जानेवारी २०२० रोजी सकाळी १०.२० वा. 'मराठी शुद्धलेखन कार्यशाळा'चे आयोजन करण्यात आले होते.

* दि.११ जानेवारी २०२० रोजी सकाळी १०.२० वा. 'सुंदर हस्ताक्षर स्पर्धा' आदि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासंदर्भात जागृती होऊन मराठी भाषेचा विकास साधावा या हेतूने आयोजित या उपक्रमांच्या आयोजनाकरिता महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे यांनी मराठी विभागास शुभेच्छा दिल्यात. तर या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन त्यांच्यामध्ये मराठी भाषेची महती रुजावी याकरिता मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.भगवान साबळे व प्रा.अश्विनी काळमेघ यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. सदर उपक्रमांना विद्यार्थ्यांचा भरघोष प्रतिसाद लाभला. या उपक्रमानिमित्त स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना पुस्तक व प्रमाणपत्र तर सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सदर उपक्रमाचा अहवाल मा.सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांना सादर करण्यात आला.

मराठी विभाग आयोजित दि.२१ फेब्रुवारी २०२० रोजी 'मातृभाषा दिवसा'निमित्त आयोजित व्याख्यानाप्रसंगी मा.प्रा.डॉ.मंगेश अडगोकार, चांदूर बाजार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'वाचन, लेखन, श्रवण व आकलन क्षमता' ही भाषिक कौशल्य व्यक्तिमत्व विकासाकरिता उपयुक्त असल्याचे प्रतिपादन केले. सदर समारंभ अध्यक्ष म्हणून मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ.बिजवे उपस्थित होते.

मराठी विभागाअंतर्गत गुरुवार, दि.२७ फेब्रुवारी २०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिवस व कविवर्य कुसुमाग्रज यांच्या

जयंतीच्या निमित्ताने 'मराठी भाषेतील म्हणी व वाक्प्रचार स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रमास महाविद्यालयातील बी.ए. व बी.कॉम. शाखेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.सुरेश भ.बिजवे यांनी 'मराठी भाषेच्या विकासाकरिता व मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्याकरिता सदर उपक्रम उपयुक्त आहे' असे प्रतिपादन केले. सदर उपक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा.डॉ.भगवान साबळे व प्रा.अश्विनी काळमेळ तसेच मराठी अभ्यास मंडळाच्या समिती सभासदांनी मौलिक सहकार्य केले. सदर उपक्रमास विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद लाभला. सदर उपक्रम आयोजनासंदर्भाचा वृत्तांत गुरुवार, दि.५ मार्च २०२० रोजीच्या दैनिक मातृभूमी व दैनिक भास्कर या वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाला. सदर उपक्रमाचा अहवाल मा.सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती व मा.प्र.संचालक, रासेयो विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना सादर करण्यात आले.

महाविद्यालयातील मराठी विभाग व विद्यार्थी विकास विभाग, सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत दि.१७ते २२फेब्रुवारी २०२० या कालावधीत 'कौशल्य विकास योजना' (ft kill evelopment orkshop) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* सोमवार, दि.१७ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ९ वाजता प्रा.डी.एस.घोरपाडे, गर्व्हमेंट कॉलेज ऑफ फॉर्मसी, अमरावती यांनी 'गोल सेटिंग' व 'टाईम मॅनेजमेंट' या घटकावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

* दि.१८ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ९ वाजता प्रा.डॉ.आर.पी.दासरवाडे, कॉलेज ऑफ सोशीयल वर्क, बडनेरा यांनी 'मोटीव्हेशन', 'ग्रुप डिस्कशन' व 'इंटरव्यू स्कील' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

* दि.२० फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ९ वाजता प्रा.मनीष जाधव, सिपना कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, अमरावती यांनी 'प्रेझेन्टेशन स्कील' व 'व्हर्बल नॉन व्हर्बल कम्युनिकेशन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

* दि.२२ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ९ वाजता प्रा.डॉ.मंगेश अडगोकार यांनी 'रेझुम रायटिंग' व 'कॅरेक्टर आणि इथिक' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॅ.सुरेश भ.बिजवे यांनी 'कौशल्य विकास योजना' (ft kill evelopment ork-shop) हा उपक्रम विद्यार्थ्यांना करियर घडविण्याकरिता उपयुक्त असा उपक्रम असून त्यांना जीवनात नेमकेपणा प्रदान करणारा उपक्रम आहे असे प्रतिपादन केले तर विद्यार्थी विकास अधिकारी तथा समन्वय मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.भगवान साबळे यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व त्यांचा व्यक्तिमत्व विकास साधावा या हेतूने सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले अशी भूमिका व्यक्त केली. सदर उपक्रमास महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम. व बी.एसस्सी. शाखेच्या अंतिम वर्षाला शिकणाऱ्या जवळपास ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांमध्ये व सामान्य जनतेमध्ये जनजागृती व्हावी या हेतूने मराठी विभाग आयोजित test moz. om या ई–संकेतस्थळावर दि.१ मे २०२० रोजी 'कोविड–१९ प्रश्नावली स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले होते. प्रा.डॉ.भगवान साबळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी झाले होते. तसेच त्यांचे शोधनिबंधही स्मरणिकेत प्रकाशित झाले.

**डॉ. भगवान जे.साबळे**

मराठी विभाग

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# इतिहास विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

इतिहास विभागाच्या वतीने 'इतिहास अभ्यास मंडळा'चे उद्‌घाटन त्या अंतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.२० सप्टेंबर २०१९ ला रशियन राज्यक्रांती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. वक्ते म्हणून प्रा.प्रियंका निमकर उपस्थित होत्या. दि.२ ऑक्टोबर २०१९ ला गांधी जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त दि.१२ जानेवरी २०२० ला 'स्वामी विवेकानंद यांचे कार्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.रमेश बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. तन्मयानंद स्वामी तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.जी.टी.वाकळे, डॉ.सुरेश बिजवे, प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी उपस्थित होते. दि.१५ फेब्रुवारी २०२० ला 'शिवाजी महाराज व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश बिजवे तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रशांत कोठे (श्री शिवाजी महाविद्यालय, अकोट) तसेच डॉ.प्रवीण सदार (छत्रपती शिवाजी महाविद्यालय, आसेगाव पूर्णा) हे होते.

इतिहास विभागाच्या वतीने ऐतिहासिक सहलीचे आयोजन दि.२८ फेब्रुवारी ते २ मार्च २०२० दरम्यान जळगाव, वेरूळ, भद्रा मारोती, खुलताबाद, दौलताबाद, सिंदखेड राजा, खामगाव व शेगाव येथे करण्यात आले होते.

या शैक्षणिक वर्षात डॉ. संदीप राऊत हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे झालेल्या शॉर्ट टर्म कोर्स दि.१५ जून २०१९ ते २२ जून २०१९ दरम्यान सहभागी झाले होते. तसेच ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी झाले होते व शोधनिबंध प्रकाशित केले.

**डॉ. संदीप राऊत**
इतिहास विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# राज्यशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये 'राज्यशास्त्र अभ्यास मंडळा'चे गठन करण्यात आले. त्यानुसार दि.२१ सप्टेंबर २०१९ रोजी अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून प्रा.डॉ.अनिलभाऊ कडू, पंचफुला पावडे महिला महाविद्यालय, वरूड यांनी कलम ३७० या संदर्भांत माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.बी.बिजवे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.रजनीश बांबोळे यांनी केले. संचालन कु.सोनल ठाकरे व आभार कु.कुंजन बिसोने हिने केले. या कार्यक्रमात १७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि.२६ ऑक्टोबर २०१९ रोजी ग्रामपंचायतीचा अभ्यास करण्याकरिता राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ग्रामपंचायत, चिंचोली गवळी येथे अभ्यास भेट देण्यात आली. ग्रामपंचायतीचे कामकाज कसे चालविले जाते व ग्रामसभेचे अधिकार कोणते असतात या संबंधीची माहिती विद्यार्थ्यांना सुनिता साहेबराव धुर्वे, सरपंच व रविंद्र प्रल्हाद पाटील, उपसरपंच, ग्रामपंचायत चिंचोली गवळी यांनी दिली. ग्रामपंचायतीच्या भेटीत ग्रामसेवक विनोद कपले ग्रामपंचायतीचे सर्व सभासद आणि महाविद्यालयातील डॉ. रजनीश बांबोळे, प्रा.घनश्याम दाने, प्रा.सुरेंद्र पांडे, प्रा.शुद्धोधन पाटील व प्रा.विनोद नांदणे हे उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या भेटीत ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

दरवर्षीप्रमाणे दि.२६ नोव्हेंबर २०१९ रोजी 'संविधान दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.शिवाजी कानफाडे, डॉ.संदीप राऊत हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरविंद पाझारे ग्रंथपाल हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.रजनीश बांबोळे यांनी केले. संचालन डॉ.लाजवंती टेंभुर्णे व आभार सुरेंद्र पांडे यांनी केले. संविधान दिनाच्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये डॉ. रजनीश बांबोळे यांनी राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग नोंदवून शोधनिबंधाचे वाचन केले आहे. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकात शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

**डॉ. रजनीश बांबोळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# भूगोल विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

भूगोल विभगाअंतर्गत निसर्ग मित्र मंडळाची स्थापना करण्यात आली. ज्याद्वारे पर्यावरण रक्षण आणि वन्य जीवसंरक्षण यांचे कार्य करण्यात येत आहे. भूगोल विभागातील एकुण १४५ मुले निसर्ग मित्रमंडळात सामील झाली आहेत. या सत्रात सुद्धा भूगोल विभागाच्या वतीने विविध सेमिनार, विविध व्याख्याने पावर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून तसेच व्हीडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिकाधिक सोप्या भाषेत आणि कमी वेळात जास्त माहिती मिळावी म्हणून या माहिती तंत्रज्ञानप्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

भूगोल विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्राध्यापक डॉक्टर सावन देशमुख यांची निवड मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत 'फिल्डगाईड' या पुस्तकाकरिता नॉलेज पार्टनर म्हणून निवड झाली आहे. तसेच ते अमरावती जिल्हा प्राणीक्लेश समिती यावर मानद सदस्य म्हणून तसेच अमरावती जिल्हा जैवविविधता समिती यामध्ये देखील सदस्य म्हणून कार्यभार सांभाळत आहे. प्रा.डॉ.सावन देशमुख अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीवरक्षक म्हणून पद भूषवित आहे. त्यांच्या स्वतःच्या दोन स्वयंसेवी संस्था असून नामे सेंटर फॉर ॲनिमल रेस्क्यू अँड स्टडी, अमरावती आणि पिपल फॉर ॲनिमल, अमरावती याचे ते अध्यक्ष आहेत.

या वार्षिक सत्रात प्राध्यापक डॉक्टर सावन देशमुख यांनी एक आंतरराष्ट्रीय आणि दोन राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभाग घेऊन स्वतःचे शोधनिबंध प्रकाशित केले आहे. तसेच नागपूर येथे श्री शिवाजी सायन्स कॉलेज येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये त्यांना अतिथी व्याख्याते म्हणून बोलाविण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळाच्या मुक्त विद्यालय या प्रकल्पादरम्यान प्रा.डॉ.सावन देशमुख यांनी वर्ग तीन, पाच आणि वर्ग आठ करिता लिहिलेली पुस्तके यावर्षी शासनाने प्रकाशित करून शाळाबाह्य विद्यार्थ्यांकरिता प्रदर्शित केली आहे. भूगोल विभागात या वर्षी प्राध्यापक पदाकरिता प्रा. गोपाल भलावी यांची निवड झाली आहे. प्रा.गोपाल भलावी हे नेट आणि सेट या दोन्ही परीक्षा पास आहेत याचा निश्चितच भूगोल विभागाला भरपूर फायदा होईल.

**डॉ. सावन देशमुख**
भूगोल विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# वाणिज्य व अर्थशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

महाविद्यालयातील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'अभ्यास मंडळा'चे उद्घाटन करण्यात आले व त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. यादृष्टीने विविध व्याख्याने आयोजित करण्यात आले. तसेच स्थानिक लघु उद्योगांना भेटी देण्यात आल्या. तसेच वाणिज्य व अर्थशास्त्र विषयांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहलीचे दि.२९-२-२०२० ते ३-३-२०२० या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जळगाव येथील जैन इंडस्ट्रीज व खामगाव येथील पारले जी बिस्कीट या उद्योगांना भेटी देण्यात आल्या. दोन्ही विभागाच्या ५५ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये औद्योगिक भावना रुजविणे हा औद्योगिक सहलीचा उद्देश होता. तसेच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'विदर्भ अर्थशास्त्र परिषदे'चे आयोजन करण्यात आले. यामध्ये जवळपास १७० लेख प्रसिद्ध करण्यात आले.

**प्रा.व्ही.व्ही.खांडेकर**
वाणिज्य विभाग प्रमुख

**प्रा.डॉ. एल.आर.टेंभुर्णे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

**प्रा.डी.एन.काळे**
वाणिज्य विभाग
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# गृहअर्थशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

भारतीय महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभागातर्फे अनेक नवीन कार्यक्रमाचे आयोजन केल्या जातात. यामध्ये विद्यार्थिनींना अभ्यासक्रमाअंतर्गत दैनंदिन जीवनाचे शास्त्रीय ज्ञान दिल्या जाते. गृहअर्थशास्त्र विषयाच्या अध्ययनाने विद्यार्थिनींना वेगवेगळ्या आजारावरील आहार नियोजन तसेच विविध प्रांतीय भरतकलेचे अध्ययन, अन्नसंरक्षण, अन्न भेसळ या सर्वांची अभ्यासपूर्ण माहिती मिळते.

मानवीन संबंध, बालविकास, मानवीय विकास, वस्त्र प्रावरणे, आहारशास्त्र, अन्न व पोषणशास्त्र, विस्तारशिक्षण, ग्राहक उपभोक्ता अर्थशास्त्र आणि कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन या सर्व शाखांमधून विद्यार्थिनींना व्यवस्थापन, नियोजन, आर्थिक अंदाजपत्रक या सर्वांचे ज्ञान मिळते. याशिवाय या विषयाअंतर्गत १ ते ७ ऑगस्ट जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. यामुळे स्तनपानविषयी जनजागृती तसेच स्तन कॅन्सर याविषयी मार्गदर्शन केल्या जाते. १ ते ७ सप्टेंबर राष्ट्रीय पोषण आहार सप्ताह साजरा केला जातो. यातून विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थिनींना आपले सुप्त गुण दाखविण्याची संधी उपलब्ध करून दिल्या जाते. यामध्ये डिश डेकोरेशन (पौष्टीक पदार्थ), हस्तकला स्पर्धा, पुष्परचना, रांगोळी स्पर्धा या स्पर्धांचे आयोजन केल्या जाते. तसेच आजच्या काळात त्यांना स्वावलंबनी म्हणून जगण्यासाठी स्वयंरोजगराविषयी ज्ञान मिळावे यासाठी आनंद बाजार सारखे कार्यक्रम आयोजित केल्या जाते.

याशिवाय बी.ए.प्रथम वर्षामध्ये विद्यार्थिनींना विविध प्रांतीय भरतकला आणि रंगयोजना यांची माहिती देऊन प्रात्यक्षिक शिकविल्या जाते. तसेच बी.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींना विविध प्रांतीय पदार्थ आणि वेगवेगळ्या आजारांवर आहार आयोजन याविषयी मार्गदर्शन केल्या जाते. तर बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींना गर्भावस्था, मानवीय विकास, लहान बालकांची काळजी तसेच १ दिवसीय समारंभ मेजवानी आयोजन कौशल्य शिकविल्या जाते. म्हणजेच या विषयातून जीवनाच्या सर्वांगीण विकासाचे ज्ञान दिल्या जाते.

आमच्या महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभाग सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण आहे. यात विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक स्वतः करण्याचे प्रशिक्षण दिल्या जाते. गृहअर्थशास्त्र विषयाच्या अनेक विद्यार्थिनींनी प्रेरणा घेऊन आपले कौशल्य गृहउद्योग सुरू करून दाखविले आहेत. त्यातून त्यांना चांगल्या प्रकारे स्वयंरोजगार प्राप्त होत आहे आणि हेच या विषयाचे सर्वात मोठे यश आहे.

**प्रा.कु. अश्विनी हूड**
गृहअर्थसास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# विज्ञान विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

महाविद्यालयातील विज्ञानशाखेच्या वतीने विज्ञान अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले व त्या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बी.एस्सी.भाग-१ च्या विद्यार्थ्यांकरिता दि.३ जानेवारी २०२० रोजी वेलकम प्रोग्रामच्या माध्यमातून स्वागत समारोह, विद्यार्थ्यांचा परिचय हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.एस.बी. बिजवे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच उपस्थित प्रमुख अतिथींनी सुद्धा विद्यार्थ्यांचा शब्दसामर्थ्याच्या मार्गदर्शनातून प्रतिसाद द्विगुणित केला.

तसेच वर्ग ११ वी व वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शकपर वर्गाचे आयोजन करण्यात आले. JEET, CET, NEET या परीक्षांकरिता मार्गदर्शन विद्यार्थ्यांना व्हावे याकरिता तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. याकरिता महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यांनी वेळोवेळी विज्ञान विभागात कार्यरत असणाऱ्या संपूर्ण प्राध्यापकांना मोलाचे सहकार्य केले व वेळोवेळी पाठबळ सुद्धा वाढविले.

दि.२८ जानेवारी २०२० रोजी वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांकरिता निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. निरोप समारंभाप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांना वेळोवेळी लाभलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आत्मीयता व्यक्त केली. महाविद्यालयाचे मा.प्राचार्य साहेब डॉ.बिजवे सरांनी या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले व त्यांनी एच.एस.सी. बोर्ड परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्यात. याचप्रमाणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले प्रा.डॉ.रामटेके मॅडम, श्री. पाझारे सर, श्री.रूपेश मेश्राम सर यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले व परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या. उपस्थित सर्व विज्ञान विभागाच्या प्राध्यापिकांनीही मोलाचे मार्गदर्शन केले. राठोड मॅडम यांनी सुद्धा त्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले प्रा.डॉ.बांबोळे सरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच भूगोल विभागाचे नवनियुक्त प्रा.डॉ.भलावी सरांनी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढविला व त्यांना परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या.

विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकरिता जीवशास्त्र, रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र आदि विषयांच्या सुसज्ज व अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करून दिल्या आहेत तसेच विषयनिहाय विद्यार्थ्यांकरिता चर्चासत्रांचे व सेमिनारचे आयोजन वेळोवेळी करण्यात आले होते. तसेच वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये सुद्धा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविला. विज्ञान विभागअंतर्गत आयोजित उपक्रमांकरिता मा.प्राचार्य डॉ.एस.बी.बिजवे सरांच्या सहकार्याबद्दल त्यांचे विज्ञान विभागाच्या वतीने शतशः आभार!

**प्रा. डी.जे.मोरे**

विज्ञान शाखा

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# ग्रंथालय व ज्ञानस्त्रोत केंद्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

'मनःशांतीसाठी नेहमी ग्रंथ वाचा, जीवनात ते धैर्य व आधार देतात'

'ग्रंथ हे पंख असतात ते उंच भरारी घेण्याची शक्ती देतात' म्हणून ग्रंथाचे वाचन करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपले मन शांत आणि निर्मळ राहते. कोणत्याही महाविद्यालयाचा आत्मा म्हणजे ग्रंथालय होय. ग्रंथालय जेवढे चैतन्यशील तेवढे महाविद्यालय तेजस्वी असते. प्राध्यापक तथा विद्यार्थ्यांना ज्ञानस्त्रोत निर्माण करून देण्याकरिता अत्याधुनिक सुविधा पुरविण्याचे कार्य महाविद्यालयाचे ग्रंथालय करीत आहे. वाचकांची मागणी पूर्ण करता यावी व ग्रंथालयाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा याकरिता अहवाल काळात अनेक उपक्रम राबविण्यात आले. एकदंरित वाचकाचा आनंद, समाधान व त्यातच आनंद मानून महाविद्यालयाचे ग्रंथालय वाटचाल करीत आहे. वाचकांना त्वरीत व अद्ययावत सेवा देता यावी याकरिता ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. ग्रंथालयाचे फेसबूक पेज असून त्यावर विविध उपक्रमाचे फोटो व बातमी प्रसारित केल्या जातात. दरवर्षी 'स्मृतिशेष विश्वास पाझारे' स्मृती प्रित्यर्थ डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट वाचक पुरस्कार देण्यात येत असते. आतापर्यंत १० विद्यार्थ्यांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे. तर यावर्षी अमरदीप अमजरे बी.ए.भाग-३ याला देण्यात आला आहे. सोबतच ग्रंथालयात मदत करणाऱ्या विद्यार्थ्याला ग्रंथालय सपोर्ट अवार्ड देण्याचे ठरविले आहे. याच विद्यार्थ्यांच्या मदतीमुळे सेमिस्टर ५ व ६ ची पुस्तके विद्यार्थ्यांना लवकर वाचायला मिळाली. दि.१३ ऑगस्ट २०१९ ला ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथ यांची जयंती प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. यावेळी डॉ.बी.एस.चंदनकर सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती, भा.म.वि.मोर्शी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि.१५ ऑक्टोबर २०१९ ला भारतरत्न ए.पी.जी.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.एल.आर.टेंभुर्णे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांचे अध्यक्षतेखाली ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. याशिवाय ग्रंथालय उद्‌बोधन वर्ग आणि दि.३-१-२०२० रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय विभाग, प्लेसमेंटसेल व महिला सेलच्या वतीने डॉ. रजनीश बांबोळे, राज्यशास्त्र विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कु.के.जी.फरतडे डीवआयएसपी, मोर्शी व ॲड. मंजूषा खांडेकर यांचे कायदे व करिअरविषयर मार्गदर्शन करण्यात आले. २०१९-२० या शैक्षणिक वर्षात एक लाख सतरा हजार दोनशे एक्यांशी रुपये किंमतीची ५९४ पुस्तके खरेदी करण्यात आली. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षेची पुस्तके व मासिके, व्यक्तिमत्व विकासाची पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध करून दिली जातात. एकंदरित असे म्हटले जाते की-

ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती<br>
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती

या अज्ञानाचा अंधार युग नष्ट होऊन ग्रंथाच्या वाचनातून विद्यार्थ्यांच्या जीवनात नवप्रकाश येण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील ग्रंथापल श्री.अरविंद एस. पाझारे प्रयत्न करीत असतात.

**अहवालकाळात ग्रंथालयात राबविलेले उपक्रम–**

**(१) ग्रंथालय उद्‌बोधन वर्ग–** महाविद्यालयातील वर्ग बी.ए. भाग १ व बी.कॉम. भाग १ च्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालयाचा उद्‌बोधन वर्ग घेण्यात आला. या वर्गाच्या एकूण १७१ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**(२) उत्कृष्ट वाचक पुरस्कार–** स्मृतिशेष विश्वास पाझारे स्मृती प्रित्यर्थ प्रा.अरविंद संभाजी पाझारे, ग्रंथपाल यांचे तर्फे 'बेस्ट यूजर अवार्ड' उत्कष्ट वाचक पुरस्कार रु.५००/– व वाचनीय ग्रंथ दरवर्षी प्रदान करण्यात येतो. यावर्षी हा पुरस्कार अमरदीप अमझरे बी.ए.भाग ३ ह्या विद्यार्थ्याला प्रदान करण्यात आला.

**(३) कात्रणे–** विद्यार्थ्यांच्या उपयोगी येणारे नोकरी व रोजगारविषयक, व्यक्तिमत्वविषयक, स्पर्धा परीक्षा विषयक तसेच सोमवारची लोकसत्ता व गुरुवार देशोन्नती आत्मोन्नती पुरवणी विद्यार्थ्यांकरिता संग्रहित करण्यात आली आहे. तसेच दै.देशोन्नती वृत्तपत्रामधील सामान्य ज्ञान उपयुक्त कात्रणे एकत्र करून स्पर्धा परीक्षेकरिता उपयुक्त कात्रण संग्रह करण्यात आला.

**(४) खरेदी–** ग्रंथालयाकरिता विविध विषयांची ग्रंथ खरेदी करण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयातील अनुदानातून १,१७,२८१ रु. किंमतीचे एकूण ५९४ ग्रंथ खरेदी करण्यात आले.

**(५) नियतकालिक–** ग्रंथालयात एकुण २६ नियतकालिक विविध विषयाची तसेच स्पर्धापरीक्षा विषयक नियतकालिके खरेदी करण्यात आली. विद्यार्थ्यांना सोमेस्वर नोकरी संदर्भ, स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ, प्रतियोगिता दर्पण, रोजगार समाचार इ. स्पर्धापरीक्षाविषयक मासिके विद्यार्थ्यांना वाचनाकरिता उपलब्ध करून देण्यात आले. वर्षाअखेरीस नियतकालिकाचे बांधणी करण्यात आली. सोबतच एन लिस्ट व एन.डी.एल. च्या माध्यमातून वाचकांना ई–बुक व ई–जर्नल करिता यूजर आय.डी. देण्यात आल्या.

**(६) विविध सेवा–** ग्रंथालयामध्ये प्रचलित जागृकता सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा, संगणक प्रिटंसेवा, संदर्भ सेवा, नियतकालिक देवघेव सेवा, प्रतिलिपी सेवा, विविध कागदपत्रे व फोटो स्कॅन सेवा, मराठी कागदपत्र टाईपिंग सेवा, प्रश्नपत्रिका वितरण सेवा इ. विविध सेवा दिल्या जातात. ग्रंथालयाची उपयोगिता वाढावी याकरिता ग्रंथालयात अनेक प्रकारच्या सेवा व उपक्रम राबवित असतात.

**(७) लॉक डाऊन कालावधी मधील–** कोविड १९ ऑनलाईन क्वीझ स्पर्धा, विविध वेबिनारमध्ये सहभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त व डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ Testmoz.com या टूलद्वारे ऑनलाईन परीक्षा, ऑनलाईन स्पर्धा परीक्षेचे आयोजन, विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे निराकरण करण्याकरिता विद्‌यार्थी व प्राध्यापक यांच्यात संवाद व्हावा याकरिता झूम मिटींगते आयोजन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व बी.लीब व एम. लीब करिता झूम मिटींगद्वारे तासिका घेण्यात आली. सोबतच मोर्शी तालुक्यातील वाचकांचा ऑनलाईन सर्व्हे करण्यात आला.

**प्रा. अरविंद संभाजी पाझारे**
ग्रंथपाल
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# क्रीडा विभाग

**वार्षिक अहवाल : २०१९-२०**

क्रीडा विभागाअंतर्गत २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील विविध क्रीडा संघांनी आंतरमहाविद्यालयीन कबड्डी, व्हॉलीबॉल, अथेलेटिक्स, योगा व बेसबॉल आदि क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. तर कु.दिव्या संजय कुमरे या विद्यार्थिनीची आंतरविद्यापीठ अथेलेटिक स्पर्धेकरिता निवड झाली होती व सदर विद्यार्थिनीने आंतर विद्यापीठ अश्वमेध टुर्नामेंट पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे सहभाग नोंदविला.

शारीरिक शिक्षण संचालक डॉ.एस.व्ही.टोपरे यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोधनिबंध प्रकाशित झाले असून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

**डॉ. एस.व्ही.टोपरे**

शारीरिक शिक्षण संचालक

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# मराठी विभाग

# कोरोनोत्तर सद्यस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भ : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. भगवान जालमसिंग साबळे**
मराठी विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय,मोर्शी,जि.अमरावती
Email : bhagwan.j.sable@gmail.com, भ्रमणभाषः९५४५६४३१५३

**प्रास्ताविक–**

जगात सद्यस्थितीत कोरोना–१९ विषाणूच्या प्रादुर्भावाने थैमान घातले आहे. कोरोनाच्या हा कहर मानवी जीवनावर अधिराज्य गाजवित आहे. 'कोरोनामय वावळटी'ने आज जगातील विकसित देशही हतबल होताना दिसत आहे. अशा या कोरोनामय काळात मानवी जनजीवन अक्षरशः ढवळून निघाले. 'कोरोना–१९' या विषाणूचा उगम, प्रादूर्भाव, लक्षणे व त्यावरी उपाययोजना यासंदर्भात प्रसारमाध्यमांसह सर्वत्र चर्चा होत असून लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज जगासमोर एक यक्ष प्रश्न निर्माण झाला तो 'कोरोना–१९' या विषाणूवर कशी मात करायची? कोरोनाच्या प्रादुर्भावाला कसे रोखायचे? याच कोरोनोत्तर सद्यस्थितीतील मानवी जनजीवन, भावीजीवनाची होणारी घुसमट तसेच सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे बदलते संदर्भ, शैक्षणिक क्षेत्रातील आवाहन, आर्थिक क्षेत्रात निर्माण होऊ पाहणारे जागतिक मंदीचे सावट व कोरोना एक आवाहन की, संधी अशा एक नव्हे, तर अनेक घटकांवर तज्ज्ञांकडून, विचारवत, संशोधक, अभ्यासकांकडून व प्राध्यापकांकडून मत–मतांतरे, भाकिते व उपायांबाबत चर्चा घडून येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयीन स्तरावर ई–परिषद (वेबिनार)चे आयोजन करून तज्ज्ञ प्राध्यापकांकडून व विचारवंतांकडून वैचारिक चर्चा घडत आहे. कोरोनोत्तर सद्यस्थिती व भविष्याची भाकितेही वर्तविल्या जात आहे. कोरोनोत्तर सद्यस्थितीचा नेमक्या ह्याच प्रश्नाची उकल करण्याच्या हेतूनेच 'कोरोनोत्तर सद्यस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भ : एक दृष्टिक्षेप' या विषयावरील शोधनिबंधाचे लेखन करण्याचा मानस आहे.

**'कोरोना–१९' विषाणूचा प्रादुर्भाव : एक नवा पेच–**

चीन देशाच्या वूहान शहरातून उदयाला आलेल्या 'कोरोना–१९' विषाणूचा प्रादुर्भाव आज जगभर पसरलाय. अन् ध्यानीमनी नसणाऱ्या या महामारीच्या आजाराने जगासमोर एक नवा पेच निर्माण केलाय. सद्यस्थितीस विज्ञानालाही या विषाणूवर प्रतिबंधित लस शोधता आलेली नाही. त्यामुळे विकसनशील देशही हतबल होताना दिसत आहे. भारतातील पुणे येथील 'सीरम इन्स्टिट्यु ऑफ इंडिया' ने ऑक्सफोर्ड विश्वविद्यालयासमवेत कोरोनावर प्रतिबंधित लस बनविण्याच्या कार्यास प्रारंभ केलेला आहे. शिवाय आयुर्वेदिक औषधांचा पर्यायही शोधल्या जातोय. परंतु या कार्यास पूर्तता लाभण्यास बराच अवकाश आहे. गुणाकार पद्धतीने वाढत्या प्रादुर्भावास रोखणे एक आवाहन आज जगासमोर निर्माण झाले आहे. कित्येकांनी तर याला 'वैश्विक महामारी'ही संबोधले आहे. साहजिकच 'कोरोना–१९' या विषाणूने अनेक प्रश्न निर्माण केले. यात महत्त्वाचा यक्ष प्रश्न हा की, 'सर्वसामान्य मानवाची जगण्यासाठीची केविलवाणी धडपड होय.' लोकजीवन एकप्रकारे विस्कळीत झाले असून मजुरांचे स्थलांतर, उपासमार, जगण्याच्या संदर्भातील निर्माण झालेली अस्थिरता यामुळे निर्माण झालेला नवा पेच. याच सद्यस्थिती संदर्भात दि.२७ मे २०२० रोजी मराठी विभाग, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे आयोजित 'राष्ट्रीय वेबिनार' प्रसंगी विचार व्यक्त करताना डॉ.पृथ्वीराज तौर (मराठी विभाग, स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) असे म्हणाले की, 'मी उभा आहे भयंकराच्या दारात, काय आहे हा भयानक वारा, ज्याने समष्ट मानव जीवनालाच हादरून टाकले. माणसं परिस्थितीने गांगरून गेलीत. एकूणच हा संकटाचा काळ. अशा काळात माणसं आपल्या माणसाचा आश्रय शोधत असतो.' म्हणूनच शहरात कामाच्या शोधात गेलेले मजुरांचे जत्थेच्या जत्थेच खेड्याकडे स्थलांतर होत आहे. यातच शासनास विलगीकरणाची करावी लागणारी व्यवस्था, प्रशासनाचा वाढलेला ताण, लघुउद्योगांचे अचानक कोलमडणे, तळहातावर पोट असणाऱ्यांचा भूकेचा प्रश्न असे सामान्य वाटणारे प्रश्न परंतु यामुळे

गंभीर समस्या उद्‌भवल्याने शासनही कोंडीत सापडले. तसेच मोठ–मोठे उद्योगधंदे, कंपन्यांना ताळेबंदीची सोसावी लागणारी झळ, आयात–निर्यात बंदी, ठप्प झालेली वाहतूक व्यवस्था, शासनास प्राप्त होणारा महसूल व वेगवेगळ्या वस्तुंवरील प्रत्यक्ष–अप्रत्यपणे मिळणारा कर व सेवा शुल्क याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला अन् आज जागतिक मंदीचे सावट निर्माण झाले. असा हा संकटमय पेच देशालाच नव्हे तर जगालाही भेडसावतोय.

**मानवी जीवनाचा विस्कटलेपणा–**

जगात आज 'कोरोना–१९' या विषाणूच्या प्रादुर्भावाने कोट्यवधी रुग्ण बाधित झालेले आहे. कोरोना ही एक 'वैश्विक वावटळ' आहे. यापूर्वी अशा संकटांचा देशाला सामना करावा लागला पण विज्ञान–तंत्रज्ञानाच्या युगात मानवाचे बऱ्याच अंशी भौतिक सुखसुविधेवर असलेले अवलंबित्व, कृषी व्यवस्थेवर आधारित अर्थव्यवस्था असणाऱ्या देशात कृषीशिवाय मानवी जीवनाला वळण देण्याचा प्रयत्न, पर्यावरणाला कवेत घेण्याचा मानवाचा दुर्दैवी प्रयत्न परंतु वेळोवेळी निसर्गाने मानवाला चकविले आणि याचाच परिणाम आज देशातील सामान्य जनता सामना करतेय. उद्योगधंद्यावर झालेले परिणाम त्यामुळे अनेक उद्योगधंदे व कंपन्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोट्यवधी मजुरांवर व नोकरदार वर्गावर उपासमारीचा प्रसंग व जनजीवन विस्कळीत होण्याची वेळ आली आहे. मानवाचे जगणे कठीण झाले असून जीवनात विस्कळीतपणा निर्माण झाला. यासंदर्भात दि.२५ मे २०२० रोजी मराठी विभाग, कर्मवीर के.ह.आबड कला, श्रीमान लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान महाविद्यालय, चांदवड, जिल्हा नाशिक आयोजित 'राष्ट्रीय वेबिनार' प्रसंगी विचार व्यक्त करताना मराठी साहित्याचे अभ्यासक मा.डॉ.केशव तुपे (सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती) असे म्हणाले की, 'प्रथमतः आरोग्याशी निगडीत असणाऱ्या कोरोना या महामारी समस्येने आज जीवनाच्या प्रत्येक्ष क्षेत्राला प्रभावित केले आहे.' म्हणूनच आरोग्याचा, शिक्षणाचा, मानवी भाव–भावनांचा झालेला कोंडमारा, जगण्याचे बदललेले संदर्भ, नात्यातील आटलेला ओलावा यामुळे एकंदरीत मानवी जनजीवनच आज विस्कळीत झालेले आहे.

**कोरोनोत्तर मानवी आरोग्य : एक आवाहन–**

कोरोनाने मानवाच्या आरोग्याबाबत नव्याने विचार करायला भाग पाडले. सत्ता, संपत्ती व यंत्रसामुग्री यापेक्षाही आरोग्य महत्त्वाचे अन् याकरिताच सुविधा निर्माण करणे, अत्याधुनिक सुविधेने युक्त अशी इस्पितळांची संख्या वाढविणे याची नव्याने जाणीव करून दिली. आरोग्याच्या सुविधेत अग्रगण्य गणल्या गेलेल्या इटली सारखा देशही कोरोनाने हतबल झालेला आहे. 'कोरोना–१९' हा विषाणू अदृश्य असून या रोगाची लक्षणे १ ते १४ दिवसापर्यंत आढळून येतात. तोपर्यंत गुणाकार पद्धतीने कोरोनाचा प्रादुर्भाव वाढतो. याकरिता कोरोनाची प्राथमिक लक्षणे आढळताच संशयित रुग्णास विलगीकरण केल्या जाते. कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या भीतीनेच मानवाचा थरकाप उडतो. यावरील जुजबी औषधोपचार उपलब्ध नसल्याने वैद्यकांसमोर न सुटणारे कोडे निर्माण झाले. याकरिता 'कोरोना' विषाणूचा संसर्गच होऊ नये याकरिता शर्तीचे प्रयत्न प्रशासनामार्फत केल्या जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.उद्धव ठाकरे यांनी वेळोवेळी प्रसार माध्यमांमार्फत लोकांशी संवाद साधीत 'कोरोना–१९' या विषाणूशी करावा लागणारा सामना व संघर्षमय परिस्थिती धैर्याने लढा देण्याचे केलेले आवाहन. आरोद्य मंत्रालयाकडून 'कोरोना–१९' या विषाणूच्या संदर्भात करण्यात येणारी जनजागृती शिवाय रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याकरिताच्या उपाययोजना सुचविणे हे कार्य जोमाने केल्या जात आहे. 'कोरोना योद्धे' म्हणून प्रशासन, वैद्यक, परिचारिका, पोलीस अधिकारी व सफाई कर्मचारी यांचे समाजपातळीवर सन्मान केल्या जात आहे. कारण हे 'कोरोना योद्धे'च अहोरात्र लढा देत रुग्णांची सेवा करीत आहेत. यात कित्येकांना या रोगाची लागण झाल्याने जीव गमावून बलिदानही द्यावे लागले. अशा 'कोरोना योद्धां'ना मानाचा मुजरा.

'आरोग्य सेतू' या ॲपद्वारे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यास झालेली मदत असो अथवा सदर आजाराची लागण होऊ नये म्हणून या ॲपच्या सहाय्याने धोक्याची घंटीद्वारे सूचित करणे याकरिता या ॲपचे सहाय्य होत असून सदर ॲप ॲण्ड्राईड फोनमध्ये डाऊनलोड करण्यासंदर्भात मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले. तसेच डब्ल्यू.एच.ओ. या जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे निर्देशही दिल्या जात आहे. रोगप्रतिकार क्षमता वाढविण्याकरिता आयुष विभाग, मध्यप्रदेश यांनी 'जीवन अमृत योजना' अंतर्गत 'त्रिकुट चूर्ण' (काढा) प्राशन करण्याकरिता सुचविले आहे. याचा लाभही होताना दिसत आहे.

सद्यस्थितीत तरी भारतात 'कोरोना–१९' चा प्रादुर्भाव रोखण्याकरिताच्या मुबलक सुविधा निर्माण करण्यात आलेल्या असून

कोरोनाबाधित रुग्णांमध्ये सुधारणा होण्याचे प्रमाणही वाढीत आहे. तरी पण एका वर्षापर्यंत कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये याकरिता नागरिकांना काळजी घेणे हिताचे ठरणार आहे. बाहेर पडताना नाक–तोंड झाकण्याकरिता तोंडावर रुमाल बांधणे, व्यक्तीव्यक्तींमध्ये किमान दोन फुटांचे अंतर राखणे, गर्दीच्या ठिकाणी जाण्याचे टाळणे, बाहेरून आल्यावर साबनाने हात धुणे व रोग जंतुनाशक द्रव्याने हात निर्जंतुकीकरण करणे तसेच बाहेर पडणे अत्यावश्यक नसेल तर घरातच थांबणे हिताचे ठरणार आहे. या उपाययोजना केल्यास निश्चितच कोरोनाच्या प्रादुर्भावापासून स्वतःचे, कुटुंबाचे रक्षण करू शकतो. कोरोना प्रतिबंधित लस निर्माण होईपर्यंत उपरोक्त उपाययोजनाच उपयुक्त ठरणार आहे. म्हणूनच 'कोरोनोत्तर मानवी आरोग्य एक आवाहन आहे.' यावर तूर्तास तरी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे उत्तम पर्याय आहे.

**कोरोनोत्तर समाजजीवनाचे बदलते संदर्भ–**

कोरोनामय काळात समाजजीवनात बदल घडल्याचे चित्र दिसत असून लोकांमध्ये आरोग्याबाबत अधिकच जागृतता निर्माण झाली. शिवाय जगण्याचे संदर्भही बदललेत. अचानक उद्भवलेल्या कोरोना आजाराने जीवनातील अत्यावश्यक गोष्टींची नव्याने उकल झाली. शासनानेही सर्वसामान्याकरिता अत्यावश्यक मदत करण्याचे धोरण अवलंबिले जात आहे. त्यामुळे समाजजीवनात स्थिरता निर्माण होत आहे. कारण शहरी भागातील लोक गावाकडे आल्यामुळे कोरोनाची लागन होऊ नये याकरिता तणावसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ पाहात असताना शासनाच्या यथायोग्य धोरणाने समाजजीवनातील उद्भावणाऱ्या समस्यांचे निराकरण होत आहे.

परंतु कोरोनाने प्रादेशिक ओळख पुसून टाकल्या अन् कोरोना रुग्णांच्या संख्येनुसार आज हरित, केशरी व लाल रंगाचे क्षेत्र उदयाला आले. जात, धर्म, पंथ व गरीब–श्रीमंत यातील भेद कोरोना विषाणूला नाही. नव्याने 'सोशीयल डिस्टशिंग' ही संकल्पना उदयास येत असून आरोग्यासोबतच समाजआरोग्य ही संकल्पना फायदेशीर ठरणार आहे. बालकांचे भावविश्व, स्त्रियांचे प्रश्न अशा समस्यांसोबतच महामारीचे समाजशास्त्र, कौटुंबिक हिंसाचार, मानसिक स्वास्थ्य संदर्भातले प्रश्न असे एक नव्हे, तर अनेक समस्यांनी जनजीवन ढवळून निघाले. अन् आज मानवाचे जगण्याचे, समाजजीवनाचे संदर्भच तर बदलले नाही ना असा प्रश्न निर्माण झाला.

**साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातील आवाहने–**

कोरोनाच्या प्रादुर्भावाने मानवी जनजीवन व समाजजीवन ढवळून निघाले त्याचप्रमाणे साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रही प्रभावित झाले. साहित्यिकांना कोरोनोत्तर काळाची साहित्यात नव्याने दखल घ्यावी लागणार आहे. साहित्यात लोकजीवन, समाजजीवनाचे व मानवी भावविश्वाचे प्रतिबिंब पडणार. कोरोनोत्तर काळाची साहित्यात नोंद करताना साहित्यिकांसमोर आवाहानात्मक परिस्थिती निर्माण होईल असे असले तरी कोरोनोत्तर जगताची नव्याने उकल करताना निश्चितच साहित्यिकांच्या कल्पकतेस बहर येईल, प्रतिभेस स्फुरण चढेल यात दुमत असण्याचे कारण नाही.

कोरोनोत्तर काळाने मनोरंजन क्षेत्रातही आवाहन निर्माण केले असून सांस्कृतिक चळवळीस बसलेली खिळ, लोककलावंतांची होत असलेली उपेक्षा, सार्वजनिक वाचनालये बंद असल्यामुळे वाचन संस्कृतीला आळा बसलाय. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ध्वनिफित, पी.डी.एफ. स्वरूपातील वृत्तपत्र, मासिके व पुस्तके यामुळे वाचन होत असले तरी काही अंशी का होईना वाचन संस्कृती प्रभावित झाली आहे असे दिसते. कोरोना लवकर आटोक्यात येणार नसल्याने सद्यस्थितीत तरी निदर्शनास येत आहे. त्यामुळे वर्षभर तरी तज्ज्ञ विचारवंतांच्या व्याख्यानांचे आयोजन वा साहित्य संमेलनांचे आयोजनास खीळ बसली. शिवाय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केल्या जाणार नाही. शाळा, महाविद्यालयातही वार्षिक स्नेहसंमेलने व आंतरमहाविद्यालयीन युवक–महोत्सवाचे आयोजन केल्या जाणार नाही. त्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळणार नाही. रसिक प्रेक्षकांनाही अभिरुची जपता येणार नाही. अशाप्रकारे कोरोनामुळे सांस्कृतिक क्षेत्रात आवाहन निर्माण झाले. असे असले तरी आरोग्याच्या कारणाने उद्भवलेल्या या समस्येवर मात करीत भविष्यात सर्वकाही पूर्ववत होईल अशी अपेक्षा बाळगूयात.

**शैक्षणिक क्षेत्रातील आवाहने–**

कोरोनोत्तर काळात मानवी जीवनातील वा समाज जीवनातील प्रत्येक क्षेत्र ढवळून निघाले. त्यात शैक्षणिक क्षेत्रातही बरीच उलथापालथ झाली. जेव्हापासून देशात ताळेबंदी घोषित झाली तेव्हापासून शाळा व महाविद्यालये बंद आहेत. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावरही कमी–अधिक प्रमाणात परिणाम जाणवतोय. ई–लर्निंगच्या मार्फत अध्ययन–अध्यापन प्रक्रियेस गतिशील करण्याचा प्रयत्न होताना दिसतोय परंतु यासही मर्यादा आहेत. यासंदर्भात दि.३

जून २०२० रोजी मराठी विभाग, श्री. मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, जि.औरंगाबाद आयोजित 'आंतरराष्ट्रीय वेबिनार' प्रसंगी विचार व्यक्त करताना डॉ.संजयकुमार करंदीकर (मराठी विभाग, महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा, गुजरात) असे म्हणाले की, 'अध्ययन-अध्यापनात नवतंत्रज्ञानाचा वापर पारंपरिक शिक्षण पद्धतीपेक्षा सरस नाही. कारण अध्ययन-अध्यापनात शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील जिवंत संवाद महत्त्वाचा असून हा संवाद पारंपरिक शिक्षण पद्धतीतीतच अधिक आहे.' तरीही सद्यस्थिती बघता शिक्षण प्रक्रिया खंडीत होऊ नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता अध्ययन-अध्यापनात नवतंत्रज्ञानाचा वापर करणे हिताचे ठरणार आहेत. शिवाय भविष्यकाळातही या नवतंत्रज्ञानाचा वापर करीत शिक्षण क्षेत्रात भरारी घेणे औचित्याचे ठरणार आहे.

आज कोरोनोत्तर काळात 'कोरोना-१९' या विषाणूंच्या संसर्गाने विद्यार्थी बाधित होऊ नये याकरिता परीक्षाही रद्द करण्यात आल्यात. २०२०-१९ या शैक्षणिक सत्र प्रारंभास विलंब होणार अशी सद्यस्थिती आहे. नवतंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण प्रक्रिया गतिमानही केल्या जाईल. परंतु सततच्या संगणक व इतर तंत्रज्ञानाच्या वापराने विद्यार्थ्यांच्या मनोस्वास्थावर विपरीत परिणाम होत आहे. यातून अनुचित प्रकारही घडताना दिसत आहे. एकंदरीतच सद्यस्थितीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालाय. अन् ही शिक्षण क्षेत्रातील हानी देशाच्या विकसनशीलतेला पोषक ठरणार नाही. म्हणूनच हे कोरोना कहराचे संकट लवकर आटोक्यात येऊन शिक्षण प्रक्रिया सुरळीत होवो अशी अपेक्षा बाळगूया.

**निष्कर्ष-**

'कोरोनोत्तर सद्यस्थितीचे लोकजीवनातील बदलते संदर्भ : एक दृष्टिक्षेप' या विषयावरील शोधनिबंधाचे लेखन करताना 'कोरोना-१९' या विषाणूच्या प्रादुर्भावाने मानवी लोकजीवन वा समाजजीवनातील तसेच सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील सद्यस्थितीचे बदलते संदर्भ नमूद करण्यात आले. 'कोरोनामय जागतिक वावटळी' ने देशासमोरचे नव्हे, तर जगासमोर समस्यांचे जटील समीकरण निर्माण केले. शिवाय आरोग्यविषयक, आर्थिक व सुरळीत जगण्यासाठीची धडपड यात खोळंबा निर्माण केला. कोरोनाच्या कहराने जगात जीवित हानीसह वित्तीय हानीही झाली. अन् मानवी जनजीवनाचे, मानवी भावविश्वाचे व समाजजीवनाचे संदर्भच बदलले. सत्ता, संपत्ती व भौतिक सुखसुविधेपेक्षाही आरोग्य महत्त्वाचे आहे अन् हे आरोग्य सुदृढ राहण्याकरिता अथवा 'कोरोना-१९' या विषाणूच्या प्रादुर्भावापासून संरक्षण करण्याकरिताची केविलवाणी धडपड भविष्यातील समस्यांसदर्भात खूप काही निर्देश करते. मग या कोरोनोत्तर काळाच्या आघाताने आम्ही मानवी जीवनाची नव्याने उकल करणार का? हा यक्ष प्रश्न विचारवंताना चिंतन करण्यास भाग पाडणारा आहे.

कोरोनोत्तर सद्यस्थितीने अनेक क्षेत्रातील संकल्पनेचे संदर्भच बदलले. विज्ञानाची हतबलता असो की, उद्योजगताची कोंडी, मानवी भावविश्वाचा कोंडमारा असो की, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राला बसलेली खिळ. शिक्षण क्षेत्रातील नवा पेच वा प्रशासनासमोरील आवाहन असे एक नव्हे, तर अनेक बाबतीत आज तरी मानवी जीवनाची ससेहोलपट होताना दिसत आहे. ताळेबंदीच्या काळात मजुरांचे, गोर-गरीब जनतेचे तसेच लघु उद्योजकांचे झालेले हाल खूप काही निर्देश करते. कोरोनोत्तर सद्यस्थितीने जो मूळ प्रश्न निर्माण केला तो आरोग्यविषयक. कोरोनाचा कहर रोखण्याकरिता प्रतिबंधित लस तयार करणे, आर्थिक क्षेत्रातील अस्थिरतेला सुरळीत करणे व शिक्षण क्षेत्राचा गाडा सुरळीतपणे हाताळणे ह्या प्रमुख समस्यांचे निराकरण केंद्र व राज्य शासनास करावा लागणार. जागतिक आरोग्य संघटना, सामाजिक संस्था शिवाय तज्ज्ञांचा आरोग्यविषयक सल्ला उपयुक्त ठरणार आहे. कोरोनोत्तर मानवी आरोग्य एक आवाहन आहे. यावर तूर्तास तरी स्वतःच स्वताच्या आरोग्याची काळजी घेणे उत्तम पर्याय आहे. शिवाय आपल्याला कोरोनासोबत जगायला शिकावे लागणार आहे. कोरोनोत्तर सद्यस्थितीत निर्माण झालेल्या ह्या जागतिक वावटळीतही भविष्यकाळात सुधारणा घडेल व मानवी जनजीवन सुरळीत होईल अशी अपेक्षा बाळगूया.

**संदर्भ सूची-**

(१) जागतिक आरोग्य संघटनेचे कोरोना विषाणू संदर्भातील माहिती व दाखले.

(२) प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या कोरोना विषाणूसंदभा४त बातम्या.

(३) केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी जाहीर केलेली कोरोना विषाणू संदर्भातील माहिती.

(४) तज्ज्ञ विचारवंतांची प्रसारमाध्यमांद्वारे प्रकाशित झालेली कोरोना विषाणू संदर्भातील लेख.

❑ ❑ ❑


(सदर लेख दि.०७ जून २०२० रोजी शिवरामजी मोघे कॉलेज, केळापूर, जि.यवतमाळ येथे संपन्न झालेल्या एकदिवसीय आंतरविद्याशाखीय वेबिनार (Covid-19 Pandemic : Transforming Challeges in to Opportunites) प्रसंगी सादर करण्यात आलेला आहे.)

# शिक्षण आणि स्वामी विवेकानंद

**कु.जेबा अंजुम शेख अकिल,** बी.ए. भाग १

ज्या व्यवस्थेद्वारे संस्कृती, सभ्यता, जीवनमूल्ये आणि पूर्वापार संचित ज्ञान नव्या पिढीपर्यंत पोचविले जाते त्या प्रणालीला शिक्षण असे म्हणतात. भारतामध्ये प्राचीन शिक्षण व्यवस्था अत्यंत उन्नत होती. तक्षशिला, नालंदा इत्यादी विद्यापीठे जगामध्ये प्रसिद्ध होती. अनेक देशामधून विद्यार्थी आपल्या देशामध्ये शिकायला येत असत. परंतु शेकडो वर्षे गुलामीमध्ये असलेली ती शिक्षणप्रणाली हळूहळू नष्ट होत गेली. इंग्रजाच्या काळामध्ये आपली सत्ता टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने नोकर निर्माण करणारी विशेष शिक्षण प्रणाली उदयास आली. स्वामी विवेकानंदानी संपूर्ण भारताचे आठिण साऱ्या जगाचे अवलोकन करून ''भारताच्या उद्धाराचा एकमात्र उपाय म्हणजे पुरातन शिक्षण पद्धतीचा पुनरुद्धार करणे होय'' असे ठामपणे सांगितले. त्यांनी शिक्षण विषयक अनेक मूलभूत सूत्रे दिली. त्यांच्या आधारे सद्यस्थितीत आवश्यक अशा शिक्षणप्रणालीचा अवलंब केल्यास समाजाचा व देशाचा विकास होऊ शकतो.

स्वामीजींनी शिक्षणाची व्याख्या एका सूत्रामध्ये सांगितली- Education is the manifestation of the perfection already in man शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रगटीकरण होय. त्यांच्या मते प्रत्येकामध्ये अनंत शक्ती दडलेली आहे, अनंत ज्ञान भरलेले आहे. त्याची जाणीव व्हायला हवी पण अज्ञानाचे आवरण दूर केल्या खेरीज त्या आतील ज्ञानाचा प्रकाश बाहेर येणार नाही. म्हणून प्रथम आपल्यामध्ये अफाट ज्ञानाची जाणीव प्रत्येकाला व्हावी आणि त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न व्हावे. स्वामी विवेकानंदाच्या मते ''एकाग्रता'' हाच एकमेव उपाय होय. मनुष्य जितका जास्त एकाग्रता अंगी बाणवू शकेल तितके तो यश संपादू शकेल. क्षेत्र कोणतेही असो. प्रत्येक क्षेत्रामध्ये ज्या ज्या महापुरुषांनी इतिहास घडविला, महान कार्य केली त्याच्या ठायी विशाल एकाग्रता तसेच अतूट श्रद्धा पाहायला मिळते.



स्वामी विवेकानंदाचा शिक्षणाचा उद्‌देश माणूस निर्माण करणे व चरित्र निर्माण करणे यातच होता. त्यांच्या मते, Man making and charactor building should be the motto of education. खऱ्या अर्थाने माणूस घडता तरच राष्ट्र घडून शकते. त्याच्या स्वप्नातील माणूस शिक्षणानेच घडू शकतो. आपल्याला आज अशा शिक्षणाची गरज आहे की, ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढते, बुद्धी विशाल होते आणि ज्या योगे मनुष्य आपल्या पायावर उभा राहू शकतो. स्वामीजी म्हणतात जे शिक्षण सामान्य समाजाला जीवन संग्रामासाठी तयार करू शकत नाही, जे शिक्षण भूत,दया,भाव देऊ शकत नाही जे शिक्षण सिंहासारखे साहस उत्पन्न करू शकत नाही, ते शिक्षण या व्याख्येला पात्र करू शकत नाही.

स्वामीजींच्या मते शिक्षणाने अशी मनाची व्यापकता व हृदयाची विशालता उदयास आली पाहिजे तरच चारित्र्याची निर्मिती होईल. भौतिक शिक्षणाबरोबर आध्यात्मिक व नैतिक शिक्षणावर देखील स्वामीजी भर देतात. त्याशिवाय खरे यश मिळू शकणार नाही. आजची आपली अवस्था काय दाखविते. खरीखरी निष्ठावान माणसाची सगळीकडे उणीव असल्यानेच ही अवकळा झाली आहे. म्हणून मूल्यशिक्षणाची आज जास्त गरज आहे.

भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या विकासाकरिता पाश्चात्यांच्या भौतिकशास्त्रविषयक ज्ञान व आपले प्राचीन जीवनमूल्ये यांचा समन्वय होणे आवश्यक आहे. विज्ञानाने सर्व जग जवळ आले. भौतिक सर्व सुखसोयी मिळाल्या. माणसाचे ऐहिक जीवन सुखी झाले पण काय पाहातो

आपण सर्वत्र निराशा, भ्रष्टाचार, काळाबाजार असे का झाले? कुठे गाणित चुकले? शिक्षणाचा एवढा व्यापक प्रसार झाला, अत्याधुनिक यंत्रांनी आपली व्याप्ती वाढली तरी पण राष्ट्रासमोर, संपूर्ण मानवजातीसमोर नवनवीन समस्या उभ्या राहात आहे. विश्वबंधुत्वाचा नारा स्वामीजींनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेच्या शिकागो शहरी दिला. ''जयजगत'' म्हणणारी आमची संस्कृती आणि त्यामध्ये वसलेली आमची दैवी संपदा आज शिक्षणामध्ये यायला हवी. अनेक शिक्षण संस्था केवळ अर्थाजन करण्याच्या उद्देशाने पुढे येत आहे. कशी माणसे निर्माण होतील? म्हणून आज आपल्या खऱ्या अर्थाने राष्ट्राची उभारणी करायची असेल तर शिक्षण संस्था, संस्थाचालक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचे सकारात्मक प्रयत्न स्वामीजींचे माणूस घडविणे उद्दिष्ट ठेवून झाले तर बलशाही, वैभवशाली राष्ट्र म्हणून भारत जगाच्या नकाशावर झळकेल असा स्वामीजींचा विश्वास होता आणि तसे होण्याचे चिन्हे दिसायला लागली आहेत.

एकंदरीत स्वामी विवेकानंदांनी दिलेल्या शैक्षणिक विचारांतून माणूस, चरित्र व राष्ट्र उभारणी होईल व आपले प्राचीन वैभव पुन्हा प्राप्त होईल यासाठी प्रत्येकाने यथाशक्ती ह्या देशकार्यास हातभार लावावा व स्वामीजींच्या संदेशातून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्यावे हीच आजच्या शिक्षण व्यवस्थेकडून अपेक्षा.

❑ ❑ ❑

# वेळ

सोडून आपलं असं ह्या जगात कोणी नाही
वेळ चांगली असेल तर सगळे आपले असतात
आणि वेळ खराब असेल तर
आपले पण परके होतात
वेळच माणसा आपल्या व परक्याची
ओळख करून देते

**अमरदीप प्रल्हादराव अमझरे**
बी.ए. भाग ३

# शेतकरी बाप

शेतकरी बाप माझा शेतकरी बाप
दुःखाला जीवनात करतो उघडझाप

दुःख जसं त्याच्या नशिबी लिहिलं
आत्महत्येशिवाय त्याला दुसरं नाही कळलं

शेतकरी बाप माझा उभ्या जगाचा पोशिंदा
रातदिवस शेतात राबण्याचा त्याचा धंदा

कपड्याला भाव मिळे, दागदागिण्याला भाव मिळे
पण माझ्या बापाचं पिक रस्त्यावर सडलेलं मिळे

नोकरदारापेक्षा दिलदार माझा शेतकरी राजा
स्वाभिमानाने जीवन जगतो न  करता मोठेपणाचा वाजागाजा

पाणी अन् पिक सोडतो त्याचा सात
हताश होऊन जीवनात होतो त्याचा घात

कष्ट करू करू आटलं सारं बापाचं रक्त
कमी पडते शब्द दुःख कराया व्यक्त

पोट भरायासाठी किती पडते बापाला चिमटे
त्याचा पाठलाग छळ करतात हे लबाड सरकारी भामटे

बी-बियाणासाठी गहान ठेवतो पत्नीचे दागिणं
हात पाय घासून पूर्ण करतो लेकराचे शिक्षण

बघा किती कठीण होतं शेतकऱ्याचं जगणं
किती मरावं लागतं त्याला रोज क्षणोक्षण

आतून आवाज येते त्याचं दुखतं हातपाय सार अंग
दुर्लक्षित करतो साऱ्या दुखण्याला घेऊन बहिऱ्याचं सोंग


नोकरदाराचं नुसतं ऐटीनं जगणं
शतेकरी बापाचं स्वाभिमानाचं जगणं

या स्वाभिमानी बापाला करते
शेतकऱ्याची लेक स्वामिनी सलाम सलाम!

**कु. स्वामिनी ज्ञा. वरघट**
बी.ए भाग ३

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**कु. समीक्षा मधुकरराव बालसराफ,** बी.कॉम. भाग १



तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरू. त्यांचे मुळचे माणिक हे नाव त्यांचे गुरु आडकोजी महाराज यांनी बदलून तुकडोजी असे केले. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे, तर देशभर फिरून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे, तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. सन् १९४२ च्या भारत छोडा आंदोलना दरम्यान काही काळ त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. 'आते है नाथ हमारे' हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते.

भारत हा खेड्यांचा देश आहे. हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल याविषयी त्यांनी कळकळीची चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात याविषयी उपाययोजनाही सूचविली. या उपाययोजना त्या काळी तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उपयुक्त उपयुक्त ठरल्यात हे आज तीव्रतेने जाणवते. अशा गोष्टीतूनच राष्ट्रसंतांचे द्रष्टेपण दिसून येते.

अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना हे तुकडोजी महाराजांच्या आयुष्यातील असे लक्षणीय कार्य आहे. त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखनही त्यांच्या जीवनाकार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. 'ग्रामगीता' ही जणू तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयसेवेची पूर्तीच होय. स्वतःला ते तुकड्यादास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले ह्याची त्यांना जाणीव होती.

खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल याविषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सूचविली होती ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळाले. प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळावे असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटले आहे. देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंतांच्या विचारविश्वाचे एक वैशिष्टय होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक, सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला.

तुकडोजी महाराज हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करीत असत. धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभाग घेतला म्हणून त्यांना कारावासही भोगावा लागला. अखिल भारतीय पातळीवर त्यांनी साधू संघटनेची स्थापना केली. गुरुकुंज आश्रमाच्या शाखोपशाखा स्थापन करून त्यांनी शिस्तबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळीच निर्माण केली. गुरुकुंजाशी संबंधित

असलेले हे सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आजही त्यांचे हे कार्य अखंडव्रतासारखे चालवीत आहेत.

देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला.

ऐहिक व पारलौकिक याचा सुंदर समन्वय तुकडोजी महाराजांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले. आजही त्यांचे हे साहित्य आपल्याला मार्गदर्शन करीत आहे. यावरून त्यांच्या साहित्यात अक्षर वाङ्मयाची मूल्ये कशी दडली आहेत याची सहज कल्पना येईल. राष्ट्रपती भवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणून संबोधिले होते. तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण अश्विन कृष्ण पचंमी शके १८९० दि.३१ ऑक्टोबर १९६८ रोजी झाले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार व प्रसार अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाद्वारे केले जाते.

'ग्रामगीता' हा त्यांचा ग्रामविकासावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. याशिवाय राष्ट्रसंतांची इतरही मौलिक ग्रंथसंपदा प्रकाशित झालेली आहे. त्यांचे ग्रामगीता ग्रंथामधील विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहोचावे याकरिता महाराष्ट्र शासनाने ग्रामगीता हा ग्रंथ पुनर्मुद्रित करून सवलतीमध्ये उपलब्ध करून दिला आहे. अशा या महान राष्ट्रसंतांच्या विचाराला व कार्याला सलाम.

❑ ❑ ❑

## सोबत

तू सोबत असताना
आयुष्य किती छान वाटतं...

उडान मोकळं
एक रान वाटतं...

सदैव मनात जपलेले
पिंपळपान वाटतं...

कधी बेधुंद
कधी बेभान वाटतं...

खरच, तू सोबत असातना
आयुष्य किती छान वाटतं...

तू सोबत असताना
आयुष्य किती छान वाटतं...

**कु. निलीमा अ. भुजाडे**
बी.ए. भाग ३

## ध्येय शिखर

सतत धडपडत राहणे
प्रत्येकाचा पेशा असावा
मेहनतीच्या जिवावर आपला
उद्याचा चेहरा स्पष्ट दिसावा

दुःख भरपूर असतील पण
रोज थोडं रुसावं जास्तीचं हसावं
हसता हसता आपल्या अस्तित्वासाठी
स्पर्धेच्या भानगडीतही पडावं

अडथळे असतात फार
पण न डगमगता चालावं
रोज चालता चालता
ध्येयाचं गाव दिसावं

दृष्ट संकटांना झेलण्यासाठी
आता आपण कंबर कसावं
ध्येयाची लढाई लढता लढता
ध्येयाच्या शिखरावर बसावं

**कु. दिक्षिका दिलीपराव काकडे**
बी.कॉम.भाग ३

## खंत

रात्रीच्या त्या स्वप्नांना खऱ्या
आयुष्याची साथ द्यावी म्हणून
उगाच कविता लिहत बसतो मी
म्हणूनच स्वतः या जगात वेडा ठरतो मी।।१।।

रात्री उगाच स्वप्ने बघतो मी
दिवसभर त्या रात्रीच्या स्वप्नांविषयी
उगाच विचार करत बसतो मी
म्हणूनच स्वतः या जगात वेडा ठरतो मी।।२।।

स्वप्नातल्या त्या मोडलेल्या ध्येयाला
कसं गाठायचं माझ्या त्या ध्येयाला
त्याविषयी उगाच विचार करत बसतो मी
म्हणूनच स्वतः या जगात वेडा ठरतो मी।।३।।

ध्येय गाठण्यासाठी खडतर प्रयत्न करतो मी
माझं ध्येय मला मिळणार अथवा नाही
त्याविषयी उगाच विचार करतो बसतो मी
म्हणूनच स्वतः या जगात वेडा ठरतो मी।।४।।

**रूपेश राजकुमार उईके**
बी.ए भाग ३

# पाण्याची बचत काळाची गरज

**कु. धनश्री देविदास बाभुळकर,** बी.कॉम. भाग १

प्रत्येक सजीव सृष्टीचा अविभाज्य घटक ते पाणी. पाणी व मानवी जीवनसृष्टीचा अगदी जवळचा संबंध आहे. ज्यामुळे कोणतेही कार्य होऊ शकत नाही. पाणी आहे तरच हे जीवन आहे म्हणून दरवर्षी २२ मार्च हा 'जागतिक जलदिन' म्हणून साजरा करण्यात येतो व दरवर्षी या विषयावर जनजागृती कार्यक्रम घेतले जातात पण त्याची अंमलबजावणी करताना कोणीही दिसत नाही. उलट पाण्याची नासाडी ही चालूच असते.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संकल्पच आपण मोडून टाकला आहे. आज जलसंकट हे जगभरात उद्‌भवू लागले आहे. वाढती लोकसंख्या व औद्योगिकीकरण यामुळे पाण्याचा जलस्त्रोत घटत चालला आहे तरीही यावर उपाययोजना म्हणून शोषखड्डे करायला हवी, पाण्याचा पुर्नवापर करायला हवा. जेणेकरून पाणी वाया जाणार नाही व पाण्याची बचत होईल. जास्तीत जास्त झाडे लावायला हवी व जगवायला हवी. प्रत्येक मनुष्याने आपल्या आयुष्यात एक तरी झाड लावावे हा आपण सर्वांनी नववर्षानिमित्त संकल्प करायला हवा. पण आज मानवाची प्रवृत्ती ही स्वार्थी बनत चालली आहे. मानव हा फक्त आपल्या गरजा व इच्छा पूर्ण करण्यात गुंतून असतो. मानवाच्या अराजकतेमुळे ही स्थिती आज जगासमोर आली आहे. वाढती लोकसंख्या व वृक्षतोड याला जबाबदार आहे.



आज जी आग जगासमोर लागली आहे ती आग फक्त पाणी विझवू शकतो एवढी ताकद या छोट्याशा थेंबामध्ये आहे आणि या दोन शब्दांत एवढी शक्ती आहे की, पाण्याचा एक जरी थेंब तव्यावर पडला तर त्याचं अस्तित्व संपतं ही परिस्थिती आपल्यासमोर येऊ नये यासाठी पाण्याची बचत करणे गरजेचे आहे आणि ती काळाची गरज आहे. तसेच पुढच्या पिढीला आपल्याला काही वारसा द्यायचा असेल तर हा एक छोटासा संकल्प सुद्धा मोठी क्रांती घडवू शकतो. म्हणून पुढचं तिसरं युद्ध हे पाण्यावरच होईल यात शंकाच नाही.

पाणी हे कृत्रिम नाही ती एक नैसर्गिक देणं आहे म्हणून त्यांचा उपयोग हा योग्यरितीने व्हायला हवा. सरकारने यावर उपाययोजना करायला हव्या. कारण पुढे असा प्रश्न उभा राहू नये की–

एक होता राजा, एक होती राणी।
उद्या असं म्हणू नका एक होतं पाणी।।

ही परिस्थिती आपल्यावर उद्‌भवू नये यासाठी नियोजन करणे हे गरजेचे आहे. सजीवांचे जीवन हे पाणी आहे. पाण्याशिवाय जगणेच अशक्य. आपल्याला वजनाच्या साडेचार किलोमागे सुमारे तीन किलो वजन हे निव्वळ पाण्याचे असते. सजीव ज्या मूळ घटकांपासून बनलले आहे ते घटक म्हणजे पेशी आणि या पेशीतून पाण्याचा अंश होत असतो. त्यामुळे पाण्याअभावी त्यांच्या मूळ स्वरूपातच फरक पडतो व पर्यायाने त्या जीवनासाठी निरुपयोगी ठरतात. दर दिवसाला मानव सुमारे

३ लिटर पाणी पितो आणि १ लिटर पाणी अन्न, फळे यामार्फत घेत असतो व आपल्या शरीरात एकूण १० लिटर पाण्याची देवाण-घेवाण होत असते. आपल्या शरीरात ५ लिटर रक्त असते त्यातले ३ लिटर हे पाणी असते. मनुष्याच्या प्रत्येक श्वासात उपयोगी असलेले ते म्हणजे पाणी. म्हणून सजीवाला असलेली पाण्याची गरज लक्षात घेता आपण पाणी जपून वापरले पाहिजे म्हणून संस्कृत भाषेत म्हटले आहे,

*जलः ब्रह्मः जल विष्णू*
*जल देवो महेश्वरः*
*जल साक्षात परब्रह्मः*
*तस्मै श्री जलय् नमः*

ही थोरवी या पाण्याची आहे. पाऊस हा आधार आहे. पावसामुळे जग चालते. पाऊस नाही तर काही नाही. जीवनाला पाणी पाहिजे. पाण्याचा शब्दच मुळी 'जीवन' आहे.

ज्या संस्कृत भाषेच्या ह्रदयातून अमृत, पाणी, जल अशी गोड-गोड नावे दिली. ज्यात एवढी शक्ती आहे की, एखाद्या कोमेजलेल्या फुलांवर थोडं पाणी शिंपा, वाळलेल्या झाडाला पाणी घाला, सुकलेल्या गवतावर पाणी टाका कसे टवटवीत फुलतात. मरणालाही 'जीवन' देणार ते म्हणजे पाणी.

ज्या वसुंधरेने सृष्टीला जन्म दिला व तिचा विकास घडवून आणणारे प्रत्येक गोष्टीत महत्त्वाची भूमिका बजावणारे ते म्हणजे पाणी. निसर्ग निर्मित पण काहीही असले तरीही आपले प्रमाण कायम राखणारे ते म्हणजे पाणी.

लक्षात येतं-'घोटभर पाण्यासाठी ग्लासभर पाणी' हात धुण्यासाठी अंधाधुंद वापर. पाणी जीवनाचा अविभाज्य घटकच नाही तर संपूर्ण जीवनसृष्टीची निर्मितीच्या मुळी पाणी आहे. म्हणून,

*येणाऱ्या पाण्याला चालायला शिकविणे*
*चालणाऱ्या पाण्याला धावायला शिकविणे*
*धावणाऱ्या पाण्याला अडवायला शिकविणे*

हे आपले कर्तव्य आहे व ती एक काळाची गरज आहे.

❑ ❑ ❑

# बापाला किती आंतरवेदना होत असतील

बाप आणि लेक हे नातं शब्दांत मांडणे जरा मला
कठीणच पण तरीही
एक छोटासा प्रयत्न करीत आहे...

आईचं गुणगाण सर्व जग करतो
आज लिहावं त्या बापाबद्दल...

आपण आयुष्यभर आईचं गुणगाण खूप करतो
पण बिचारा बापाची धावपळ करून रक्ताचं
पाणी करतो आणि आपल्या परिवाराला सर्व सुख देतो

संकट प्रसंगी बापच धावून येतो
आपण फक्त आई आईच करत बसतो

आईकडे असते संस्काराची किल्ली
तर बाप असतो संयमाची गुरुकिल्ली

सदा आठवते जेवण बनवणारी प्रेमळ आई
पण त्याच शिदोरीची सोय हा बापच रोज पाही

काटकसर करून खर्चाला देतो पॉकेटमनी
स्वतः मात्र वापरतो शर्ट-पॅन्ट जुनी

घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी
पण मुलांना घेतो नवी साडी, नवी गाडी

वयात आल्यावर मुल आपल्याच विश्वात मग्न
बापाला दिसते मुलाचं शिक्षण पोरीचे लग्न

जिवंतपणी पूर्ण करावी आई वडिलांची सर्व इच्छा
त्यांना समजून घ्यावं हीच शेवटची इच्छा...!

**कु. प्रतीक्षा दि. चिखले**
बी.कॉम भाग १

# स्त्री : व्यथा आणि वेदना

**कु. वैष्णवी मोहनराव भड,** बी.कॉम. भाग १

स्त्रीमुक्ती म्हणजे निव्वळ पुरुषांच्या विरोधात जाणे नव्हे, तर पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा असलेल्या विशिष्ट पद्धतीचा विरोध करणारी चळवळ होय. पूर्वीची जाचक बंधने आज स्त्रियांवर नाहीत. पण याचा अर्थ स्त्री सर्वार्थाने मुक्ती झाली असा होत नाही. स्त्रीमुक्ती चळवळी ठिकठिकाणी कार्यरत आहेत. परंतु हे विचार, ह्या चळवळी शहरापुरत्या मर्यादित आहेत. दलित, आदिवासी, शोषित, पीडित स्त्रियांना या चळवळीची सुतराम कल्पना नाही. आर्थिक, बौद्धिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय या सर्व क्षेत्रामध्ये स्त्रीने शिरकाव केलेला आहे. पुरुषांनी स्त्रियांना मुक्त केले आहे. त्यांना मोकळीक दिली, स्वातंत्र दिले त्यातून त्यांची मानसिकता किमान बहरलेली आहे. स्त्रियांना मुक्ती हवी म्हणजे काय  हवे? कोणापासून मुक्ती हवी? स्त्रियांच्या कार्यक्षेत्राबाबतच्या अन्याय आता कमी झालेला दिसतो. आता असे कोणते क्षेत्र आहे की तेथे महिला नाहीत. न्यायिक विभाग, महसूल खात्यात, जिल्हाधिकारी म्हणून काम करणाऱ्या महिला आहेत. रिक्षाचालक, टॅक्सी चालक, ड्रायव्हर, इंजिन ड्रायव्हर, विमान चालक, बस कन्डक्टर तसेच विविध क्षेत्रात अधिकारीपदी, सर्वोच्चपदी पुरुषांची मक्तेदारी आहे.



स्त्रीचे जीवन म्हटले की, अत्यंत कठीण परिस्थितीचं. स्त्री ही यशाची पायरी आहे. स्त्रीशिवाय कोणतेही काम अवघड आहे. परंतु तिच्या जीवनाला दुःखच दुःख लाभलेले आहेत. सर्वांच्या आयुष्याचा एक हृदयस्पर्शी भाग कुटुंबातील सर्वात महत्त्वाचे सदस्य म्हणजे स्त्री होय. घरात 'आपली आई' तिच्याशिवाय कोणतेही काम शक्य नाही. दैनंदिन जीवनात अनेक प्रसंगात कोणत्याही व्यक्तीला येणाऱ्या अडचणी ह्या स्त्रीलाच येत असतात. स्त्री ही खूप मौल्यवान आहे. स्त्री ही कुटुंबात महत्त्वाचा सदस्य असते. स्त्री ही घरातील सदस्यांचा आधार असतो. कारण स्त्री म्हणजे आयुष्याचा भव्य घटक आहे. जीवनात तिची सतत संघर्षमय वाटचाल असते. ती येणाऱ्या सर्व अडचणींना तिला एका व्यवस्थापकाप्रमाणे पतीच्या खांद्याला खांदा लावून एकप्रकारे सबला नारी म्हणून तिला जगावे लागते. आधीच्या काळात स्त्रीला खूप काही सहन करून घ्यावे लागत असे. स्त्रीला घरातून बाहेर सुद्धा जाता येत नव्हते. तिला त्यात परवानगी नव्हती. तिला फक्त चार भिंतीच्या आतच राहा लागत होते आणि वयाच्या ९–११ व्या वर्षी लग्न व लग्नानंतर 'चूल आणि मूल' सांभाळायचे. तिला दोन्हीही घर सांभाळा लागत असे. तिला खूप काही दुःख सोसावे लागत असे. स्वातंत्र्याने जगण्याचा तिला मुळीच हक्क नव्हता. तिच्या आयुष्यात सतत दुःख आणि दुःखच असे परंतु सावित्रीबाई फुले यांच्यामुळे स्त्रीच्या जीवनाला फार वाटा आलेल्या आहे. सावित्रीबाईच्यामुळे स्त्रीया ही शिकू लागल्या. देश जेव्हा इंग्रजाच्या गुलामगिरीत होता तेव्हा स्त्रियांना, मुलींना शिक्षणाची कसलीही सोय उपलब्ध नव्हती. शाळेत मुलींना कुणीही पाठवत नव्हते. अशा काळात ह्या महान आईने एका गरीब घरी जन्म घेतला. त्यांच्या काळात मुलगीम्हणजे उपभोगाची वस्तू समजायचे. चूल आणि मूल हीच तिच्या नशिबी होते. नंतर त्यांना जोतिबांनी शिकवले व जोतिबांच्या

मनात स्त्रियांना शिक्षण द्यावे, त्यांना समाजात मानाचे स्थान मिळावे म्हणून स्त्री शिक्षणाचा पाया रचला व नंतर पुणे येथे सन् १८४८ साली मुलींची पहिली शाळा उघडली. त्या शाळेत पहिली महिला शिक्षक म्हणून सावित्रीबाईंची निवड करण्यात आली. अशाप्रकारे मुली व स्त्री आज पुढे आल्यात आजही स्त्रीवर तेवढेच अन्याय व अत्याचार आहे ते थांबवण्यात यावे. रस्त्यावर चालणारी मुलगी किंवा स्त्री आज सुरक्षित नाही आहे. अशी ही स्त्रीची कहाणी, स्त्रीची व्यथा आणि वेदना खूप दुःखदायक आहे. ऐकली की अंगाला जणू शहारेच येते.

❑ ❑ ❑

## मैत्री

तुझी मैत्री म्हणजे
आयुष्याच्या पुस्तकातलं
एखादं जाळीदार पान
जसजसं त्याचं आयुष्य वाढत जातं

तसतसं त्याच्या सुंदरतेला
तेज चढत जातं
तुझ्या मैत्रीनीला आयुष्य
धुसर–धुसर वाटेल
तशी वाट सापडेल जगण्याची
पण हातात माझ्या हक्काचं असं काही नसेल

मैत्रीचा हा नाजुक
धागा दोघीनीही आता
सांभाळायला हवा
मैत्री एक धर्म...
यास दोघांनीही पाळायला हवा

मैत्री एक धर्म
यास पाळायला हवा
येणारे येतात अन् जाणारे जातात
मैत्री सगळ्याशीच होत नाही
मैत्री सहज होऊन जाते
करायची ठरली तरी ती
करता येत नाही
तुझ्या माझ्या मैत्रीला वय नाही

म्हणूनच वाटतं तुझ्या माझ्या
मैत्रीला भय नाही
मैत्रीचा ठेव हा असाच
जपून ठेव

तू हसत राहा माझ्यासाठी
तुला बघून माझे
शब्दही हसतील
शब्दांना नाही सांगू शकणार

अशी तुझी मैत्री
मी आहे तुझ्याबरोबर
तुझ्या सुखदुःखात
एवढीत देऊ शकतो तुला खात्री

**कु. प्रणिता राजेंद्र मंगळे**
बी.ए.भाग ३

## जीवनातील नाती

जीवनातील नाती तशी
अनेकच असतात...
पण ती जपणारी लोक
फारच कमी असतात...

काही नाती असतात रक्ताची
तर काही हृदयाची...
काही नाती असतात जन्माची
तर काही 'काही क्षणापुरतीच'...

काही नाती असतात
केसांसारखी न तुटणारी
पण वेळ आलीच तर
वाकणारी...

काही नाती असतात
लांबूनच आपले म्हणणारी
जवळ गेल्यावर मात्र दूर
करणारी...

काही नाती असतात
पैशाने विकत घेता येणारी
तर काही प्रेमाने
आपलेसे करणारी...


काही नाही असतात
न जोडता सुद्धा टिकणारी
तर काही जोडून सुद्धा तुटणारी...

**कु. स्नेहल धनराजराव वैराळे**
बी.ए.भाग २

# आजची तरुणाई

**कु. दिव्या कैलासराव वगारे,** बी.कॉम. भाग १

हल्लीचे तरुण आपल्या दिसण्याकडे जरा जास्तच लक्ष देतात. पूर्वीचेही द्यायचे, मात्र ते यासाठी आजच्या तरुणांइतके आग्रही नसायचे. आज आपल्या असण्यापेक्षा दिसण्याकडे तरुणांचा कल वाढलेला दिसतो. आजच्या तरुणीमध्ये चित्रपट–मालिकांमधील नट्यांची नक्कल करण्याची जणू स्पर्धाच लागलेली आहे. ह्या नट्यांची केशरचना, मेकअप, कपडे, शूज लगेच कॉपी केले जातात. सगळ्यांचा आपला चांगला दिसण्यावर भर असतो. पूर्वीच्या मुली कॉलेजला जाताना साडी नेसायच्या नंतर सलवार–कमीजचा काळ आला जो आजही टिकून आहे, मात्र त्यात भर पडली वेस्टर्न लूक असलेल्या कमीज आणि जिन्सची. एखादी मैत्रिणी जरा जुन्या पद्धतीचे कपडे वापरत असेल किंवा साधी सरळ केशरचना अथवा साधे राहाणीमान असले तर लगेच तिला कालबाह्य ठरवलं जातं!



आताची मुलं जिममध्येच जास्त मिळतात. शरीर कमावणे ही चांगली गोष्ट आहे मात्र इथे फक्त शरीर कमावण्या किंवा तंदुरस्त राहाण्यासाठी नाही तर नवा लूक दिसण्यासाठी जिममध्ये जाणारे आहेत! फीट जिन्स, फीट टी–शर्ट घालून आपली डौलदार शरीरयष्टीचं दर्शन घडविलं जातं. टीव्हीवरील जाहिरातींमध्ये दाखविली जाणारी क्रिम्स, फरफ्युम्स मिळवण्याकडे त्यांचा जोर असतो.

थोडक्यात काय तर आजच्या तरुणांचा असा गैरसमज आहे की, जर तुम्ही चांगले दिसाल तरच लोक तुमची दखल घेतील नाहीतर तुमच्याकडे त्याचं साफ दुर्लक्ष होईल आणि चांगलं दिसण्यासाठी ह्या सर्व गोष्टी करायलाच लागतील. पण ह्या सर्वांपेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाचं आहे ते तुमचं चांगलं असणे! लोकांनी तुमचे दिसणे नाही तर तुमचे वागणे, बोलणे, तुमचे गुण व तत्त्व यांच्यामुळे तुम्हाला ओळखायला हवे आणि हीच ओळख तुम्हाला त्यांच्या चिरकाळ स्मरणात ठेवेल!

अंगावर आपल्या नावाचे किंवा वेगवेगळ्या डिझाईनचे टॅटूज काढून घेण्याची फॅशन आता सगळीकडे चांगलीच कॉमन झाली आहे, मात्र उत्साहाच्या भरामध्ये टॅटू काढताना विशेष असा विचार केला जात नाही. एखाद्या सेलिब्रेटी किंवा मित्राने काढलेल्या टॅटू आवडला की अगदी तसाच टॅटू आपल्याला हवा असतो. मात्र टॅटू काढून घेताना त्यामागील संकल्पनेचा किंवा अर्थाचा विचार करणे गरजेचे आहे. एखाद्याच्या कॉपी स्टाईलमुळे तुम्ही स्वतःची मूळ ओळख हरवून बसाल आणि तुमच्यामध्ये स्वतःची स्वतंत्र अशी ओळख निर्माण करण्याची इच्छा नाही असे इम्प्रेशन तुमचे समोरच्यावर पडू शकते. साधारणतः टॅटू म्हणजे तुमच्या व्यक्तिमत्वाला, विचारांना व्यक्त करण्यासाठी वापरण्यात येणारे माध्यम आहे.

आपला देश एक वृक्ष आहे, या देशातील हजारो वृक्षतोड आज आपल्या भारत देशातील लोक करीत आहेत. 'आजची तरुणाई' ही एक कविता बनलेली आहे–

हरवली आहे आजची तरुणाई
गुरफटली आहे फेसबुकच्या
जाळ्यात विसरून खरी–खुरी
परिवर्तनाची लढाई अडकली आहे
व्हाटस्अॅपच्या नादात
कुठे गेले वाडवडिलांचे संस्कार
विसरून गेले का संस्कृती पार
प्रेमभंगात रडणारे

मारणारे हे काय दिव्य करून
दाखवतील
फक्त सोशल साईट्स
वरतीच
आपलं रडगाणं गात
राहतील
शोधतोय मी त्या
तरुणाईला जीज पेटून उठेल
अन्यायाला दाखवून देईल साऱ्या
जगाला करू देणार नाही
अन्याय कुणाला !

❑ ❑ ❑

# आई

आईसाठी काय लिहू,आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे शब्द नाहीत कोठे
आईवरती चित्रण करण्याइतपत नाही
माझे व्यक्तिमत्व मोठे...

जीवन हे शेत तर आई म्हणजे विहीर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी...

आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातली छत्री
आई तू थंडीतली शाल
आता यावीत दुःख खुशाल

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी
अशी संतवाणी...

आई म्हणजे वाळवंटातील प्यावं
असं थंडगार पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची
सर्वात पहिली आरोळी...

**कु. प्रगती देविदासराव वंडे**
बी.कॉम.भाग १

# सुखाचे सोबती

तुम्ही आनंदात असाल तर लोक
तुमच्या जवळ येतील
तुम्ही दुःखात असाल तर लोक
पाठ फिरवतील आणि जातील
तुमच्या सर्व सुखात त्यांना
भागीदार व्हायचं असतं
पण तुमचं दुःख त्यांना नको असतं
तुम्ही आनंदात असाल तर तुम्हाला
खूप चांगल्या प्रकारचे मित्र मिळतील
तुम्ही दुःखी राहाल तर
सगळ्यांनाच तुम्ही गमवाल
तुमचं मधुर मद्य कोणी नाकारणार नाही
परंतु आयुष्याचं कडू घोट तुम्हाला
एकट्यानेच प्यावे लागतील
हे सत्य जाणून घेतले तरच
सुखाचे सोबती व्हाल.

**संकेत गजाननराव चौधरी**
बी.ए भाग ३

# बाप

असा का रे बाबा तू
कितीही थकलास तरी
का नाही रे, चिडत तू

तू तुझ्या भावना
कधीच व्यक्त करीत नाहीस
तुझं माझ्यावरचं प्रेम
कधीच बोलून दाखवत नाहीस

तुझा कुठलाही त्रास
एक लेकच समजू शकते
तू कितीही नाही बोललास
तरी तुझं मन मीच वाचू शकते

तुझी शिकवण
आजही मला आठवते
तुझ्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण
मी रोजच जगत असते

रोज येते रे बाबा
तुझी आठवण मला
तुझी लेक आता मोठी झाली
हे कळलं ना रे तुला

**कु. गौरी शरदराव इखे**
बी.कॉम. भाग ३

# वैज्ञानिक दृष्टिकोन

**कु. दिपाली किसनराव बोडखे,** बी.कॉम. भाग १

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पाया आहे एक श्रद्धा! प्रथमदर्शनी हे म्हणणे कदाचित विचित्र वाटेल कारण पाश्चात्य समाजात विज्ञानाची जशी–जशी वाढ होत गेली, तशा–तशा जुन्या श्रद्धा आणि समजुती कोलमडून पडल्याने किंबहुना विज्ञानाची सुरुवातीच्या वाढीची कहाणी म्हणजे आधी असलेल्या श्रद्धांविरुद्धच्या संघर्षाची कहाणी आहे. त्यामुळे विज्ञान आणि एखाद्या श्रद्धेवरचा विश्वास या दोन गोष्टी नेहमी एकमेकांच्या विरोधात आहेत असेच वाटते. निदान वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पाया श्रद्धेवर आधारित असेल हे असंभाव्य वाटते.

पण खरी गोष्ट नेमकी उलटी आहे. आधीच्या श्रद्धांविरुद्ध विज्ञानाने यशस्वी मुकाबला केला. कारण खुद्द विज्ञानाचा पायाच श्रद्धेवर आधारित आहे. श्रद्धा ही माणसाच्या जीवनातली फार मोठी शक्ती आहे. त्याविरुद्ध लढा देणे ही सोपी गोष्ट नाही. श्रद्धाविहीन माणसांना ते जमणे शक्य नाही. अशा माणसांच्या दृष्टीने आयुष्य निरर्थक असते. अशी माणसे संघर्षासाठी उभीच राहू शकत नाही. कारण अंधश्रद्धेविरुद्ध संघर्ष करू शकते ही दुसरी श्रद्धाच.

विज्ञान ही मानवाच्या इतिहासातील इतकी महत्त्वाची आणि यशस्वी घटना ठरली, याचे कारण विज्ञानाचा पाया श्रद्धेवर आधारित आहे. हेच आहे परंतु ही श्रद्धा कशी? अत्यंत सच्ची! अत्यंत समर्थ! आहे 'सत्या'वरची श्रद्धा!

विज्ञानाचा सारा प्रवास हा सत्याच्या दिशेने चाललेला प्रवास आहे. सत्य शोधण्यासाठी प्रस्थापित करण्यासाठी तर सारी धडपड आहे. अगदी प्रथमपासून ते आजच्या घडीपर्यंत.

विज्ञानाचे जे सारे झगडे उभे राहिले आहेत ते या श्रद्धेमधून. ज्या समजुती ज्या श्रद्धा सत्याच्या विरोधात होत्या, त्यांच्याशी विज्ञानाला झगडा करावा लागला.

पहिला संघर्ष करावा लागतो तो गॅलिलिओला. गॅलिलिओचा जन्म १५६४ मध्ये झाला. आध्यात्मिक इत्यादि साधनांचा हस्तक्षेप करून निसर्गाची प्रक्रिया बदलता येत नाही ही वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणाऱ्या व्यक्तीची मूळ श्रद्धा होय. ही त्याच्याबरोबर असली तरी सर्वसमावशक नाही. मानवी जीवनाचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न या व्याख्येच्या कक्षेबाहेर पडतात. विज्ञानाला आंतरिक असे मूल्य किती नीतिमत्ता नाही. क्षणात प्रचंड विद्ध्वंस करणाऱ्या ॲटमबॉम्बमधील केंद्रकिय प्रक्रिया विज्ञानाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरते. समाजासाठी कल्याणकारी किंवा विनाशकारी ठरणाऱ्या विज्ञानाला खुद्द विज्ञानात मूलतः एकाच पातळीचे स्थान असते. विज्ञानाची आंतरिक मूल्यहीनता वैज्ञानिक दृष्टिकोनातही अपरिहार्यपणे येते का? विज्ञानात धर्म, कला, साहित्य व अध्यात्म यांना स्थान नाही. मग वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात या महत्त्वाच्या अनुभूतीना काहीच स्थान नाही का? बरं, जर आपण या इतर गोष्टींना वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या कक्षेबाहेर ठेवले तर त्यासंबंधी मार्गदर्शनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाला पूरक अशा दृष्टीची आपल्याला गरज वाटणारच. ती पूरक दृष्टी कोणती?

हे सर्व चकवणारे मुद्दे असून त्यांचे विश्लेषण करून कोणत्या एका निश्चित निष्कर्षावर पोहोचणे अशक्यप्राय आहे. प्रा.पानसे मात्र सदर पुस्तकात या गुंतागुंतीत गुंतले नाहीत. वैज्ञानिक दृष्टिकोन या संकल्पनेची तात्त्विक मीमांसा करणे हा लेखकाचा आग्रह नाही आणि ती करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला नाही. सदृढ सामाजिक आणि राजकीय परिवेशात वैज्ञानिक दृष्टिकोन टिपलेल्या संकेतांचे विवेचन या पुस्तकात आहे. भारतीय समाजात विविध संदर्भात बाळगलेले भ्रम, मिथ्याविचार, संकेत, कर्मकांड हे प्रा.पानसे यांच्या मते आपल्या समाजातील वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अभावाचे दुर्दैवी प्रमाण आहे. एकूण पुस्तकाचा सूर मात्र आशावादी आहे. प्रा.पानसे यांना विश्वास आहे की, आपल्या देशात विज्ञानाचा प्रसार झाला. विज्ञानाची पद्धती आणि त्याचा इतिहास लोकांत रुजविला गेला तर अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या अंधःकाराने दुर्गती झालेल्या भारतीय माणसाची चौफेर प्रगती होईल. विज्ञानाबद्दलची लेखकाची ही सकारात्मक भूमिका अर्थातच स्तुत्य आणि संपूर्णपणे समर्थनीय आहे.

हे पुस्तक सर्वसाधारण वाचकांसाठी आहे. त्यातील काही विधाने तत्त्वशास्त्राच्या दृष्टीने स्वयंपूर्ण नसतील. त्यात अनेक अनुल्लेखित गृहितके असतील असे असूनही सामान्य वाचकाला

समजेल आणि पेलवेल अशी तर्कसंगत आणि विवेकपूर्ण चर्चा पुस्तकात सर्वत्र दिसते. प्रा.पानसे विज्ञान आणि पेलवेल वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे पुरस्कर्ते असले तरी ते धर्म, अध्यात्म, कला व साहित्य या मानवाच्या विशाल अधिष्ठानांविरुद्ध उभे आहेत असे मला वाटत नाही. या अधिष्ठानाच्या सामाजिक, राजकीय पातळीवर होणाऱ्या उथळ, फसव्या आणि प्रतिगामी अविष्कारणाशी त्यांचा लढा आहे. पुस्तकातील प्रत्येक विधानाशी मी सहमत आहे असे नाही. पण त्यांच्या एकंदर विवेचनाची दिशा योग्य आहे. देशात वैज्ञानिक पद्धतीचा शिस्तीचा एक भाग आहे की, कोणत्याही प्रयोगाचा तपशील जेव्हा लिहायचा आहे तेव्हा सुरुवातीला त्या प्रयोगाचे उद्दिष्ट आणि वापरलेला साहित्य (Aim and apparatus) याचे थोडक्यात वर्णन लिहायचे असते. वैज्ञानिक दृष्टिकोनावरच्या या पुस्तकातही सुरुवातीला असेच उद्दिष्ट्य आणि उपयोगी पडलेले साहित्य यासंबंधी थोडक्यात लिहिणे अनुचित ठरणार नाही.

'वैज्ञानिक दृष्टिकोन' हा शब्दप्रयोग वाचकंना अनोळखी नसणार. तो वारंवार वापरला जातो. सर्वजण त्यांचे कौतुक आणि स्वागत करतात. पण बऱ्याचदा या शब्दप्रयोगाचा नेमका अर्थ काय, यासाबंधी मात्र गोंधळ असतो. आपल्याकडे 'वैज्ञानिक दृष्टिकोन' याचा अर्थ 'देवावर विश्वास न ठेवणे, ज्योतिषावर विश्वास न ठेवणे' असाच बहुदा केला जातो. पण वैज्ञानिक दृष्टिकोनाचे निकष असे नकारार्थी नाहीत. त्याला एक सकारात्मक बाजूही आहे. किंबहुना तीच अधिक महत्त्वपूर्ण आहे. 'वैज्ञानिक दृष्टिकोन' असला म्हणजे कशा–कशावर विश्वास नसतो ही यादी महत्त्वाची नाही. ती फारशी बरीही नाही. खरा शोध घ्यायला हवा तो तो कशा–कशावर विश्वास असतो त्या गोष्टीचा. या पुस्तकाचे एक उद्दिष्ट अशाप्रकारे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सकारात्मक, पॉझिटीव्ह पैलू प्रकर्षाने मांडणे आहे.

हे पुस्तक लिहिण्यासाठी उपयोगी पडलेले मुख्य साहित्य म्हणजे वाचन आणि चर्चा. ज्या पुस्तकांच्या वाचनाचा खूप उपयोग झाला, त्याची यादी या पुस्तकाच्या शेवटी दिली आहे. या पुस्तकातील चर्चेच्या ओघात यातील अनेक पुस्तकांचा उल्लेख वाचकांना आढळेल. एकाही पुस्तकांचा या विषयाच्या अभ्यासासाठी अप्रत्यक्ष उपयोग असे मत मांडले होते की, 'सूर्य स्थिर असून पृथ्वी त्याच्या भोवती फिरते' हे मतही ख्रिस्ती धर्माच्या श्रद्धेविरुद्ध होते. १५८४ सुमाराला ब्रूनोने या मताचा पुरस्कार करणारे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्याच्या या कृत्याबद्दल ख्रिस्ती धर्मसंस्थेने त्याला जिवंत जाळले होते. हा आहे जगातील वैज्ञानिक दृष्टिकोन.

❑ ❑ ❑

# प्रदूषण

हे माणसा तुच मला बनवतो
तुझ्या फायद्यासाठी
आणि तुच मला संपवतोस
तुझ्याच फायद्यासाठी...

तुच मला बनवलंय आणि
जगण्याची दिली संधी
आणि जावं लागतंय आता
कारण माझ्यामुळे आली
नदीच्या पाण्यावर मंदी

मला बनवून तू माझ्यावर
केलेस उपकार
पण माझ्या विरोधात
कठोर झाले आहे
सरकार...

माझ्या राहण्याने पर्यावरणाला
होईल त्रास
म्हणूनच मला घालण्यासाठी
तू दंड ठेवलास खास...

मी जाते आता सोडून माझी
काही नाही इच्छा
प्रदूषणमुक्त ठेवा तुम्ही
तुमचे पर्यावरण याचं
माझ्या सदिच्छा..!

**कु. अंकिता संतोषराव लेंडे**
बी.कॉम.भाग १

# जीवन आणि शिक्षण

**कु. समीक्षा मधुकरराव बालसराफ,** बी.कॉम. भाग १

यशस्वी जीवनाचा मूलमंत्र 'शिक्षण'

मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. तो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो तो तितकाच यशाच्या शिखरावर जाऊन बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसांच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मूलभूत अधिकारांसाठी महत्त्वाची असते. देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनविण्यात युवक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणाऱ्या शालेय शिक्षणाची आता देशाला गरज आहे.

विद्यार्थ्याला शिक्षणाचा आणि व्यक्तिमत्वाचा पाया शाळेतच रचला जातो, शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार मूल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यश अवलंबून असते. शाळेत मिळणाऱ्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने महत्त्व अनन्यसाधारण आहे. तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण. मानवतेच्या पुस्तकापेक्षा जास्त चांगले पुस्तक कोठे असू शकते असे महात्मा गांधी म्हणाले होते. खरी समस्या ही आहे की, वास्तविक 'शिक्षण' म्हणजे काय लोकांना त्याची कल्पना नाही. एखाद्या जमिनीचे किंवा एखाद्या वस्तूचे मोल मोजावे स्टॉक एक्सचेंज बाजारातील आपल्या शेअरचे मूल्यांकन करतो तसे आपण शिक्षणाचे मूल्यांकन करतो. जे शिकल्यामुळे विद्यार्थी जास्तीत जास्त पैसे कमवू शकतील असेच शिक्षण मुलांना घ्यावे असे आपल्याला वाटते. मात्र शिकलेल्यांच्या चरित्राचा विकास घडविण्याकडे आपण फारच थोडे लक्ष देतो.

शिक्षणची गरज नाही शिक्षण म्हणजे काही पुस्तके वाचली, परीक्षा दिली व उत्तीर्ण झालो असे नव्हे. शिक्षण म्हणजे माणसाच्या जन्मापासून मरणापर्यंत चाललेली शिकायची प्रक्रिया आहे. एकविसाव्या शतकातही आपल्याला कायद्याचा बडगा उगारून शिक्षणाचे महत्त्व सांगावे लागते. शिक्षणाचे खरे महत्त्व समाजात रुजलेच नाही त्यासाठी आपला समाजच कारणीभूत आहे. आपण केवळ आपल्या प्राथमिक गरजा व उपलब्ध साधन सामग्रीपर्यंत पोहोचलो आहे. देशाची प्रगती विकास व येणारी संधी याकडे आपले दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तानुरूप समाजातील प्रत्येक वर्ग जोपर्यंत सहभागी होत नाही. आपल्या प्रजासत्ताकाच्या राज्य घटनेला साठ वर्ष पूर्ण होत आली तरीही शिक्षणाचे सार्वत्रीकरण, समान नागरी कायदा ही मार्गदर्शक तत्त्वे घटनेच्या पुस्तकातच राहिली आहेत. संपूर्ण देश साक्षर व्हावा, सर्वांना हव्या त्या शिक्षणाची समान संधी मिळाली यासाठीचे प्रयत्न अपुरे पडले आहेत. आर्थिक विकासात शिक्षणात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. निरनिराळे विकास कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ वाढवून मानवी भांडवल निर्माण करण्याचे शिक्षण हे मुख्य साधन आहे. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन शिक्षणविषयक कार्यक्रम राबविले जातात. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच राज्य शासन सर्वसाधारण शिक्षणावर मोठा खर्च करतो. शिक्षण क्षेत्र गेल्या सात-आठ महिन्यांपासून या ना त्या कारणाने विशेष चर्चेत आहे. अर्थात राष्ट्रीय जीवनात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण असणे उचितच आहे. गेली दहा वर्षे संसदेच्या शिक्कामोर्तबाची वाट पाहात असलेले शिक्षणाचा अधिकाराचे विधेयक सहा ते चौदा वर्षे या वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्याला शाळेत पाठविणे हे पालकाचे कर्तव्य आहे. त्यात कसूर झाल्यास कायद्याने शिक्षा घेण्याचे प्रावधान आहे. शाळांवरही अशा प्रकारचे निर्बंध घालण्याची तरतूद विधेयकात आहे.

संविधानात मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात राजसंस्थेचे कर्तव्य म्हणून सर्वांना शिक्षणाची तरतूद होती. पण स्वातंत्र्यानंतर अर्धशतक उलटूनही प्राथमिक शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांची संख्या खूप मोठी आहे. म्हणूनच शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे आणि त्यासाठी सक्तीचे व निःशुल्क शिक्षण चौदा वर्ष वयापर्यंत प्रत्येक भारतीयला मिळण्यासाठी कायदा करणे आवश्यक ठरते. अर्थात केवळ कायदा करून निरक्षरतेची समस्या चुटकीसरशी सुटेल अशी अपेक्षा नाही. एक स्वयंसेवी संस्थेच्या गेल्या वर्षीच्या अभ्यासानुसार

भारतात किमान तीन कोटी मुलांनी शाळेचे तोंडही पाहिलेले नाही. शाळेची फी न भरल्यामुळे शाळा सोडणाऱ्यांची संख्या कोटीच्या वर आहे. आठव्या इयत्तेपर्यंत विद्यार्थी गळतीचे प्रमाण चौपन टक्के आहे आहे. दलित मुलींपैकी दहावी आधीच ऐंशी टक्के शाळा सोडताना तर आदिवासी गटातील मुलींपैकी शालेय शिक्षण अर्ध्यावर सोडण्याचे प्रमाण नव्वद टक्के आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणाचा हक्क कायद्याने मिळूनही त्याचा लाभ सर्वांना मिळविण्यासाठी देशाला दृढ संकल्प करून त्याची पूर्ती करण्यासाठी निर्धाराने काम करावे लागेल. संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास हे सर्व शिक्षणाचे उद्दिष्ट मानल्यास मूल्यमापन प्रत्येक विद्यार्थ्यांचा संपूर्ण व्यक्तिमत्वाचे त्याच्या क्षमता त्याची बुद्धिमत्ता, छंद, सवयी, वृत्ती, दृष्टिकोन, जीवनाविषयक मूल्ये, क्षमता आणि शारीरिक कृती या सर्व आयामांसह होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण पालक, संस्थाचालक, प्रशासन व विद्यार्थी या सर्व घटकांत जागृती आणि जिज्ञासा हवी म्हणून यशस्वी जीवनाचा मूलमंत्र 'शिक्षण' हेच आहे.

❑ ❑ ❑

## ती

कॉलेजची बात निराळी होती
नोटबुक फक्त हातात होती

वर्षभर धिंगाणा मौज मस्ती
तारीख आता आली परीक्षेची

ती नेहमीच माझी वाटच पाहात होती
माझी तिच्याकडे नजर गेली नव्हती

कॉलेजच्या ती ग्राऊंडफ्लोरवर उभी होती
शांत एकाकी एकटीच होती

दोघाचे अशी नजरनजर झाली
पाहातच पाऊस तिकडे वळली

जवळ जाताच तिही मग हसली
आज होणार तिचा जणू रात्री तिला

मग तिने मला व मी तिला साथ दिली
सोबतीत तिच्या संध्याकाळ झाली

मित्रांनो ती दुसरी तिसरी कोणी नव्हती
ती तर माझ्या कॉलेजची लायब्ररी होती

**कु. श्वेता दिलीपराव ढोमणे**
बी.कॉम.भाग ३



## ती म्हणजे

ती म्हणजे झुळूक ती म्हणजे वारा
ती म्हणजे पाऊस ती म्हणजे गारा
कधी ती पाखरांचे बोल कधी ती अबोल
कधी ती आकाश कधी ती दर्याहून खोल

कधी सापडते माझीच मला
कधी मनाच्या गावात
कधी पाहतो स्वप्नात तिला
कधी राधेच्या नावात

**अजय सुधाकरराव धुर्वे**
बी.ए.भाग ३

## एकदा तरी...

एकदा तरी आयुष्यात कुणी असे भेटावे
ज्याला आपल्या मनातील सर्व काही सांगावे
सांगता सांगता आयुष्य पूर्ण सरून जावे
आणि सरतानाही आयुष्य पुन्हा पुन्हा जगावे
ज्याला घेऊन सोबतीने खूप खूप चालावे
चालता चालता दूरवर खूप खूप थकावे
पण थकल्यावरही आधारासाठी त्याच्याकडे पाहावे
एकदा तरी आयुष्यात कुणी तरी असे भेटावे

दुःख त्याचे आणि अश्रू माझे असावेत
सोबतीने त्याच्या खूप खूप रडावे
आणि अश्रूंच्या हुंदक्यात सर्व दुःख विसरावे
आनंद त्याचा आणि हसू माझे असावे
त्याच्यासाठी मी जगतच राहावे, जगतच राहावे
आणि त्याच्यासाठी जगतानाच आयुष्य संपावे
एकदा तरी आयुष्यात कुणी असे भेटावे

ज्याच्या सोबतीच्या प्रत्येक क्षणाने सुखवावे
उन्हात त्याने सावली तर पावसात थेंब व्हावे
आणि मायेच्या थेंबानी मी चिंब भिजून जावे
एकदा तरी आयुष्यात कुणी तरी असे भेटावे

**कु. ऋतिका च. निंघोट**
बी.कॉम.भाग २

# युवकांमध्ये कौशल्य विकासाची गरज

**कु. दिव्या बळीराम भलावी,** बी.कॉम. भाग २

थोर विचारवंत स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस १२ जानेवारी हा 'राष्ट्रीय युवा दिवस' म्हणून १९८५ पासून सर्वत्र साजरा केला जातो. ते एक समाजसुधारक, तत्त्वज्ञानी आणि विचारवंत होते. तरुणांची शाश्वत ऊर्जा जागृत करण्याचा तसेच देशाचा विकास करण्याचा हा एक चांगला मार्ग आहे. विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये कवायत करून, स्वामी विवेकानंदावर भाषण, वक्तृत्व-वादविवाद स्पर्धा, गाणी, निबंधलेखन स्पर्धा व परिसंवाद इत्यादि साजरे केले जातात. युवापिढीला बऱ्याच कल्पनांना सामोरे जाण्यासाठी आणि प्रत्येक क्षेत्राचा योग्य मार्गाने विकास करण्यासाठी, योग्य योजना तयार करण्यासाठी राष्ट्रीय युवा दिवस ही एक सुवर्ण संधी आहे.

२०२० या वर्षासाठी 'राष्ट्र बांधणीसाठी युवा शक्ती एकत्रित करणे' ही परिकल्पना आहे. पण त्याआधी आपण २०२० मधील युवकांच्या आशा, आकांक्षा समजून घेतल्या पाहिजेत. सध्या युवापिढीपुढे संभ्रम आहे आणि मोठी समस्या आहे ती रोजगार व करिअरची. विसाव्या शतकात पदवी म्हणजे यशस्वी करिअर हे समीकरण होते. फार संघर्ष न करता १९९० पर्यंत नोकऱ्या उपलब्ध होत होत्या. आता हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. अनेक पदवीधरही हजारोंच्या संख्येने बेरोजगार आहेत. शिपायाच्या नोकरीला अनेक पदवीधर अर्ज करतात ही बाब शैक्षणिक अधःपतन दर्शविते. शिकून नोकरी मिळणार नसेल तर उच्च शिक्षण का घ्यायचे हा प्रश्न आजची युवापिढी जुन्या पिढीला विचारत आहे. यावर एकच उपाय म्हणजे कौशल्यवृद्धी. पदवी, कौशल्य, कार्यानुभव आणि दृष्टिकोन म्हणजे यशस्वी करिअर हे एकविसाव्या शतकातले समीकरण आहे.



कौशल्य हा सध्या परवलीचा शब्द झाला आहे. अनेक धुरिणांना कौशल्य म्हणजे कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची शिक्षणपद्धती असेच वाटते. हीच खरी शोकांतिका आहे. तेलाचे साठे सापडल्याने मध्य-पूर्व देशांचा विकास झाला. भारताचे खरे भांडवल आहे आपली युवाशक्ती, ती सुद्धा ग्रामीण भागातील. तिच्यावर जर योग्य संस्कार झाले व कौशल्याची कल्हई दिली तरच चमकदार व्यक्तिमत्वे विकसीत होतील. वेग, नवकल्पना, मूल्यवर्धन आणि बदल आत्मसात करणे हे आजच्या घडीचे मंत्र आहेत. बुद्धिमत्ता, आकलनशक्ती, व्यवहारज्ञान व माणुसकी या कुठल्याही बाबीत ग्रामीण युवाशक्ती कमी नाही. अनेक शहरी तरुण-तरुणीने खरे तर या बाबी ग्रामीण मित्रांकडून शिकल्या पाहिजेत. ग्रामीण युवकांचे प्रश्न अगदी साधे आहेत. आत्मविश्वास, संभाष कौशल्य, कार्यसंस्कृती, वेळ पाडणे व टापटीप या प्रमुख बाबींवर त्यांनी लक्ष दिले पाहिजे. व्यक्तिसापेक्ष अंगभूत कौशल्यांचा विकास करण्याकडे आपण खरोखरीच युद्धपातळीवर लक्ष दिले तर भविष्यात आपला देश फार वेगळे दिसेल.

पुढील दशकामध्ये आपणा सर्वांच्या खाजगी तसेच कामाच्या ठिकाणच्या जीवनशैलीत मोठे बदल होणार आहेत. विसाव्या शतकात जे नीतिनियम किंवा धोरणे लागू होती ती भविष्यकाळात कामास येणार नाहीत. त्यामुळे 'अनुभवी' असण्याची संकल्पनाच बदलणार आहे. व्यवहारज्ञान, प्रभावी संवाद साधण्याचे

कौशल्य, समूहामध्ये काम करण्याची तयारी व क्षमता या व अशा बाबींना आजच्या तुलनेत असाधारण महत्त्व येणार आहे. दुर्दैवाने आज या बाबींचे महत्त्व कोणालाही फारसे जाणवत नाही आणि त्यामुळे मुलामुलींना त्या शिकविल्या गेल्या पाहिजेत असेही वाटत नाही. जर आपल्याला जागतिक संधी हव्या असतील तर व्यवसायिक इंग्रजी व आणखी एका परदेशी भाषेचे शिक्षण घेणे अनिवार्य आहे. यासाठी ई-शिक्षण, वेब व टीव्ही या माध्यमांचा वापर अत्यावश्यक आहे. यादृष्टीने जपान ही सुवर्णसंधी असू शकते. उगवत्या सूर्याचा हा देश भारतीयांचे योगदान जाणतो. जपानचे सरासरी आयुष्यमान सत्तरच्या वर असल्याने आपला देश व आपली युवाशक्ती हा धोरणात्मक पर्याय अनेक जपानी विचारवंतांना पटला आहे. गरज आहे ती आपल्या देशातील शिक्षण पद्धतीला व युवापिढीला पटवून देण्याची. आज जर विवेकानंद हयात असते तर ते शिकागोऐवजी टोकियोला गेले असते.

आता एक अतिशय महत्त्वाच्या बाबीकडे मी वळणार आहे ती म्हणजे आजच्या जमानातल्या आपल्या समाजातील मुलींचे आणि महिलांचे स्थान, स्वतःचे विश्व साकार करण्यासाठी सरकारी मदतीवर आणि धोरणांवर अवलंबून न राहाणाऱ्यांमध्ये आपल्या महिलाही आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगाने त्यांच्यासमोर एका नव्या विश्वाची दारे उघडली आहेत आणि त्या त्या संधीचा भरभरून फायदा घेत आहे. बहुतेक सर्व आयटी कंपन्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. महिला म्हणून कोणत्याही सवलती न मागता, कोणत्याही आरक्षणाची मागणी न करताही आयटी आणि बीपीओच्या क्षेत्रात त्यांनी आघाडी मारली आहे. आजच्या वेगळ्या पठडीतल्या, अनेकविध रोजगारांसाठी महिला पुरुषां इतक्याच योग्य आहेत. त्या आपले लक्ष दिलेल्या कामावर जास्त चांगल्याप्रमाणे केंद्रित करू शकतात. क्रिकेट, राजकारण इ.च्या भानगडीत न पडता नवीन गोष्टी शिकण्याची त्यांची मानसिक तयारी जास्त असते. त्यामुळे युवापिढीच्या विकासाचा विचार करताना त्यात स्त्री-पुरुष असा भेद न करता सर्वांगीण विचाराची गरज आहे.

❑ ❑ ❑

# जीवनपुष्प

फुले शिकवितात..
गुलाब सांगतो
येता-जाता रडायचं नसतं
काट्याच सुद्धा हसायचं असतं

रातराणी म्हणते
अंधाराला घाबरायचं नसतं
काळोखातही फुलायचं असतं

सदाफुली सांगते
रुसून रुसून राहायचं नसतं
हसून हसून हसायचं असतं

बकुळी म्हणते
सावळ्या रंगाने हिरमुसायचं नसतं
ऋणांच्या गंधाने जिंकायचं असतं

मोगरा म्हणतो
स्वतःचा बडेजावपणा सांगायचा नसतो
सद्गुणाचा सुगंध मैलीवरूनही येतो

कमळ म्हणतो
संकटात चिखलात बुडायचं नसतं
संकटांना बुडवून फुलायचं असतं


**कु. सेजल नं. सातंगे**
बी.कॉम.भाग २

# मी शेतकरी बोलतोय

**अमन दिपकराव वानखडे,** बी.कॉम. भाग २

शेतकरी हा जगाचा पोशिंदा मानला जातो, परंतु आज कृषी व्यवस्थेची विपरित अवस्था त्यामुळे निर्माण झालेली हलाखीची परिस्थिती निर्माईण झाली.

मी शेतकरी बोलतोय, मीच अन्न पिकवतो व मलाच त्याच्या मोबदल्यात भाववाढ मागावी लागते. मीच अन्न पिकवतो आणि देशाची भूक भागवतो तरी सुद्धा मलाच एवढ्या उपासना सोसाव्या लागतात, मलाच त्याचा त्रास सहन करून घ्यावा लागतो. माझ्या शेतीची पेरणी सुद्धा माझ्या मनाने होत नाही, पाऊस लवकर आला तरीही पेरणी चांगली होत नाही व उशिरा आला तरी पेरणीत बिघाड होतो. पाऊस येतो मी पेरणी करतो पिकं उगवतात आणि पिके १०–१५ दिवसाची झाली की नेमकी ऊन जास्त प्रमाणात येते व पाऊस हा रुसून जातो व जवळपास २० ते २५ दिवस पाऊस येत नाही व त्या काळात माझी पिके करपून जातात. तरीही अधिक परिश्रम करून माझी पिके मी तयार करतो व उत्पादन प्राप्त करतो. माल घरी येतो तरी मला सुख प्राप्त होत नाही कारण त्याच्या भावासाठी मला महिनोगिणती वाट पाहावी लागते. मात्र भाव काही मिळत नाही व कर्जदाऱ्यांच्या त्रासामुळे मला कमी भावनात माझा माल हा कमी भावात विकावा लागतो.



आजच्या काळात सातवे वेतन लागू झाले व मात्र शेतकऱ्याच्या मालाला भाव हा चौथ्या वेतनचा आहे म्हणजे जो भाव चौथ्या वेतन काळातला आहे तो भाव आम्हाला परवडणारा नसूनही तरी मुकाट्याने सर्व काही सहन करणे फक्त शेतकऱ्यालाच शक्य आहे. शाळेतील शिक्षकांना ४० ते ५० हजार रुपये महिना आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांना १,२०,००० रु. आहे. मात्र काम हे ६ ते ७ तासच आहे. परंतु १०० ते १५० रु. मजुरीसाठी आम्हाला दिवसभर काम करावे लागते. आम्ही पिके घेतो व त्याचे उत्पादन करून ते बाजारपेठेत विकतो परंतु त्यामागचे परिश्रम न बघता दलाल हे कोणत्याही भावाला माझा माल मागतात. त्यांना काय माहिती की रात्री दोन वाजता त्या पिकाला मला पाणी घालावं लागतं तेव्हाही माझे अंतःकरण किती दुखावत असेल हे मात्र मलाच माहिती आहे आणि एवढ्या पैशात मी माझी स्वप्न कशी पूर्ण करू हेच मला कळत नाही. मात्र याची पूर्तता करताना कोणीच दिसून येत नाही.

माझ्या दोन मुलांची शिक्षणं मला पूर्ण करता येत नाही यापेक्षा दुर्दैवी माझ्यासाठी काहीच नाही. मला किंवा माझ्या अशाच काही अन्य भावंडांना त्यांच्या एका मुलाला शिकवावं लागत इतकं दुर्दैवी माझ्यासाठी दुसरं काहीच नाही. तर तुम्हीच सांगा की मी आत्महत्या नाही करणार तर काय करणार. जर शेतकऱ्याला आश्वासनावर जगवतात तर तुम्ही काही कामाचे नाही जर शासनाने आम्हाला थोडी मदत करून भाववाढ दिली तर आम्हाला कोणापुढे

हात पसरावे लागणार नाही. लोकं जसे म्हणतात ना की, या देशात शेतकरीच राजा होईल याचे तर काहीच अंश मला दिसून येत नाही. ह्या सर्व उपासना, हालअपेष्टा सोसून मला जिवंत जगावे लागते. मी माझ्या परिवाराची इच्छा पूर्ण करू शकत नाही हे खूप दुर्दैवी गोष्ट आहे. शेवटी माझ्यासमोर मला एकच पर्याय दिसतो तो म्हणजे आत्महत्या! कडू आहे पण सत्य आहे.

*'जो शंभर किलो गव्हाचं पोतं*
*सहजतेने उचलू शकतो तो*
*त्याला खरेदी करू शकत नाही*
*व जो खरेदी करू शकतो*
*तो उचलू शकत नाही ' (पु.ल.देशपांडे)*

अशीच माझी पण अवस्था झाली आहे. मला पोतं तर उचलता येते मात्र ते मी विकत घेऊ शकत नाही.

शेतकरी वाचवा, जग वाचवा!
जय जवान, जय किसान!

❑ ❑ ❑

## मित्र

आयुष्यात बदलत असते
वर्गातून ऑफीसपर्यंत
पुस्तकापासून फाईलपर्यंत
जिन्सपासून फॉर्मलपर्यंत
पॉकेटमनीपासून पगारापर्यंत
प्रेयसीपासून पत्नीपर्यंत
पण मित्र ते तसेच राहातात

**कु. शुभांगी राजेंद्र कापडे**
बी.कॉम.भाग ३

## आयुष्याला द्यावे उत्तर...

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखूनव नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

नको गुलामी नक्षत्रांची, भिती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन पुरावी स्वप्नाची...

असे दांडगा इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखून नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना...

संकटासही वाकवून सांगावे, आता ये बेहत्तर
नजर रोखून नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

पुरुन जावे असेही काही, दुनियेतूनही या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा

स्वर कठोर त्या काळाचाही, जगभर व्हावा कातर
नजर रोखून नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

**कु. यामिनी तुळशीदास कंगाले**
बी.कॉम.भाग १

## मैत्री

जिथे बोलण्यासाठी शब्दांची गरज नसते
आनंद दाखवायला हास्याची गरज नसते
दुःख दाखवायला आसवांची गरज नसते
न बोलताच ज्यामध्ये सारे समजते
ती म्हणजे मैत्री असते

**कु. शुभांगी राजेंद्र कापडे**
बी.कॉम.भाग ३

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज


**कु. दिपा ज. कुकडे,** बी.कॉम. भाग १

तुकडोजी महाराज यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. अंधश्रद्धा निर्मूलन व जातीभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनाचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला.

आत्मसंयमाचे विचार त्यांनी ग्रामगीता या ग्रंथातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषामध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी १९३५ साली 'मोझरी' येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते.

तुकडोजी महाराज हे आधुनिक काळात महान संत होऊन गेले. आडकोजी महाराज हे त्यांचा गुरू असून त्यांनी त्यांचे मूळचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे केले. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे, तर देशभर फिरून त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले. एवढेच नव्हे, तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. १९४२ च्या स्वातंत्र्य सग्रामात त्यांनी 'भारत छोडो आंदोलना'त भाग घेतला. त्यावेळी त्यांना कारावासही घडला. 'आते है नाथ हमारे' हे त्यांनी रचलेले पद त्या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते. या उत्कट तळमळीतून 'ग्रामगीता' हे तुकडोजी महाराजांचा ग्रंथ निर्माण झाला आहे.

*अरे! उठा उठा श्रीमंतांनो! अधिकाऱ्यांनो !*
*पंडितांनो ! सुशिक्षितांनो ! साधु-जनांनो!*
*हाक आली क्रांतीची।।*
*गावागावासी जागवा। भेदभाव हा समूळ मिटवा।*
*उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकड्या म्हणे।।*



अशाप्रकारे बोधप्रद वाङ्मय निर्माण करून त्यांनी खेड्याची सुधारणा काय, ती कशी करावयाची या बाबतीत मार्गदर्शन केले. याच प्रेरणेतून त्यांनी 'ग्रामगीते'ची निर्मिती केली. खेडेगावातील जनतेला कलात्मक वाङ्मय समजत नाही म्हणून त्यांनी रुचेल व पचेल अशा ओवीबद्ध भाषेत या ग्रंथाची रचना केली आहे. ती सुलभ,सुबोध, प्रसन्न व सर्वस्पर्शी अशी आहे.

तुकडोजी महाराजांनी खेडेगावाचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण केलेले आपणाला या ग्रंथात दिसेल. खेडेगावातील सामाजिक दुर्दशा, पीडा व त्यावर त्यांनी सुचविलेले इलाज अत्यंत प्रभावी आहेत.

'साधुसंत, देवधर्म'। मानवोद्धाराची त्यांचे कर्म।
तेचि आठवूनी उद्धरू ग्राम। तुकड्या म्हणे।।'

अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज येथे आश्रमाची स्थापना हे तुकडोजींच्या आयुष्यातले लक्षणीय कार्य आहे. त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. 'ग्रामगीता' ही जणू तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयसेवेची पूर्तीच होय. ग्रामगीता ही जणू तुकड्यास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले याची जाणीव होती. खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल याविषयी जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सूचविली होती ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे, प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळाले असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटलेले आहे.

सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंतांच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक, सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार करीत असत. गुरुकुंज आश्रमाच्या शाखोपशाखेची स्थापना करून त्यांनी शिस्तबद्ध सामाजिक कार्यकत्यांची एक फळीच निर्माण केली.

श्री तुकडोजी महाराज आज कित्येक वर्षे अखंड जनसेवेत राबत आहेत. ग्रामीण जनतेची सेवा हा एकच ध्यास त्यांनी धरला होता. अशारीतीने निर्माण झालेल्या ग्रामरचनेच्या कोणत्याही अंगाकडे त्यांचे सहसा दुर्लक्ष झाले नाही. संत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीते'सारख्या सुलभ, सुबोध व सर्वस्पर्शी ग्रंथाला प्रस्तावनेची आवश्यकता नाही. देवघरात शांतपणे तेवणाऱ्या नंददीपासारखा हा ग्रंथ आहे.

❑ ❑ ❑

## साद आईची...

महिनेमागून महिने शेवटी वर्ष सरून जाते
वृद्धाश्रमाच्या पायरीवर वाट तुझी पाहते
भिजून जातो पदर अन् मन रिते राहते
कधी मधी मात्र तुझी मनीआर्डर येते
पैसे नकोत यावेळी तूच येऊन जा
बाळा मला तुझ्या घरी घेऊन जा

तुझा बा होता तोवर काळ बरा होता
तुझी आठवण काढत उघड्या डोळ्यांनी गेला
शेवटपर्यंत सांगत होता लेक माझा भला
तू मोठा साहेब त्याचं मोठं कौतुक त्याला

दुष्काळाच्या साली तुझा जन्म झाला
तुझ्या दुधासाठी आम्ही चहा सोडून दिला
तुझ्या घरची कामवाली म्हणून घेऊन जा
पण बाळा मला तुझ्या घरी घेऊन जा

थकले रे डोळे बाळा प्राण कंठी आले
तुझ्याविण जगणे कठीण झाले
आता तुझ्या थडग्यापाशी 'आई' म्हणून जा
जमलंच तुला तर हा वृद्धाश्रम पाहू जा.

**कु.पूजा अशोकराव चौधरी**
बी.कॉम.भाग २

## स्त्री स्वतंत्र झाली का?

शिक्षणाची दारे खुली आहेत
पण विचाराची कवाडे बंद आहेत
स्त्री स्वातंत्र्यची कल्पना
फक्त कल्पनाच आहे
गल्ली बोळातल्या मुली
अजून उंबरठ्याच्या आतच आहे
पतीला परमेश्वर मानणारी स्त्री
चूल आणि मूल यातच अडकून आहे
बलात्काराचे खटले अजून चालूच आहे
हुंडा घेणाऱ्या नराधमांची
संख्या ही वाढतच आहे
विज्ञानाच्या अविष्काराने फायदा घेऊन
गर्भाशयातच तिचा शेवट होतो आहे
फक्त काय?
एक किरण बेदी
एक कल्पना चावला
एक ऐश्वर्या झाल्याने
स्त्री स्वतंत्र झाली काय?

**भाग्यश्री गजानन निकम**
बी.ए.भाग-१

## नोकरी

हीच आहे मित्रा गरिबाची कहाणी
हातात डिग्री, डोळ्यात पाणी।
नोकरीसाठी फिरता फिरता
बरबाद झाली सारी जवानी ।।

मोठ्या नशिबानं मित्रा
इंटरव्ह्यूचा कॉल आला।
हुशारी अंगात होती म्हणून
इंटरव्ह्यू चांगला झाला।।

नोकरी मिळेल या आशेनं
मला फार आनंद झाला।
ह्याचवेळी अधिकाऱ्यानं
दहा हजाराचा डिमांड केला।।

कादग उडून जाईल म्हणून
कागदावर वजन ठेवावं लागतं।
नोकरी पाहिजे असेल तर
डिमांडवर लक्ष ठेवावं लागतं।।

नोकरीसाठी हुशारी पाहिजे
असंच मला वाटत होतं।
डिग्री नको, वशिला
हे तर मला माहितच नव्हतं।

घरी जाऊन सांगायचं काय
हाच विचार करत होतो
नोकरी मिळत नाही म्हणून
नशिबाला दोष देत होतो।।

असा हा नोकरीचा खेळ
नशिबाला लागतो।।

**कु. नेहा अवधूतराव माहुरे**
बी.ए.भाग ३

# तयांचे व्यर्थ न हो बलिदान

**कु. धनश्री रोडे,** बी.ए. भाग १

या देशासाठी आपल्या सर्वस्वाचे दान करणाऱ्या देशकार्यापुढे आपल्या वैयक्तिक स्वार्थाला तुच्छ लेखणाऱ्या आणि स्वराज्यासाठी हसतमुखाने मरणाला पत्करणाऱ्या तसेच आज भारतभूचे रक्षण करपताना हौतात्म्य पत्करावे लागले अशा सर्व शहीद देशभक्तांना मी सर्वप्रथम वंदन करतो.

ज्याप्रमाणे नदी आपल्या पाण्याचा उपयोग स्वतःसाठी करीत नाही. वृक्षाची सावली ही स्वतःपेक्षा इतरांसाठी असते. मेघ कधीही स्वतःसाठी पर्जन्यवृष्टी करीत नाही त्याचप्रमाणे थोर महापुरुष स्वतःसाठी कधीच जन्म घेत नाही. आपल्या भारतमातेसाठी अनेक स्वातंत्र्यवीरांनी बलिदान दिले मात्र  त्याचा विसर आज भारतीयांना पडत चालला आहे. नाहीतर त्यांनी सांगितलेली तत्त्वे आज धुळखात पडली नसती. महात्मा गांधीचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सिंहाचा वाटा आहे. स्वातंत्र्य काळात त्यांच्या एका हाकेला विदेशी मालाच्या होळ्या पेटल्या, अहिंसेच्या मार्गाने आंदोलन झालीत, त्यांच्या सत्याग्रहाच्या शस्त्रामुळे ब्रिटिश शासन डामडोल झाले. मात्र गांधीजींचे देहावसान झाले आणि भारतीय माणूस त्यांचे तत्त्वज्ञान विसरला. उत्पादन प्रक्रियेत आज आपण पाहातो आहोत की भारतात अनेक विदेशी मालाच्या कंपन्या स्थापन झाल्या आहे. आपले सरकार सुद्धा त्याला पाठिंबा जाहीर करीत आहे. मात्र यामागे एक बाब आपण विसरतो आणि ती म्हणजे फक्त एका ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने भारतावर १५० वर्षे राज्य केले तेव्हा या शेकडो विदेशी कंपन्या काय करणार? हा प्रश्न आज महत्त्वाचा आहे. आता सरकार म्हणायचे तर लोकांचे म्हणजेच आपणच त्यांना अप्रत्यक्षपणे पाठिंबा देत आहो. स्वदेशी बरोबरच गांधीजींनी सत्य आणि अहिंसेचे तत्त्व सांगितले मात्र आज सगळीकडे असत्य आणि भ्रष्टाचाराचा व्यवहार माजला आहे. टेबलावरचे काम करण्यासाठी हात लावावा लागतो. गांधीजी हे अहिंसेचे पुजारी होते. मात्र आज त्यांच्याच देशातील माणूस हरवला आहे. सगळीकडे अहिंसा माजली आहे. गांधीजी भारतासाठी लढले, आपले सर्वस्व पणाला लावले. त्यांचे हे बलिदान व्यर्थ तर जाणार नाही ना? हा प्रश्न माझ्या मनाला पडतो. आज गांधीजी असते तर त्यांनी असे होऊ दिले असते काय? याचा विचार आपण करायला हवा. कारण–

'गांधीजीने हमको सिर उठाकर सिखाया
सच कहती हूँ गीता का एक अध्याय उन्हीने दोहराया।'

आपल्या मराठी एक सुभाषित आहे. 'झाले बहू, होतील बहू, असेलही बहू परंतु या सम हा' या न्यायाला उरणारी अनेक क्रांतिकारक भारतात होऊन गेलेत. सुभाषबाबू, सुखदेव, चंद्रशेखर, भगतसिंह, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारखे अनेक देशभक्त भारतमातेच्या पोटी जन्माला आले. मात्र आता होणे शक्य नाही. कारण आजची परिस्थिती तशी असली तरी लोकांची मनःस्थिती तशी राहिली नाही.



क्रांतिकारक देशासाठी सर्वस्व त्यागणारे होते मात्र आज वैयक्तिक स्वार्थासाठी देश विघातक कार्य करण्याची लोकांची मानसिकता बनली आहे. राजकारणी सुद्धा स्वतःपुढे देशाला कवडीचीही किंमत देत नाही. टिळकांनी परदेशी शिक्षणावरच बहिष्कार टाकला. मात्र आज भारतातील युवक परदेशात शिक्षणासाठी जात आहे. नेहरूला जग शांतीदूत म्हणून ओळखतात. मात्र भारतात सर्व बाजूने कलह माजला आहे. महात्मा फुले आयुष्यभर स्त्रियांच्या विकासासाठी झटले. मात्र आज त्यांच्याच देशात स्त्रियांवर अत्याचार होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समानता सांगितली मात्र आज भारतात अस्पृश्यता वाढली जात आहे, हे कितपत योग्य आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एकदा खटल्याच्या न्यायालयात सांगितले की, 'माझी छाती फाडून पाहिली तर त्यात माझ्या भारतमातेचे चित्र दिसेल' केवढी ही देशभक्ती आणि नेमक्या याच देशभक्तीचा आपल्यात विचार व अभाव नसते. यावरून असे लक्षात येते की, शहीदांचा, क्रांतिकारांचा भारतीयांना विसर पडत चालला आहे आणि मनात एक गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते की यांचे बलिदान निष्प्रभ तर ठरणार नाही ना? पण मनाला शांत गारवा वाटतो ते आपल्या जीवनाचे कार्य पाहून आपले जवान आपले प्राण तळहातावर घेऊन शत्रूशी सामना करतात आणि त्यातच वीरगती प्राप्त होते.

हे सर्व आपल्या देशभक्तीची प्रचिती आणून देतात. अक्षरधाम मंदिरातील अतिरेक्यांचा खात्मा करण्यासाठी निधड्या छातीने समोर गेलेले जवान स्वतःसाठी नाहीतर देशासाठी समोर गेले हे वीर जवान आपल्याला या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांची आठवण करून देतात. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपण आपला मार्ग निश्चित करावा. हेच जवान आजचे सुभाषबाबू, भगतसिंग आहे म्हणून प्रत्येकाने या देशासाठी फूल नाही तर फुलाची पाकळी तरी कार्य करावे तरच या शहिदांचे बलिदान वाया जाणार नाही. अन्यथा काय होईल हे आपण जाणताच. शेवटी एक सांगू इच्छितो–

*'खुदा की यह दो चार दिन की जिंदगी*
*क्यों इसे युही बरबाद करे।*
*यारो जिंदगी मे कुछ ऐसा कर जाओ*
*जिसे जमाना याद करे।।'*

म्हणून या शहिदांचे बलिदान वाया जावू देऊ नका कारण यात आपल्या देशाचा अपमान आहे. ती फार लाजीरवाणी गोष्ट आहे. तेव्हा या उठा, कार्य करा आणि पुन्हा असे म्हणण्याची पाळी येऊ देऊ नका.

तयाचे व्यर्थ न हो बलिदान!

❑ ❑ ❑

# शिवजी महाराज तुम्ही पुन्हा हवेय...!

छत्रपती शिवाजी महाराज, नमस्कार!
नाही, सॉरी मला करता येणार नाही मुजरा कारण,
मुजरा करायला वाकेल आणि माझ्यावर पडतील नजरा,
ऐकताना थोडं खटकेल
वाटेल हे राज्यात चाललंय काय,
पण, दुर्दैवाने येथे नाही सुरक्षित
कोणाची बहीण, कोणाची माय,
आपल्याच मातीत चालताना
स्वतःची माती होताना पाहावं लागतं,
एकटा आला तर लढता येईल
पण, झुंडीपुढे नमावंच लागतं
उपभोग तर घेतातच
नंतर जीवनिशी मारतात
शिक्षा व्हायचं लांबच
फक्त कॅन्डल मार्च चालतं,
अत्याचार होतो दहा मिनीटात
नंतर, दहा वर्ष न्यायाची वाट पाहावं लागतं
न्यायाच्या प्रत्येक टप्प्यावर पुन्हा तेच ते सांगावं लागतं
शिवरायांचे फक्त धडे वाचले आम्ही
त्यातून धडा तर आम्ही काही घेतलाच नाही
शिवशाहीचा विचार चांगला पण,
लोकशाहीला पेलत नाही
वाईट वाटचं महाराज,
अहो, पण नुसतंच वाईट वाटतं,
पेपरमधल्या बातम्या वाचून फक्त
पाणी डोळ्यामध्ये दाटतं
महाराज, आज पुन्हा तुमचा अवतार
आम्हा बायकांना हवाय
तिथल्या तिथे फैसला देईल
असा शासक आम्हाला हवाय
असा शासक आम्हाला हवाय.

**कु. प्रिया राजेंद्रराव झोडगे**
बी.ए.भाग ३

# पर्यावरण व्यवस्थापन

**कु. सृष्टी रूपराव म्हाला,** बी.ए. भाग २

पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासात अभिप्रेत असल्याने समन्वय पर्यावरण हा विषय सर्वस्पर्शी मानला जातो. पर्यावरण भूगोलाच्या अभ्यासात विविध प्रश्नांची शास्त्रीय उकल करून घेणे आवश्यक असते. पर्यावरण भूगोलात मानव व त्याच्या भोवतालचा परिसर यांच्यातील बदलत्या संबंधाचा अभ्यास केला जातो. अशा बदलाचा उहापोह पर्यावरण भूगोलात केला जाते म्हणून पर्यावरणशास्त्राचे स्वरूप बदलते.

पर्यावरणातील विविध घटकाचा आपापसात क्रिया-प्रतिक्रिया होऊन पर्यावरणीय आकृतिबंध किंवा संख्या तयार होते. पर्यावरण यांचे स्वरूप आंतरविद्याशालेय असल्याने पर्यावरणातील एखाद्या समस्येची छाननी करण्याआधी त्यावरील समस्येची मूळ शोधणे आवश्यक असते. जमिनीची धूप, लोकसंख्या विस्फोट, प्रदूषण यासारख्या समस्याचे मूळ पर्यावरणाशी निगडीत आहे.

पर्यावरणातील उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर योग्य करणे हिताचे म्हणूनच तर पर्यावरण हे मानवास उपयुक्त साधनसंपत्तीचे भंडार आहे. पूर्वी मानवाच्या मर्यादित गरजेनुसार याचा वापरही मर्यादित होता. अलिकडे अमर्याद गरजांमुळे विविध साधनसंपत्तीचा वापर अनियंत्रित पद्धतीने चालू आहे.

औद्योगिकीकरण वाढले, शहरीकरण वाढले, साधनांचा अनिर्बंध वापर त्याच्या नियोजनाचा व व्यवस्थापनाचा अभाव यामुळे पर्यावरणात अनेक समस्या निर्माण होत आहे. या समस्याचा अभ्यास करणे हा पर्यावरणाला महत्त्वाचा विषय आहे. पर्यावरणाची अवनती व जल, भूमी, हवा व ध्वनी इत्यादी प्रदूषणात समावेश होतो. अशा प्रदूषणाचे परिणाम प्रदूषण नियंत्रण इत्यादीचे विवेचन व विश्लेषण पर्यावरणात करण्यात येते. पर्यावरण कायदे लागू करण्यात येणाऱ्या अडचणी पर्यावरणाचे संतुलन टिकवून राहावे आणि स्वच्छ पर्यावरण राहावे यासाठी वेळोवेळी भारत सरकारने विविध कायदे केले. यासाठी स्व.इंदिरा गांधी यांच्या काळात स्वतंत्र पर्यावरण खाते होते. त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा स्थापन केली परंतु तरीही तेव्हापासून ते आजपर्यंत कायद्याचे काटेकोरपणे पालन करण्यात आले नाही व निटपणे अंमलबजावणी सुद्धा झाली नाही व त्यामुळेच वेळोवेळी करण्यात येणारे कायदे अयशस्वी ठरले आहे.

❑ ❑ ❑



## जीवन

मला माहीत नव्हतं
जीवन असं जगायचं असतं
गत आयुष्याच्या संगतीनं
जीवनात पुन्हा आणायचं नसतं

मान सन्मान मिळाला नाही तर
नाराज व्हायचं नसतं
वाईट कुणी बोललं म्हणून
मनावर एवढं घ्यायचं नसतं

विश्वासघात झाला तरी
दोष मात्र कुणाला द्यायचं नसतं
प्रेम हे सर्वांवर करायचं असतं
त्यात मात्र कधीच गुंतवायचं नसतं

दुःख आलं तरी मन दुःखी
राहून चालायचं नसतं
आपली दुःख इतरांना
सांगायची नसतात

दुःखात सुख मानून
जीवन असंच जगायचं असतं
यश जरी मिळालं नाही तरी
निराश मात्र व्हायचं नसतं

**कु. वैष्णवी सुरेशराव दोडके**
बी.ए.भाग २

## स्त्री मागे राहणार नाही

सगळ्या तुझ्या अंधश्रद्धा
ठेव गाठोड्यात बांधून
दे छेद सर्व गृहितकाना
ठाम तो यात चालून

कसल्या आल्या पाळ्या बिळ्या
चल बाहेर पड ये बाहेर
डोळे भरून पहा हे जग
सोड ती चूल तो काळा अंधार

उघड डोळे तू पहा झाली पहाट
सोड तुझी वैकल्ये सोड ते रहाट
हसून मोठ्यांनी कर गडगडाट
तुझ्याच साठी ठेवली मार्च आठ

पुन्हा परत जाऊ नकोस कोंदणात
अडकू नकोस त्या गोड गोंदण्यात
करतील स्तुती शब्द बुडवून मधात
फसू नकोस तू ठेव पक्के धान्यात

आठ मार्च नाही हे युग तुझे आहे
तुझ्यापुढे आता खुले आभाळ आहे
विहर स्वच्छंद नवे नवे करून छंद
स्त्री अबला नाही आता स्वयंसिद्ध आहे

**कु. दिक्षा प्रभाकर गंजीवाले**
बी.कॉम. भाग २

## समिधा

दुरुस्थ कुणी दे तुझ्या करी ही कविता।
वाहते जिच्यातून त्याची जीवन सरिता।।

खळखळे अडखळे सुके कधी फेसाळे
परी अखंड शोधे वाट समुद्रकरिता।।१।।

खळखळ प्रांत तो ही जेथून निघाली
पथ शोधीत आली रानातून अकेली।।२।।

नच रम्य राऊळे कलापूर्ण वा घाट
तीरावर तुरळक परी अंकुरती वेली।।३।।

नव पर्णाच्या ह्या विरळ मांडवाखाली
होईल सावली कुणाकुणास काहली।।४।।

कोपेल कुणी शाली कुणी दुर्वास
ह्या जळात समिधा भव्य हवी तुलाही।।५।।

समिधाच सख्या या त्यात कसा ओलावा।
कोठून फुलापरी वा मकरंद मिळावा।।६।।

जात्याच तुझं या टाकच त्या आकांक्षा
तवर आन्तर अग्नी क्षणभर तरी फुलवावा।।७।।

**योगेश गोपाळराव माहोरे**
बी.ए.भाग ३

# डेबूचा गाडगे बाबा होताना

**अनिकेत पाडुरंग बंड,** बी.कॉम. भाग २

'डेबूचा गाडगे बाबा होताना' यामध्ये त्यांच्या बालपणातील घटनांचा परमार्श त्यांच्या शब्दात व्यक्त केलेला आहे. त्यांच्या बालपणापासूनच्या परिसरात घडणाऱ्या घटनांमधून डेबूच्या मनावर होणारा परिणाम व त्यातून निर्माण झालेले गाडगेबाबांचे व्यक्तिमत्व त्यांनी कसे दृढ केले ते सांगितले आहे.

गाडगे बाबा हे सांगतात की, जुन्या रुढी-परंपरा ह्या बदलायला हव्यात ते लोकांना पटवून सांगतात. दर्यापूर (जि.अमरावती) येथील घटना त्यांनी समक्ष बघितलेली आहे. दर्यापूर या गावात दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी रेडा कापण्याची प्रथा होती. तिथे गाडगे बाबा पोहचतात व ते म्हणतात 'मुक्या जिवाला कापू नका' अशी गाडगे बाबा विनंती करतात. पण लोक काही ऐकेनात. ते म्हणतात की, आमच्या देवाला रक्त पाहिजे अशी प्रथा आहे असे गावकरी मंडळी म्हणते. मग तेव्हाच बाबा म्हणाले, 'असं कसं?..रगत लागीन? आणि जर तसंच असेल तर तुम्ही माह्य रगत घ्या' बाबा मोठ्या निर्धाराने सर्व जमावाला रोखून धरतात व जे लोकांच्या मनात रूढी-परंपरेने ग्रासलेल्या जमावाला बाबांचा निर्धार थांबवतो.



**लोकांची मानसिकता बदलविणे आवश्यक-**

समाजामध्ये अनेक प्रकारच्या भावना व श्रद्धा निर्माण झालेल्या दिसून येतात. लोक म्हणतात की, आपल्या देवाला रक्तच हवे अशाप्रकारची लोकांची श्रद्धा होती. बाबा जीव पणाला लावून भिडलेल्या जमावाच्या समोर जातात. त्यांना त्यांचा जीव जाण्याची भिती असताना सुद्धा मुक्या जनावारांच्या जिवासाठी जिवाच्या आकांताने बाबाने टाहो फोडला व लोकांची मानसिकता बदलविली.

गाडगे बाबा सांगतात की, जे बालअवस्थेत मनावर जे संस्कार होतात त्याचनुसार त्या-त्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण होत असे. असे कोणत्याही सामन्यपणे निर्धारण केले जाते. घरातील किंवा समाजातील अवतीभोवतीचे वातावरण त्याच्या व्यकितमत्वाचा जडण-घडणीला हातभार लावला असते. असमान्य माणसांचे व्यक्तिमत्व परिस्थिती घडवत असते याचा प्रत्यक्षपणे गाडगे बाबाच्या जीवनात प्रकर्षाने जाणवतो.

ते सांगतात की, डेबूचा जन्म ज्या घरात, कुळात, ज्या जातीत, ज्या विभागात झाला त्या भागातील रुढी व प्रथा होत्या. कमालीचे अज्ञान, अडाणीपणा, अंधश्रद्धा, देवभोळेपणा, धर्मखुळेपणा, व्यसनाधीनता या अशा प्रकारच्या कारणामुळे शेती असूनही कर्ज होते. कर्जबाजारीपणामुळे आर्थिक ढासळलेपणा सर्वत्र दिसून लागले होते. त्या प्रथा व रूढीमुळे आनंद असो की दुःख त्या प्रसंगाला कोंबडे-बकरे कापणे व दारू पिणे हा त्या रूढी-परंपरेचा अपिरहार्य एक असा भाग बनला होता.

त्याच व्यसनामुळे डेबूच्या वडिलांची झिंगराजीची शेतीवाडी गेली व चंद्रभानमामाच्या डोक्यावर सर्वप्रकारच्या कर्जाचा डोंगर वाढलाय बालपणापासूनच डेबू हे सारे त्याच्या उघड्या डोळ्याने पाहात होता आणि त्याचवेळी त्याच्या मनात अनेक विचार आले, अनेक प्रश्न निर्माण झाले. त्याचे उत्तर शोधण्याचा तो प्रयत्न करीत होता. महारवाड्यातील त्याचे काही जिवाभावाचे मित्र पण होते. त्यांच्यासाठी ते कवठं, चिंचा, बोरं, आंबे, जांभुळ ते आणायचे व खायचे पण कधी शिदोरीमध्ये कांदा, चटणी नसली तर त्याचा मित्र

बंक्याला आपल्या डब्यातील भाजी, रायतं द्यायचा. त्या दोघांचेही अतूट अनामिक नाते होते, मात्र त्याची गावभर चर्चा व्हायची. समजा पाण्यात काठी मारली तर पाणी वेगळे व्हायचे नाही अशी त्यांची चांगली मैत्री होती.

समजा कोठेही तुम्ही सामान्य मान्य रुढीविरुद्ध बोलू शकत नाही तर त्याच्या समोरच्या माणसाला असे तोंड द्यावे याची कुवत व धैर्य, धाडस त्या सामान्य माणसामध्ये नसते. जो व्यक्ती अशा परंपरागत गोष्टींना विरोध करू शकतो तो सामान्याहून वेगळा असामान्य पुरुष ठरतो. गाडगे बाबा पण असेच एक असामान्य पुरुष होते.

**गाडगे बाबा आपला विचार लोकांच्या गळी उतरवतात–**

ते सांगतात की 'देवकीनंदन गोपाला' या चित्रपटात एक बहिरमचा प्रसंग आहे. बाबा लोकांना विचारतात की, मुके जनावर कशाला कापतात? यावर लोक म्हणतात की, वडिलोपार्जित चालत असलेली एक रीत आहे. बाबा म्हणतात, रूढी वाईट असली की ती परंपरा सोडू दिली पाहिजे.

गाडगे बाबा म्हणतात की, जसे आपण वावरातल्या रस्त्याने झाडे लावतो ते वाढते. डांगा अनेक पसरतात येणाऱ्या जाणाऱ्या बैलगाडीला अडथळा करतात मग ते आपण छाटतो. तशाच प्रकारे अशी ही रूढी पण तुम्ही लोक छाटून टाका असा संदेश लोकापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

❑ ❑ ❑

# चारोळी

मागितले तरी सुख उसनं मिळत नाही
प्रयत्नाशिवाय कधीच ध्येयाचं
शिखर गाठता येत नाही
आपल्यावर देवावर नेहमी निःसंकोच
विश्वास ठेवा
योग्य वेळी तो इतकं देतो की
मागायला काहीच उरत नाही

**अमरदीप प्रल्हादराव अमझरे**
बी.ए. भाग ३

# आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही

हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद

धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही

इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही

क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या

**कु. ऋतिका च. निंघोट**
बी.कॉम.भाग २


# राजमाता जिजाऊ यांची प्रेरणादायी व्यक्तिमत्व

**कु. अश्विनी अरुणराव राऊत,** बी.ए. भाग ३

महाराष्ट्राच्या आणि भारताच्या इतिहासातले सोनेरी पान म्हणजे ज्या स्त्री व्यक्तिमत्वाने इतिहासाच्या कालपटलावर आपल्या कार्याचा ठसा उमटविला त्यात अग्रभागी असणारे नाव व मराठी मनाचे शक्तीस्थळ म्हणजे जिजाऊ माँसाहेब.

विदर्भातील बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा येथे महाप्रतापी लखुजी जाधव राजे देशमुख व आई म्हाळसाबाई यांचे पोटी जन्माला आलेलं कन्यारत्न. स्वराज्य संकल्पनेचा प्रकाश घेऊन तेजोमय तळपले. पौष शुद्धपौर्णिमा पुण्य नक्षत्र गुरुवार, दि.१२ जानेवारी १५९८ रोजी उषःकाळी सूर्यादयाचे वेळी पहाटे महाराष्ट्राचा भाग्योदय झाला.

जिजाऊच्या मनात शौर्य, धाडस, पराक्रम, लढाया व आक्रमण इत्यादी विषयांचे संस्कार बालमनावर लखुजी राजे यांनी बिंबविले. वीरश्रीचे बाळकडू आपल्या चार भावासोबत घोडस्वारी, तलवारबाजी व नेमबाजीचे शिक्षण मिळविले. पवनगतीने घोड्यावर स्वार होऊन तलवार कशी चालवायची यात कौशल्य निपुण झाल्यात. त्यामुळे पुढे झुंजार स्त्री म्हणून जिजाऊची प्रतिमा तयार झाली. त्यावेळी संपूर्ण भारतवर्ष निरनिराळ्या शहाच्या सत्ता होत्या. त्यावेळी स्वराज्याच्या उभारणीचं स्वप्न बाळगून अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची प्रेरणा देण्याचे एक प्रभावी प्रगल्भ व्यक्तिमत्व म्हणजे राजमाता मातोश्री आऊसाहेब.



छत्रपती शिवाजी महाराजाच्या रूपाने महाराष्ट्राला व नव्या दृष्टीची उर्मी देणारी मातृशक्ती. आदर्श राज्यकर्ता, आदर्श स्त्री, आदर्श माता म्हणून लौकिकास आले. कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्व, प्रशासक, दृढस्वातंत्र्य, विचार, धुरंदर राजकारणी, जिद्द, चिकाटी, धाडस आणि धैर्याच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीमध्ये समर्थपणे राज्यसंकट पेलणाऱ्या राजमाता परकीय राजवटीत पराक्रमाने स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या शहाजी राज्याच्या वीर पत्नी. सामर्थ्य व साहसाने स्वराज्याचं स्वप्न स्वतःचे मुलाला प्रसंगी मृत्यूच्या दाढेत पाठविणाऱ्या रयतेच्या आऊसाहेब. अशा सर्वपैलू व्यक्तिमत्वाचे दर्शन होते म्हणून आणि म्हणूनच म्हणतात–

जिजाऊ, तुम्ही नसत्या त नसती दिसली अंगणात तुळस!<br>
जिजाऊ, तुम्ही नसत्या तर नसले दिसते मंदिराचे कळस!<br>
जिजाऊ, तुम्ही नसता तर नसते दिसली सुवासिनीच्या कुंकू माळी!<br>
पतिव्रताच्या किंकाळ्या मग दिसल्या असत्या रानोमाळी!

राजमाता जिजाऊ माँ साहेबांची कामगिरी समाजाला ज्ञात असली तरी त्यांच्या चारित्र्यामधून मिळणाऱ्या संदेशाचे पुनःस्मरण इतिहासाचे पाने उलटून पाहावे लागतील.

❑ ❑ ❑

# पर्यावरण व्यवस्थापन

**कु. साक्षी राजेंद्रराव दुर्गे,** बी.ए. भाग २

मराठी शब्दबंधातील पर्यावरण या शब्दाच्या व्याख्येनुसार सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. वैज्ञानिक पारिभाषिक कोशानुसार पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी इतर सजीव पर्जन्यमान, उंची, तापमान इत्यादी सर्वांचा समावेश होतो. मराठी विश्वकोशातील व्याख्येनुसार विशिष्ट वेळेचे पर्यावरण म्हणजे शिलावरण, जलावरण, जीवावरण व वातावरण या मुख्य भूवैज्ञानिक घटकांतील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचा परिणाम होय. मराठी विश्वकोशानुसार सर्व सजीव व पर्यावरण एकात्मपणे परस्पराश्रयी असतात. सजीवांना त्यांच्या जीवनसंघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते. अथवा अनुकूल असे बदल करावे लागतात. जे सजीव आपल्यात बदल घडवून आणण्यात कमी पडतात किंवा काही कारणास्तव ते स्वतःमध्ये बदल घडवू शकत नाही, त्यांना आपल्या प्राणास मुकावे लागते.

'पाणी अडवा, पाणी जिरवा'

पर्यावरण आणि मानव यांचे परस्पर संबंध नेहमी बदलत असतात. कारण जो बदल स्वीकारतो, तोच येथे तग धरून राहू शकतो. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे. निसर्गामधील सजीव आणि निर्जीव घटकांचा परस्पर संबंध म्हणजे इकॉलॉजी होय आणि ज्या विषयांतर्गत याचा अभ्यास केला जातो, तो म्हणजे पर्यवरणशास्त्र होय. पर्यावरणशास्त्र हा अनेक विषयांना स्वतःमध्ये सामावून घेणारा विषय आहे. ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अभियांत्रिकी, भूगोल, तंत्रज्ञान, अर्थसास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र, इतिहास व कला या सारख्या अनेक विषयांचा समावेश पर्यावरणशास्त्रामध्ये होतो. दिवसेंदिवस वाढत चाललेली मानवी लोकसंख्या व मानवाच्या वाढत जाणाऱ्या गरजा आणि त्यातून होणारे नैसर्गिक साधनसंपत्तीचे अतोनात नुकसान यामुळे पर्यावरणाची न भरून येण्यायोगी हानी होत आहे. आपली जीवनशैली बदलून पर्यावरणाकडे पाहाण्याचा मानवी दृष्टिकोन बदलण्यासाठी आज या विषयाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे.

'काम करा लाख मोलाचे
निसर्ग संवर्धनाचे'

'पर्यावरणशास्त्र' हे आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे. यामध्ये भौतिक, जैविक आणि माहिती विज्ञान (इकोलॉजी, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, खनिज विज्ञान, समुद्रशास्त्र, मृदा विज्ञान, भूविज्ञान) समाकलित करते. पर्यावरणाचा अभ्यास करणे आणि पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करणे प्रबोधनकाळात पर्यावरण विज्ञान नैसर्गिक इतिहास आणि वैद्यकीय क्षेत्रातून उदयास आले. आज ते पर्यावरणीय प्रणालीच्या अभ्यासासाठी



एकात्मिक व परिमाणात्मक दृष्टिकोन प्रदान करतात. अभ्यासाच्या संबंधित क्षेत्रामध्ये पर्यावरणीय अभ्यास आणि पर्यावरणीय अभियांत्रिकीचा समावेश आहे. पर्यावरणीय अभ्यासामध्ये मानवी संबंध, समाज आणि पर्यावरणाबद्दलची धोरणे समजून घेण्यासाठी अधिक सामाजिक विज्ञान समाविष्ट केले गेले आहे.

'संडास बांधण्या नाही म्हणू नये,
शौचाला लोटा घेऊन जाऊ नये'
'कापडी पिशवी घरोघरी
पर्यावरणाचे रक्षण करी'
'पाणी नाही द्रव्य,
आहे ते अमृतमूल्य'

पर्यावरण अभियांत्रिकी प्रत्येक बाबतीत पर्यावरणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी डिझाईन आणि तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करते. पर्यावरणीय शास्त्रज्ञ पृथ्वी प्रक्रियेचे आकलन, पर्यायी ऊर्जाप्रणालीचे मूल्यांकन, प्रदूषण नियंत्रण व शमन, नसैर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि जागतिक हवामान बदलाचे परिणाम यासारख्या विषयांवर काम करतात. पर्यावरणीय समस्यामध्ये भौतिक, रासायनिक आणि जैविक प्रक्रियेचा परस्पर संवाद असतो. पर्यावरणीय शास्त्रज्ञ पर्यावरणाच्या समस्येच्या विश्लेषणासाठी सिस्टीम दृष्टिकोन आणतात.

'पाणी देते प्रत्येक जिवास जीवनदान,
करू या पाणी जतन करणाचे सर्वश्रेष्ठ काम'

प्रभावी पर्यावरण वैज्ञानिकांच्या मुख्य घटकांमध्ये जागा, वेळ व संबंध तसेच क्वांटिटेटिव्ह विश्लेषणाशी संबंधित क्षमता समाविष्ट आहे. जटिल पर्यावरणीय समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी बहु-शिस्तबद्ध दृष्टिकोनाची आवश्यकता विशिष्ट पर्यावरण प्रोटोकॉल आवश्यक असलेल्या पर्यावरणीय कायद्याचे आगमन यावर आधारित १९६० आणि १९७० च्या दशकरात वैज्ञानिक अन्वषाचे एक सक्रिय क्षेत्र म्हणून पर्यावरणशास्त्र अस्तित्वात आले.

'पिण्यासाठी हवे शुद्ध पाणी
नाही तर होईल आरोग्याची हानी'

वातावरणात सर्व नैसर्गिक संसाधने समाविष्ट आहेत जे आपल्या सभोवताली अनेक मार्गांनी मदत करतात. ते आपल्याला वाढण्यास आणि विकसित करण्यास चांगले माध्यम प्रदान करते. या ग्रहावर आपले जीवन जगण्याची गरज असलेले सर्व काही आपल्याला देते. तथापि, आमच्या वातावरणास नेहमीच कायमस्वरूपी राखून ठेवण्यासाठी आपल्या आयुष्याचा नाश करण्यासाठी कधीही आपल्याकडून काही मदत केली पाहिजे. मानव निर्मित तांत्रिक आपत्तीमुळे आपल्या पर्यावरणाचे घटक दिवसेंदिवस घटत आहेत. शांत आणि स्वस्थ जीवन जगण्यासाठी स्वच्छ वातावरण अत्यंत आवश्यक आहे. पण आपला पर्यावरणाकडे काही दुर्लक्ष होत आहे कारण माणसाची तापटपणा आहे. ही एक समस्या आहे जी प्रत्येकास विशेषतः आमच्या मुलांबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीने घेतलेल्या लहान चरणसह आपण आपला पर्यावरण अतिशय सोप्या पद्धतीने वाचवू शकतो. एका कुटुंबातून एक झाड जरी लावले तरी याचा पर्यावरणावर चांगला परिणाम होईल.

'पाण्याच्या स्वच्छेतेविषयी दक्षता घेऊन
सर्व रोगराईंना दूर पळवू
जर पर्यावरणाची काळजी जी घेईल
तर आपला देश महान होईल'

'पर्यावरण बचाओ, आज यही समय की मांग है
पर्यावरण बचाओ, ध्वनि, मिट्टी, जल, वायु आदि सब,
पर्यावरण बचाओ...
जीव जगत के मित्र सभी ये, जीवन हमें देते सारे
इनसे अपना नाता जोडो, इनको मित्र बनाओ
पर्यावरण बचाओ...
हरियाली की महिमा समझो, वृक्षों को पहचतानो
ये मानव के जीवनदान, इनको अपना मानो
एक वृक्ष यदि कट जाये तो, दस वृक्ष लगाओ
पर्यावरण बचाओ...'

आपण कचऱ्याची मात्रा कमी केली पाहिजे. कचरा टाकायच्या ठिकाणीच टाकून द्यावे, प्लास्टीक पिशव्या वापरणे थांबवा, काही जुन्या गोष्टी नवीन मार्गांनी वापरा. दुरस्त करा आणि फेकून देण्याऐवजी तुटलेल्या गोष्टीचा वापर करा. त्याच्या दुरुस्तीसाठी किती खर्च येईल हे पाहा. रिचार्ज करण्यायोग्य बॅटरी किंवा नुतनीकरणक्षम क्षारीय बॅटऱ्याचा वापर करा, फ्रोसेंट लाईटचा वापर करा, पावसाचे पाणी संरक्षण करा, पाण्याचे कचरा कमी करणे, ऊर्जा संरक्षण, विजेचा किमान वापर इत्यादी पृथ्वीवरील जीवन चालू ठेवण्यासाठी आपल्या पर्यावरणाची मौलिकता टिकवून ठेवण्याची गरज आहे. संपूर्ण जगभरात आतापर्यंत आयुष्यात जास्त दिवस जगणे शक्य होते. पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेकडे जगभरातील सार्वजनिक जागरुकता पसरविण्यासाठी 'जागतिक पर्यावरण दिवस' ५ जून रोजी दरवर्षी साजरा केला जातो.

पर्यावरणाला वाचविण्यासाठी आणि शुद्ध वातावरण ठेवण्यासाठी सर्वात पहिले आपल्याला 'झाडे लावा, झाडे जगवा' हे

ब्रीदवाक्य लक्षात घेऊन ते आत्मसात केले पाहिजे. एका कुटुंबातून एक झाड जरी लावले तरी याचा पर्यावरणावर चांगला परिणाम होईल.

'वृक्षतोड करू नका, जीवन धोक्यात टाकू नका''

'पाणी म्हणजे, जीवनाची हमी'

पृथ्वीवर सर्वात बुद्धिवान जर कोणी असेल तर तो मानव. त्यामुळे त्याने आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधून घेतला. मात्र परतफेड करण्याचे साफ विसरला. एखाद्या व्यक्तीकडून वा समाजाकडून जेव्हा आपण मदत घेतो तेव्हा त्याच्याप्रति नेहमी कृतज्ञ राहतो. कधीही कृतघ्न होत नाही. हा नियम पर्यावरणाशी मानवाने कधीच पाळला नाही. त्यामुळे आज 'पर्यावरण वाचवा' यासारखे वाक्य कानी पडत आहेत. सर्वप्रथम 'मी पर्यावरणाचा एक घटक आहे' याचे भान प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे. ज्याप्रकारे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कुटुंबाचा एक घटक असल्याचे भान ठेवून वागतो त्यामुळेच त्या कुटुंबातील एक जरी व्यक्ती बेजबाबदारपणे वागला तर संपूर्ण कुटुंबाला त्याचे फळ भोगावे लागते. पर्यावरणाचे सुद्धा थोडेफार तसेच आहे. असे वाटत नाही काय? तसेच पर्यावरणाचे माझ्यावर फार मोठे कर्ज आहे आणि ते कर्ज मला फेडायचे आहे हेही ध्यान असू द्यावे. पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे वाढती लोकसंख्या हे एक प्रमुख कारण आहे. कुटुंबातील संख्या वाढू लागली की त्यांचे घर वाढतात आणि घरे बांधण्यासाठी जमीन अधिग्रहण करणे व झाडे तोडणे क्रमप्राप्तच ठरते. त्यामुले जंगलतोड होऊन मानवाची वस्ती वाढू लागले आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. त्यासाठी कुटुंब नियोजनासारखा कार्यक्रम प्रचार व प्रसार अधिक वेगात करणे आवश्यक आहे. लोकसंख्येला आळा घातल्याशिवाय आपली कोणतीही प्रगती शक्य नाही व आपला देश महासत्ता होणार नाही.

आपण अन्नाशिवाय काही दिवस, पाण्यावाचून काही तास जिवंत राहू शकतो, मात्र हवेतील ऑक्सीजनशिवाय क्षणभरसुद्धा जिवंत राहू शकत नाही आणि ऑक्सीजन निर्मितीचे सर्वात मोठे कार्य परिसरातील वृक्ष करीत असतात. वनस्पती स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात आणि हवेतील कार्बनडायऑक्साईड म्हणजे खराब हवा शोषून मानवास उपयुक्त असे ऑक्सीजन म्हणजे शुद्ध हवा वायू हवेत सोडतात. त्यामुळे वनस्पती व वृक्षांची लागवड करीत असते.

'कचरा कुंडीचा वापर करू, सुंदर परिसर निर्माण करू'

'नष्ट करा अंद्धश्रद्धेचा अंधःकार,
विज्ञानानेच होईल उद्याचा उषःकाल'

❑ ❑ ❑

# मैत्रीचा वृक्ष

वाटलं नव्हतं मला
असं काही घडेल

आपल्या मैत्रीचा वृक्ष
असा कोलमडून पडेल

याच मैत्रीला कधीकाळी
मधाचा गोडवा होता

त्या दिवसात रोजच
दिवाळी पाडवा होता

जेव्हा रडत होतो तेव्हा
मैत्रीनेच हसवलं

नुकतेच हसायला शिकलो
आणि पुन्हा मैत्रीनेच रडवलं

चूक तुझीही नसावी
किंवा माझीही नसावी

काय सांगावं आपल्या
दैवातच खोट असावी

कारणाशिवाय दुरावलो
याचच वाईट वाटतं

रडून रडून शेवटी
डोळ्यातलं पाणी आटलं

वाटलं नव्हतं मला
असं काही घडेल

आपल्या मैत्रीचा वृक्ष
असा कोलमडून पडेल

**कु. रेणुका श्रीकृष्ण कोहळे**
बी.ए. भाग ३

## नाही उमगत ‘ती’

काहीच बोलत न येणारी बाळं
बोलायला शिकतात
बोलायला शिकवलेल्या आईला
कधी कधी खूप खूप बोलतात

मान्य आहे पहिला संघर्ष
आईशीच असतो
बोलताना तिच्या भावनांचा अर्थ
समजून का घ्यायचा नसतो?

नको म्हणा, रागवा, तिरस्कार करा
हवे तसे बोला, मस्करी करा
ती कायम तुमच्या पाठीशीच असते
कारण ती वेडी असते

नाही जेवला, अभ्यास नाही केला
लवकर नाही उठला, नाराज दिसला
सतत विचारपूस करत राहते
कारण ती वेडी असते

तुम्हाला राहवते पण तीच रडते
मोठे व्हावे तुम्ही म्हणून सतत झटते
स्वतःला विसरते, तुमच्या विश्वात रमते
कारण ती वेडी असते

जिंकलात तर ओल्या डोळ्यांनी हसते
हरला तर खंबीर बनवते
तुम्ही असाल कसेही जिवापाड जपते
कारण ती वेडी असते

ती नाही कळणार, नाही उगमणार
तिच्यामुळे आपण काहीसे घडतो
हे आज नाहीच आपल्याला पटणार
कारण ती वेडीत वाटणार

खरं तर ती वेडी नसतेच कधी
मातृत्वाची जबाबदारी पेलत पेलत
स्वतःलाही नव्याने फुलवत असते
स्वप्नातील दिवस तुमचे
वास्तव स्वीकारून बघत असते
कारण ती आई असते

ती उमगू लागते तेव्हा आपण
मागे जाऊ शकत नसतो
ती असेपर्यंत थोडीशी समजली तरी
यासारखा खरा आनंद नसतो

**कु. दिव्या राजेशपंत इखे**
बी.कॉम. भाग २

## निर्णय

आयुष्यातले निर्णय चुकतात
आणि मग आयुष्यच चुकत जाते
कधी कधी तर प्रश्न कळत नाही
आणि उत्तरही चुकून जाते
सोडवताना वाटते सुटत गेला गुंता
पण प्रत्येक वेळी एक नवीन गाठ बनत जाते
दाखवणाऱ्याला वाट माहीत नसते
चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते
काही गोष्टी वाटतं तितक्या सोप्या नसतात
अनुभव म्हणजे काय हे तेव्हाच कळते
जेव्हा एखादी ‘ठेच’ काळजाला लागते

**कु. वैष्णवी प्रवीण तायडे**
बी.कॉम. भाग २

## मैत्री

मैत्री कशी असावी
कधीही न संपणारी असावी

जीवनभर साथ देणारी
सुख दुःखात सामील होणारी

मैत्री कशी असावी
प्रेमाचा वर्षाव करणारी
सदैव आनंद देणारी

मैत्री कशी असावी
दुसऱ्याबद्दल आस असावी
मने जुळवून घेणारी

मैत्री अशी असावी
कधीही न संपणारी

**रोशन महादेव ठाकरे**
बी.ए. भाग ३

## माझी ओळख

आईने बनवलं
बाबांनी घडवलं
आईने शब्दाची ओळख करून दिली
बाबांनी शब्दाचा अर्थ समजावला
आईने विचार दिले
बाबांनी स्वातंत्र्य दिले
आईंनी भक्ती शिकवली
बाबांनी वृत्ती शिकवली
आईने लढण्यास शक्ती दिली
बाबांनी जिंकण्यासाठी नीती दिली
त्यांच्या परिश्रमामुळे यश
माझ्या हाती आहे
म्हणून तर आज माझी
‘ओळख’ आहे.

**कु. दिशा दीपक गाडे**
बी.ए. भाग ३

# मानवी लोकसंख्या आणि पर्यावरण

**कु. मंजुषा झामसा कुमरे,** बी.ए. भाग २

पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे महत्त्वाचे कारण आहे वाढती लोकसंख्या. पर्यावरणात वेगाने बदल घडवून आणणारा घटक म्हणूनही मानवी जनजीवन हे होय. म्हणून पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा फार जवळचा संबंध आहे. मानवाच्या सर्व मूलभूत गरजा पर्यावरणात मधून भागविल्या जातात. याचेच कारणही आताच्या युगात जंगलतोड जास्त होत आहे त्यामुळे सुद्धा पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पर्यावरण संतुलन टिकून राहावे म्हणून पर्यावरण स्वच्छ ठेवावे, जंगलतोड करू नये, प्राण्यांना मारू नये. लोकसंख्या वाढ झाल्याने प्रदूषणातही वाढ झालेली आपल्याला दिसून येते.

इ.स.१९७० ते २०११ या ४० वर्षात जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढून ८८० कोटी पर्यंत पोहोचली आहे यावरून लोकसंख्या वाढीचा वेग किती झपाट्याने वाढत गेला हे समजून येते. आज जगाची लोकसंख्या दर वर्षाला ९ कोटीने वाढत आहे. लोकसंख्या वाढतच आहे व मृत्यूदर कमी होत आहे यामुळे सुद्धा लोकसंख्येची जास्तीत जास्त प्रमाणात वाढ झालेली दिसत आहेत. पूर्वी जगामध्ये मृत्यूदर मोठा होता कारण विविध साथीचे रोग, नैसर्गिक आपत्ती, युद्ध यामध्ये मृत्यूदर जास्त होता.

२० व्या शतकात सुरुवातीपासून (१९०१) पासून वैद्यकीय सुविधा मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या त्यामुळे साथीच्या रोगापासून बळी पडण्याचा प्रमाण कमी झाले. वाहतूक व दळणवळणाच्या सोयी सुविधा झपाट्याने झाल्याने लोकसंख्येची सुद्धा वाढ होऊ लागली. तसेच अन्नधान्याची उत्पादन क्षमता वाढली. त्यामुळे भूकबळीची संख्या कमी झाली, साक्षरता वाढल्यामुळे अज्ञान आणि अंधश्रद्धा दूर झाली व जगामध्ये मृत्यूदराचे प्रमाण झपाट्याने कमी झाली.

जगामध्ये काही विकसित राष्ट्र सोडल्यास बहुतेक विकसनशील व अविकसीत देशात जन्मदर अद्यापही जास्त आहे. विवाहाचे वय कमी वयात करून दिले जात असे. कमी वयात विवाह झाल्याने जास्त प्रजनन क्षमता आणि मोठा प्रजनन कालावधी असल्याने जन्मदर मोठा राहण्यास मदत होते. मृत्यूदर कमी असल्याने लोकसंख्या वाढ झाली व पर्यावरणाचा सुद्धा ऱ्हास झाला.

## स्त्री व्यथा

माय तुया कुशी मंदी राहू दे मले
भेव लागते या जगाचे
वासनेने पाहणाऱ्या त्या डोयाचे
माय आज आहे, उद्या सांगता येत नाही
दारा भाईर जाता श्वास घेता येत नाही
भाईरयचे हे जग लय भयान हाय
म्हणते आलं कलयुग हाय
पण सतीयुगातही माय सुरक्षित व्हती काय?
किती सहावं हे समजे ना
उगाच तुयाजवळ काही बोलवे ना
माहीत नाही मले माय
यांना काऊन समजत नाय
साऱ्या त्यांच्या आया बहीण हाय

**कु. प्रणाली प्रवीणराव कावल**
बी.कॉम.भाग १

## आई

आई तुझा हात
जशी वात्सल्यात बरसात

आई तुझी माया
जशी आभाळाची छाया

आई तुझा शब्द
जसा साठवलेला गंध

आई तुझे ज्ञान
जशी ग्रंथाची खान

आई तुझे गाणे
तसे विश्व सारे येते

आई तुझी मूर्ती तिथे
मिळे भक्ती आणि शांती

**आदित्य वि. जाधव**
बी.ए. भाग २

# मुलगी झाली हो!

**कु. अर्पिता बेलसरे,** बी.ए. भाग १

सुरुवातीच्या काळात पुरुषप्रधान संस्कृती होती. त्यामुळे स्त्रीला प्रत्येक ठिकाणी दुय्यम स्थान दिले जायचे. आज परिस्थितीमध्ये थोडाफारही बदल झालेला नाही. समाजात अजूनही जुनी विचारधारा असणारे लोक आहेत. समाज पूर्णपणे शिक्षित झालेला नाही. एखाद्या कुटुंबात मुलगी जन्माला आल्यानंतर आनंदोत्सव साजरा करतात तर त्याच समाजात दुसरीकडे एखाद्या कुटुंबात मुलगी जन्माला येणे म्हणजे पाप समजल्या जाते. एकाच समाजात स्त्रीविषयी असे वेगवेगळी विचारधारा असणारे लोक आहेत.

राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज म्हणतात–

'जिच्या हाती पाळण्याची दोरी।
तिच जगाते उद्धरी।।
ऐसी वर्णिली मातेची थोरी।
शेकडो गुरूहूनही।।'

स्त्री ही शेकडो गुरुपेक्षाही श्रेष्ठ आहे असे ते म्हणतात.

राष्ट्रपतीपासून ते शिक्षिकेपर्यंतच्या सर्व भूमिका निभावते आहे. थोडक्यात स्त्री ही सर्व क्षेत्रांत कार्यरत आहे. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्याला भारतीय राज्यघटनेने संपूर्ण अधिकार बहाल केलेत. परंतु खरंच आपल्यामधील सर्वांना अधिकार प्राप्त झालेत काय? याचा विचार समाजाला करणे गरजेचे झाले आहे.

कारण आज समाजातील असा एक घटक आहे ज्याला आपण जीवन जगण्याचा अधिकार खरंच दिला काय? असा हा घटक म्हणजे 'स्त्री'.

आज संपूर्ण देशात महिला प्रगती करीत असताना यशाची शिखरे गाठताना समाजाने त्यांना पूर्ण अधिकार दिलेत काय? याचे उत्तर प्रामामिकपणे मिळविले तर लक्षात येईल 'नाही' दिलेत.

आज आपण जन्माला येण्याच्या आधीच मुलींची हत्या करीत आहोत आणि अडचणींवर मात करून त्या मुलीने जन्म घेतलाच तर त्यांच्यावर अनेक प्रकारे जीवनच संपून टाकतो. एकीकडे आपण म्हणजे आपल्या देशांमध्ये शैक्षणिक क्रांती आली, वैचारिक स्तर वाढला, तर दुसरीकडे थोड्या पैशासाठी स्त्री भ्रूणहत्या ही आपण



घडवून आणत आहोत. सोबतच बलात्कारासारख्या .घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. या सर्व गोष्टींना आपण आळा घातला पाहिजे. समाजामध्ये स्त्रीचा सन्मान केला पाहिजे. अशाप्रकारे स्त्री ही समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

❑ ❑ ❑

## स्त्री व्यथा


माय तुया कुशीमंदी राहू दे मले
भेव लागते या जगाचे
वासनेने पाहणाऱ्या या डोयाचे
दाराभाईर जाता श्वास घेता येत नाही
भाईरचे हे जग लय भयान हाय
म्हणते आलं कलयुग हाय
पण सतीयुगातही माय सुरक्षित व्हती काय?
किती सहावं हे समजे ना
उगाच तुयाजवळ काही बोलवे ना
माहीत नाही मले माय
यांना कावून समजत नाय
साऱ्या त्यांच्या आया बहीन हाय

**कु. प्रणाली प्रविणराव कावल**
बी.कॉम.भाग १

# डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य

**कु. अश्विनी अरुणराव राऊत,** बी.ए. भाग ३

बहुजनाच्या शिक्षणाचे शिल्पकार आणि कृषिक्रांतीचे अग्रदूत भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख यांचे चरित्र आणि कार्य हिमलायापेक्षा उत्तुंग आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. देशातील शेतकरी आणि महाराष्ट्रातील शिक्षणाची अवस्था भाऊसाहेबांनी अनुभवली होती.



भाऊसाहेबांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी झाला. शेतकरी कुटुंबात जन्मास आलेल्या पंजाबरावाच्या आईचे नाव राधाबाई आणि वडील शामरावबापू असे होते. इयत्ता तीसरीपर्यंत शिक्षण पापळ या गावीच झाले. चौथा वर्ग नसल्याने एक वर्ष तिसऱ्या वर्गात शिक्षण घ्यावे लागले. पुढे भाऊसाहेबांचे आजोळ सोनेगावच्या जवळच असलेल्या चांदूर रेल्वेच्या प्राथमिक शाळेत वर्ग पूर्ण केला. माध्यमिक शिक्षण कारंजा लाड येथे तर मॅट्रीकचे शिक्षण अमरावतीच्या हिंदू हायस्कूलमधून पूर्ण केले.

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून इंटरमिडीएटचे शिक्षण घेऊन उच्च शिक्षणासाठी भाऊसाहेब इंग्लंडला गेले तेथे त्यांनी 'वेद वाङ्मयातील धर्माचा उगम आणि विकास' (१९२०) मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाची पीएच्.डी. पदवी संपादन केली.

**भाऊसाहेबांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य–**

महाराष्ट्राच्या शिक्षणाचे शिल्पकार दोन भाऊ त्यात भाऊसाहेब पंजाबराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील हे आहेत. देशातील सर्वात मोठ्या श्री शिवाजी संस्थेची स्थापना भाऊसाहेबांनी १९३१ साली अमरावती येथ केली. त्यानंतर विदर्भाचा शैक्षणिक विकास, भारतीय शेती–शेतकरी आणि बहुजन उद्धाराची चळवळ हे भाऊसाहेबांच्या जीवनाचे ध्येय ठरले. बहुजनाच्या शिक्षणातील अडचण ही प्रतिगाम्याची मनुवादी विचारधारा आहे. ही प्रतिगाम्याची मनुवादी विचारधारा नेस्तनाबूत करण्यासाठी अखंड प्रयत्न केले. शिक्षण, शेती, सहकार, अस्पृश्योद्धार, जातीभेद निर्मूलन व धर्म इत्यादी विविध क्षेत्रात त्यांनी अवाढव्य कार्य केले. ग्रामीण समाज पोथीनिष्ठ आणि परंपरानिष्ठ असल्याने त्यांच्यात अज्ञान अंधश्रद्धा, दैववाद, अवैज्ञानिकता, देवभोळेपणा खच्चू भरल्यामुळेच हा समाज शिक्षणापासून वंचित राहिला हे त्यांना ठाऊक होते.

डॉ.पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी झाले. त्यांच्या पत्नीचे नाव विमलाबाई होते आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांचा मृत्यू १० एप्रिल १९६५ रोजी दिल्ली येथे झाला.

'तू ज्ञानाचे गाणे भाऊ, तू सूर्याची भाषा
तमायुगाला उजळून गेल्या तव किरणाच्या रेषा।'

❑ ❑ ❑

## शिक्षक

शिक्षक हे तर आईवडिलांप्रमाणे असते, कळलं नाही तर समजावून सांगते.
शिकवताना तर लाडी–गोडी लावून शिकवते, आणि शिकवताशिकवता आई वडिलांप्रमाणे माया सुद्धा लावते.
एका एका शब्दाचा अर्थ समजावून सांगते बरे वाईट याची ओळख करून देते.
शिक्षक हे तर मार्गदर्शनाचं चैनल जसे, चोवीस तास चांगलाच सल्ला देत राहते.
शिक्षक म्हणजे एक ज्ञानाचा ग्रंथ जसा, जितके शिक्षण द्याल तितके कमीच कमी पडते.
शिक्षक हा तर जीवनातला आहे दुसरा बाप, हा जर नसला तर व्यर्थ आहे जीवन.

**प्रतिक विनायकराव वैराळे**
बी.ए. भाग २

# प्रेम

शब्दाशब्दातून
झळकतेय तुझे
माझ्यावर असलेलं
प्रेम...
हलकेच मला
रागावशीलही
तुझ्या रागातही समावलेलं
प्रेम...
नजरेआड होतोय तेव्हा
तुझ्या मनातील शंका
कुशंका दर्शवितात
भावनात्मक
प्रेम...
सामोरे असतोय तेव्हा
नजरेत तुझ्या
प्रकाशस्तंभ
प्रज्वलित करतोय
प्रेम....
मी नसतानी
तुझ्या विचारांचे
ताणेबाणे माझ्यात
भोवती
माझीच कल्पना
माझीच प्रतिमा
विचार मनात
आणती
सखे जेव्हा मी
अखेरच्या निरोपाला
तुझ्याकडे येणार
तेव्हा सरते शेवटी
मला तुझ्या नजरेत
बघायचे आहे
आसवे...
त्या आसवामध्ये
अस्तित्व राखून
असायला हवे
प्रेम...फक्त प्रेम...

**कु. मेघा शिशुपाल बोरकर**
बी.ए.भाग १

# आदर्श शिक्षक

शिक्षकच आपले सर्वस्व असते
त्यांची सेवा ही स्वर्ग असते
करावी नेहमी सेवा त्यांची
करावा नेहमी आदर त्यांचा
हिच जगातील सर्वात मोठी खुशी असते

प्रेम हे त्यांचे कधीच कमी होत नसते
त्यांचे मन आपल्यासाठी नेहमीच
झटत असते हृदयाची त्यांची खोली
शब्दात मोजता येत नसते

ह्या जगात तोच खरा भाग्यवान
ज्यांना शिक्षकांचे प्रेम मिळत असते
त्यांच्या प्रेमाच्या व शिक्षणाच्या
व्यतिरिक्त असो कितीही संपत्ती
ती मातीच्या मोल असते

म्हणूनच हवीहवीशी वाटते त्यांची साथ
जीवनाच्या प्रत्येक वाटेला
आणि म्हणूनच शिक्षकच आपले
सर्वस्व असते आपले विश्व असते

**कु. ऋतुजा प्रदिपराव राऊत**
बी.ए. भाग २



# बाप माझा शेतकरी

रातदिस मेहनत करी
खाई कष्टाची भाकरी
पोचतो ही दुनिया सारी
बाप माझा शेतकरी

त्याला साऱ्या दुनियेचा घोर
म्हणून खाई अर्धीच भाकर
जगा देतो तो पोटभर
ना त्याला सुख तीळभर
त्याच्याच कष्टाचं खाती सारी
बाप माझा शेतकरी

त्याच्यामुळेच सारं जग
ना दिसती त्याचं कुणा दुःख
त्याचंच खाऊन, सर्वा सुख
त्याच्यात नशिबी आलंय दुःख
रात दिस ढेकळात मरी
बाप माझा शेतकरी

काळ्या मातीची त्याची खाण
राबी त्याच्यात विसरून भान
घेऊन वाड वडिलाची आण
काढी त्यातून हिरवं सोनं
नसे त्याला किंमत जरी
बाप माझा शेतकरी

**कु. शुभांगी राजेंद्र कापडे**
बी.कॉम. भाग ३

# आजचा युवक

**कु. पल्लवी सुभाषराव मोकासे,** बी.कॉम. भाग १

बाबा आमटे यांनी युवकाची खरी व्याख्या किंवा आजच्या जगातील युवक हा कसा आहे हे त्यांमी ते फार विस्तृत व्याख्यानामध्ये सांगितले आहे.

